REGISTERED NO. 6,1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला रविवार ता० १ माहे एप्रिल सन १८७७ इ० अंक १३

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचें अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### भरतखंडवासी सुजनांस प्रार्थना.

श्रीमंत महाराज, राजेसाहिब, थोर सरदार, जाहगिरदार, इनामदार, नामांकित सावकार, वतनदार, कुलभूषण, देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील कुळकर्णी, आदिकरून कुलवान गृहस्थ, मोठमोठे कामगार, स्वदेशाभिमानी व दौलतमदार नबाब साहिब, बहादुर हजरत काजी नायब काजी साहिब, खानसाहिब, प्रांतांनी व जिल्ह्यांनिहाय इलाखा मुंबई मद्रास आणि कलकत्ता यांचे सेवेशी व हुजूरास—

तालुक्यानिहाय जिल्हा पुणें व सोलापुर यांतील रयतेचे आज्ञेवरून प्रार्थना व अर्ज करण्यांत येतो ऐसा जे—या भरतखंडात शास्त्र व कुराणाचे अधारें आर्यबंधु व महमदी धर्मांचे सुजन वर्ततात. शास्त्रसिद्धांत व कुराणांतील शर्त अशी आहे कीं संकटसमयीं बंधूंचे नात्यानें परस्पर मदत करून अनाथास रक्षावें तें असें—विद्वानानें विद्यारूपानें, शरीर संपत्तीवाले आहेत त्यांनीं मेहनतीनें, धनाढ्य आहेत त्यांनीं द्रव्यरूपानें, वैद्यानें रोगग्रस्तांस औषधी देऊन रोगमुक्त करावें, कोणी आगींत जळत पडून अघात मृत्यूनें मरत आहे त्यास शरीर संपत्तीवाल्यांनीं धाव मारून जऊन काढावें, धनाढ्य लक्ष्मीपति यानें संकटसमयीं अनाथास अन्नवस्त्र देऊन रक्षावें, दुष्टशत्रु तस्करानीं गोब्राह्मणास पीडा केल्यास रणशूरानीं जाऊन चोराचा पराभव करून गोब्राह्मण इत्यादिकांस रक्षावें असी ईश्वराची व सिद्धांताची आज्ञा व खुदाचा हुकूम आहे. पाप पुण्य समान झाल्याविना नरतनु प्राप्त होत नाहीं. नरतनूचें कर्तव्य काय? परोपकाराची, स्वदेश कल्याणाचीं सार्वजनिक कामें प्रत्येक व्यक्तिमात्रानें आपापले शक्तिप्रमाणें मनःपूर्वक करून जगांत बंधूचा आशीर्वाद घेऊन मागील पापाचा नाश करावा ह्मणजे तो प्राणी या जगांत शतमान आनंदानें राहून परलोकीं जाऊन धन्य होऊन हयातीमागें लक्षानुलक्ष वर्षें सुकीर्तीस पात्र होतो. पहा, प्रतापसिंव्ह, शिवाजी महाराज, बाजीराव बल्लाळ; पेशव्याचे स्वदेश प्रीतीकडे धाराशूर- राणोजी शिंदा, मल्हारराव होळकर, दामाजी गाईकवाड, रघोजी भोंसला यांचे पराक्रमाकडे पहा कीं ज्यांनीं शौर्यानें गोब्राह्मण रक्षिले. दानशूर दामाजीपंत बेदर सरकारचा कारभारी, राजा चंदुलाल, गोवळकोंडे [ हैदराबाद ] सरकारचा कारभारी गोपाळराव मैराळ बडोदेकर, या जगविख्यात पुण्यपुरुषांनीं अनाथाचे सरकार बनून अनाथांच्या दादी घेऊन वेळोवेळीं संकटसमयीं रक्षिले. यावरून पाहिलें असतां गेल्या पांचशें वर्षांत ही भरतभूमी वीरमाता नऊ धुरंधर पुत्र प्रसवली तद्वत् वीरकन्याही प्रसवली त्यांचे कर्तव्याकडे सुजनहो डोळे उघडून पहा.—शके १३१८मध्यें बारा वर्षें दुष्काळ पडला होता त्यावेळेस वीरकन्या दुर्गा नावाची लमाणीन होती तिनें धैर्य न सोडितां ९।१० लक्ष बैल जमवून सुकाळाचे प्रांत चीन, नेपाळ, ब्रह्मदेश एथून धान्य आणून दक्षिण व उत्तर प्रांतास पुरविलें. जे दरिद्री होते त्यांस धर्मार्थ धान्य देऊन रक्षिलें. जेव्हां परजन्यवृष्टी झाली तेव्हां प्रत्येक गावास एक एक बैल व एक गाव जनावरांचे उत्पतीसाठीं देऊन पेरण्याकरितां एक एक गोणी धान्य दिलें हें अलौकिक कर्तव्य दिल्लीचे पातशानें विलोकून बडा दरबार भरवून त्यांत दुर्गादेवी जगाची माता हें पद देऊन मोठा जयजयकार केला. गेल्या शतकांत अहिल्यामाता होळकरीण जगविख्यात झाली. या मातेनें काशी रामेश्वरपर्यंत रस्तोरस्तीं यात्रेकरू लोकांकरितां विहिरी खणून उदकाची तयारी ठेविली. जागो जागीं तीर्थांचे ठिकाणीं श्रीरामचंद्राचीं मंदिरें बांधून त्यांतून अन्नसत्रें सदैव ठेविलीं. प्रसंगोपात पाठीसीं बाणाचें भातें बांधून हत्तीच्या हौद्यांत बसून ठाण मांडून शत्रूवर बाणाचा वर्षाव करीत असे ह्मणून आहिल्या मातेचा शत्रूस मोठा दरारा असे, यामुळें भरतखंडवाशी सुजनास ज्या ज्या प्रसंगीं वरील परोपकारी आर्य जननीचे सुपुत्राचें स्मरण होतें त्या त्या वेळेस माना च डोलवून त्यांस आशिर्वाद देतात. आमचे श्रीमंत महाराज व सरदार, जाहगिरदार, नामांकित सावकार, जमेदार, मोठमोठे कामदार बांधवहीं सदर्हू उदाहरणाकडे पूर्ण लक्ष पुरवून त्या जीवनमुक्त पुरुषांचे कर्तव्य ध्यानांत आणून परोपकाराचे कामीं दक्ष राहून त्यांचि ओळीस आपलें नाव इतिहासांतून विद्युल्लतेसारखें सदैव चमकण्यासाठीं या घोर दुष्काळ समयीं आपापले शक्तीप्रमाणें मदती करा. गेले आश्विन मासीं दुष्काळरूपी राक्षसाचा जन्म झाला. तो जसजसा वाढू लागला तसतसा जाभाडें पसरून एतद्देशीय अनाथ स्त्रिया पुरुष व बालकें दाखालीं रगडून फन्ना करूं लागला. त्याचें मुख फोडून अनाथ रक्षावे ह्मणून आपले सरकाराकडे हजारोंचे हजारों सह्यानिसी अर्जावर अर्ज केल्यावरून लहान मोठीं कामें सुरूं करून इंदापुर तालुक्यांतील जीधीर धरून —$\frac{1}{4}$ पर्यंत प्रजा राहिली त्यापैकीं $\frac{1}{3}$ प्रजेचा तीन महिनेपर्यंत साधारण रीतीनें गुजारा झाला व बाकीच्यांत जे अन्नूदार ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य, शूद्र होते त्यांस खडक, मुरूम, माती, वाहण्याची मजूरी करणें मरणप्राय असतांही जीवाचे बचावासाठीं काम करण्यास हजर झाले असतां कामावर लाविलें नाहींत ह्मणून ते अन्नूनें आपले घरांत राहून उदकपान करून मरूं लागले हें विलोकून ठिकाठिकाणचे धुरंधर महाराजांकडे पत्रें लिहिल्यावरून परम दीनाचे दयाळू श्रीमंत महाराज तुकोजीराव बाबा साहेब होळकर यांजकडून रकम रुपये ११६४ व बडोद्यात प्रख्यात सावकार श्रीमंत राजश्री गंगाधरराव यशवंत ऊर्फ बाबा साहेब व माधवराव रामचंद्र ऊर्फ दादा साहेब फडणीस निसबत समशेर बहादूर सरकार या धिमंत पुरुषांनीं ११२९ रुपये मदत व गावांतील सावकार लोकांकडून जी मदत आली त्या सर्व मदतीचा उपयोग तालुके इंदापुर एथील सार्वजनिक सभेचे अध्यक्ष परोपकारी श्रीमंत राजश्री माधवराव वामन ऊर्फ नाना साहेब जहागिरदार व तिसरे प्रतीचे सरदार यांणीं सभासदांचे साह्यानें अनर्थाकडे उपयोग केला. त्या रकमा संपत आल्या आणि सरकारांनीं मजुरास दर गेल्या दोन महिन्यापासून अतिशय कमी केला. तो बिगारी यास दोन आणे पैकी सवा आणा; औरतीस दीड आणा पैकी एक आणा व मुलास दीड आणा सवा आण्यापैकी नऊ पै प्रमाणें देण्याचा ठराव केला. त्या पैशानें एक वेळसुद्धां पोटभर अन्न मिळेना. मजूरलोकांस तीन वेळ खाना भाजी भाकरी पाहिजे त्यापैकीं दोन सांजीं भुकें रहाणें भाग पडून सक्त मजुरीचें काम करावें लागतें. पोटांतील आग शमनार्थ हवें इतकें पाणी पिऊन रात्रीं थंडींत, वाऱ्यांत पडून; थंडीनें पोट फुगून जुलाब, उलट्या होऊन शेकडों अनाथ मजूर लोक कुत्र्याचे मोत्तीनें मेले व मरतही आहेत. इतक्यांत गेल्या आठवड्यापासून कितीएक कारखान्याचे पैसे शिलक असतां अपुरीं कामें बंद केल्यानें तालुक्यांत काम नाहीं काम नाहीं ह्मणून लोकांस धान्य देणें, अन्न घालणें बंद करणें भाग पडल्यामुळें पुन्हा पूर्ववत् हायहाय उडाली. ह्मणून भरतखंडवासी थोर, कुलवान, श्रीमंत महाराज, सरदार सावकार, जमीदार यांस व मोठमोठे कामगार- यांस जगतकल्याणासाठीं मोठ्या नम्रतेनें व सप्रेम अंतःकरणानें प्रार्थना आहे कीं आपापले शक्तीप्रमाणें द्रव्यरूपी मदत आमचे नांवें पाठविणें ती मुंबई इलाख्यांत, पुणें जिल्ह्यांत तालुके इंदापुर येथें देणें ह्मणून पत्ता लिहून रकमा पाठवाव्या. अगर इंदापुर सार्वजनिक सभेचे अध्यक्षाचे नावे व सभेचे खजीनदार रा. रा. रंगो सखाराम दुनाखे प्रसिद्ध सावकार यांचे नावें रकमा पाठविल्यास त्याच्या पावत्या मिळून खर्चाचे हिशेबही सही सिक्यानिसी श्रीमंत महाराज होळकर सरकाराकडे रवाना झाले तद्वत् आपलेकडेस रवाना होतील, आमच्या नावें जरी रकमा पाठविल्या तरी त्या आह्मी सार्वजनिक सभेकडे पावत्या करीत आहों. त्याचा यथान्याय व्यय सभा करित आहे, अमुक रकम पाठविल्याबद्दल जबाब मात्र आमचे नावें मुक्रर यावा. या महत् संकट समयीं मदत करणें खरे कुलवान धुरंधर पुरुषाचें कर्तव्य आहे. कळावे लोभ व मेहरबानी असावी ही विज्ञापना. मिती चैत्र शुद्ध १ शके १७९९.

रयतेचे अज्ञेवरून.
गोपाळ नरसिंव्ह देशपांडे
इंदापुर वगैरे तालुक्यानिहाय
रयतेचा एजंट

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस आपल्या सुंदर पत्रीं जागा मिळेल अशी आशा आहे.

उमरखेड परगण्यांतील गांव, पूसद तालुक्याचे जागे पासून आदमासे अठरा वीस कोस दूर असल्यानें तेथील रयतेस पाटील, पांडे, अगर सरकारी पोलिस, व मुलकी खात्यांतील हलके नोकर, यांजकडून जुलूम जबरदस्ती अगर दुसरा कोणताही प्रकारचा ताप झाल्यानें त्याबद्दल तहशिलदार साहेब यांजपाशीं दाद मागण्यास मोठी पंचाईत पडते; व त्या लोकांची सदर कारणामुळें दाद न लागल्यामुळें वर लिहिलेले नोकर लोक व पाटील, पांडे, त्यांस अधिक अधिक ताप देऊ लागतात. याचा बंदोबस्त होण्याचा योग्य विचार ह्मटला ह्मणजे हाच आहे कीं, ज्याप्रमाणें मुंबई इलाख्यांत प्रत्येक जिल्ह्यांत जसे महालकरी ह्मणून अधिकारी असतात त्याप्रमाणें पुसद तालुक्यांत उमरखेड व वाशिम तालुक्यांत रिसोड या दोन गांवीं महालकरी नेमल्यास रयतेची सर्व प्रकारची दाद लागून ते सरकारास दुवा देतील.

मी निजाम सरकारचा नोकर आहे, व माझें काम पेन गंगेच्या काठानें फिरण्याचें असल्या कारणानें कसबे तळणी या गांवीं आलों तेथून पुसद तालुक्यांतील मुळावा हा गांव फार जवळ होता व त्या

ठिकाणीं ते दिवशीं बाजार असल्यामुळें त्या गांवीं गेलों. व गावांत फिरत असतां एक चमत्कार दृष्टीस पडला तो खालीं लिहिल्याप्रमाणें:—

कोणी एका इसमानें सरकारी जमीनीचे नंबरापैकीं कांहीं जागा एका रंगाऱ्यास विकून त्याजबद्दल सरकारास सदर गोष्टीची खबर वगैरे कांहीं न देतां त्याची किंमत आपण घेतली. व सदहू रंगारी यास त्या ठिकाणीं इमारत बांधण्यास सांगित ल्यावरून त्यानें आदमासे दोन तीनशें रुपये खर्च करून आज चार महिने झाले इमारत उभी केली आहे व सदहू जमीनीचे नंबरांत बांध वरळ्या वगैरे मोजणी खात्याचे अधिकाऱ्यांनीं ठरविलेल्या हद्दी मोडून त्याचा मोजबा नाहींसा केला. हा प्रकार पाहून मला मोठा अचंबा वाटला व इंग्लिश सरकारचे राज्यांत अशी अंदाधुंद कशी झाली व अशी बेकायदेशीर गोष्ट बिगर हुकमी कशी झाली; गांवचे पाटील, पांडे, यांनीं याची विचार पूस काय सबब केली नसेल या बद्दल खाजगी रीतीनें चवकशी करूं लागलों तों असें ऐकण्यांत आलें कीं. एथील कारभारी पाटील यानेंच आपल्या खुद्द रयताव्याच्या जमीनींतील कांहीं जागा विकून त्याबद्दल किंमत घेतली. व ती गोष्ट शिद्धीस जावी एवढ्या करितां वर लिहिलेले इसमास वर लिहिला गुन्हा करण्यास उत्तेजन दिलें. असें सर्व लोक सांगू लागले. तर पत्रकर्ते महाराज, सरकारी जमीनीचा नंबर सरकारचे हुकुमाविरूद्ध विकणें व त्याचे हद्दीच्या बांधवरळ्या नाहींशा करणें व त्याबद्दल चार महिने पर्यंत सरकारास कांहींच रिपोर्ट न करणें हे प्रकार गुन्हे होतात कीं नाहीं हें मेहेरबानीनें आपले पत्रीं प्रसिद्ध कराल अशी अशा आहे.

तारीख ८ मार्च सन १८७७ इसवी.

एक
प्रवाशी

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. आपल्या पत्रांत येत्या अंकीं थोडीशी जागा मिळेल अशी आशा बाळगून ह्या चार ओळी लिहिल्या आहेत. तर त्याचा स्वीकार करावा. मी प्रवास करीत असतां फिरत फिरत तालुके पुसद येथें अलों त्यादिवशीं तेथील सरकारी चावडीवर सर्व गावकरी लोक जमले होते व त्या मंडळींत मेहेरबान सादतमीरखा तहशिलदारही होते. तेवेळेस आह्मी तेथें विचारलें कीं हा समारंभ कशाचा आहे? त्यावरून असें समजलें कीं येथील इं. म. शाळा कांहीं दिवसापासून फार वाईट स्थितींत आली होती व तिची लवकरच कांहीं तरी तजवीज होईल असें वाटलें होतें परंतु तहशिलदारामीं शाळेचा अभिमान बाळगून शाळा सुधारावी असें मनांत आणिलें आहे. हें ऐकून फार संतोष झाला. तेव्हां तहशिलदारानीं लोकांस मुलें शाळेंत पाठविण्याविषयीं उत्तेजन. दिलें तें असें कीं तेणेंकडून लोकांच्या मनांत आपणास लिहिण्यापासून फार फायदा आहे असें वाटून त्यांनीं आपआपलीं मुलें शाळेंत पाठविण्याचें कबूल केलें व पुढें पहिल्याप्रमाणें मुलें जाण्याची सुरूवातही झाली. मला वाटतें कीं अशा गोष्टीकडे लक्ष पुरविणें हें त्यांच्या योग्यतेस भूषण आहे व त्यांच्या तालुक्यांत अशी एखादी मोठी शाळा असणें जरूर काहे. कळावें हे विनंती.

एक फिरस्ता क्ष.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिति चैत्र वद्य ४ शके १७९९

---

## सिव्हिलियन लोकांची पोटदुखी.

हे युरोपियन लोक आह्मापेक्षां विद्येनें श्रेष्ठ आहेत ह्मणून ते नीतिविशारदही आह्मापेक्षां अधिक असले पाहिजेत; पण स्वहित आणि स्वाभिमान यांच्याशीं संबंध आला कीं त्यांची नीति, धोरण, सारासार विचार हीं सर्व बाजूस रहातात असें किसेक गोष्टींवरून ह्मणावें लागतें.

रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांस नाशकास जाइंट जज्जाची जागा हिंदुस्थान सरकारानें दिली तिजवरून सिविलियन लोकांनीं मोठा गवगवा केला आहे कीं आमचें तील ही जागा नेटिवास दिल्यानें आपचें नुकसान झालें व त्याजबद्दल सर्व मिळून विलायत सरकाराकडे अर्जही करीत आहेत. सुमार १९ वर्षांमागें रा. बा. गोपाळराव यांस नगरास असिस्टंट जडजाची जागा मिळाली होती तेव्हांही यांचें असेंच पित्त खवळलें होतें व यांनीं अर्ज केला होता. तेव्हां मुंबईचे गव्हरनर सर बार्टल फ्रियर सा. यांनीं गोपाळरावास समजून सांगितलें कीं या लोकांच्या तक्रारीवरून आह्मी तुह्मास दिलेली जागा जबरदस्तीनें घेणार नाहीं पण इतक्यांचीं मनें खवळविण्यापेक्षां तुह्मीच ही जागा सोडिल्यास तुह्मांस बढतीची दुसरी जागा मिळेल. त्यावरून देशमुख यांनीं मुकाट्यानें असिस्टंट जज्जाची जागा सोडून स्माल काज जज्जाची जागा पतकरली. आणि त्याच गृहस्थास हिंदुस्थान सरकारानें ही मोठी जागा पुन्हा दिली आहे. व पुन्हा सिविलियन लोकांनीं अर्ज केला आहे. दिल्ली दरबारच्या वेळीं जज्जाच्या, कलेक्टरच्या वगैरे कित्येक मोठमोठ्या जागा नेटिवांस देण्याचें घाटत होतें त्याप्रमाणें झालें असतें तर या लोकांनीं मोठीच ओरड केली असती व त्या आनंदाच्या समारंभांत ते दुःखी राहिले असते यांत संशय नाहीं.

हिंदुस्थान सरकारास अशा जागा देण्याविषयीं विलायत सरकारानें अधिकार दिला आहे. व हा अधिकार देण्याचा ठराव होते वेळीं सिविलियन लोकांनीं थोड्या हरकती घातल्या असें नाहीं. पण सरकार दूरदृष्टी व शहाणें त्यानें अशा जागा नेटिवांस देण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास सत्ता दिली व त्यावरून त्यांनीं ही पाहिलीच नेमणूक केली आहे सबब त्यांस आमची शिफारस आहे कीं त्यांनीं युरोपियन लोकांच्या कुरकुरीकडे लक्ष्य देऊं नये व अशा ९।४ जागा एकदम भराव्या. कारण यांत अन्याय किंवा गैरकायदा असें कांहींच नाहीं.

काय चमत्कार आहे कीं हजारों मोठ मोठ्या जागा सिविलियन लोकांकडे असतां त्यांतील एकादि जागा नेटिवास मिळाली तर त्यांचें पित्त खवळतें! त्यांनीं काय सार्‍या जागांचा मक्ता घेतला आहे कीं काय? व तसें ते समजत असतील तर आमचे मराठींतील व मोंगलाईंतील मक्त्यांचे मामल्यास त्यांनीं कां हसावें? सारांश आजच्या काळांत त्यांचा हसवा कोणासही रास्त दिसावयाचा नाहीं. मुंबईस ज्ञानोदय नावाचें वर्तमानपत्र आहे त्याचे एडिटर ख्रिस्ती धर्माचे असून निष्पक्षपाती आहेत त्यांनीं देखील या संबंधानें लिहिलें आहे कीं "नेटिवास अशा जागा दिल्यानें- सरकारानें सिविलियन लोकांशीं केलेला ठराव मोडतो असें त्यांस वाटतें पण असा पक्षपाती ठराव जितक्या लोकर मोडेल किंवा रद्द होईल तितकें बरें हें सिविलियन लोकांनीं ध्यानांत ठेवावें".

कलकत्याचे नेटिव लोकांनीं या सिविलियन लोकांच्या अर्जाविरुद्ध विलायतेस अर्ज कण्याकरितां एक मोठी सभा भरविली होती तींत ३००० गृहस्थ जमले होते. ठराव झाला कीं, विलायतेस अर्ज पाठवावा व त्यांत मागणें मागावें कीं, हिं. स० चें करणें कायम राखावें. व सिविल सर्व्हिसच्या परीक्षा हिंदुस्थानांत घेण्याचा ठराव करावा.

---

The actions and merits of a public functionary, are, and have been, always a subject of great general interest in all civilized communities; particularly so when he is retiring, for, it appears, public then wishes to be determined in its judgment on his conduct. These have, moreover, a peculiar and abiding interest in a country where the policy of centralization has been introduced and observed for a long time. In this state of affairs the agents of the Government, acting under the direct superintendence of the central power unassisted in its deliberations by the popular voice, may fairly be taken to represent its opinions. It thus becomes the duty of the press to supply the place of representation by criticising their actions and opinions from a popular point of view, and thus serve for a mediator between the people and Government, by endeavouring to make known and reconcile the views of both on points of importance. Conformably with these views we propose today to devote some space to the official career of Colonel Nembhard who is on the eve of his departure. We are happy our duty is pleasant since we have to report little that will be prejudicial to his reputation.

When Captain Caddle resigned, in his place two Commissioners were appointed and Colonel Nembhard was chosen to administer law and collect Revenues in the East Berar. After a few years this arrangement was abandoned and he was entrusted with sole managment of the Revenues in the whole of Berar. With this extension of authority his circle of kindness and good feeling increased, so much so that he has since fairly established himself in the good will and favour of the educated and sensible population of the province. During the long official career of about ten or twelve years, wonderfully enough we have not yet heard an ill report about this gentleman in high position. Even the vanquished parties are reported to lay the charge of misfortune at the door of an ill conjunction of unfavourable stars – and did not attribute it to the fault or defect in the proceedings of the revenue court. This acquision of the "golden opinions" of the populace we are disposed to look upon as not a little important. It is perhaps most necessary, not only to a civilian serving in the Assigned districts but we may venture to say to all public functionaries doing their duty in almost in any country under the Government of well established laws. In order that the sphere of usefulness of any officer should not be limited, it is necessary, that he should not only be really just & honest but should believed to be just and honest.

But to return to the matter in hand. Colonel Nembhard has gone through the ordeal of filling a public office very creditably and his retiring cannot but be regarded with feelings of sincere regret only very moderately softened by the consideration that after spending the best and most vigourous part of his life in the some what uncongenial climate of Berar Colonel Nembhard is returning for goodto his native land with the good wishes of the people over whom he ruled for so long a time. We wish him a quick and easy voyage and hope that he will remember the land of his labours so much as to incline him to take a prominent part in the Indian affairs now beginning to be discussed in England. We hope his example will be followed by his successor and brother officers in Berar and it will be our pleasant task to speak with equal respect about them in future.

---

### आयुष्य.

हें जग अनादिकालापासून सुख आणि दुःख यांणीं व्याप्त आहे व ते दोन्ही समसमान असतात. परंतु सुखाचे दिवस जाण्यास सुलभ असून फार लवकर जातात. पण दुःखाचें तसें नाहीं. दुःखाचे दिवस

मोठे कठीण व त्याची गती फार मंद असती. या पृथ्वीवर आजवर किती संकटें गुदरून लोकांस किती हाल सोसावे लागले असतील याची गणती नाहीं, तशांतून प्राणीमात्रांस दुःख होण्यास थोडेंही कारण पुरतें. या जगांत जेव्हां जेव्हां व ज्या ज्या प्रकारचा त्रास होतो त्याच्या त्याच्या निवारणार्थ मानव प्राणी आपल्या बुद्धी कौशल्यानें उपाय योजितो. कारण या जगांत ज्या ह्मणून मोठ्या मौल्यवान वस्तु आहेत त्या सर्वांत श्रेष्ठ ह्मटलें ह्मणजे आयुष्य होय. व त्याची जतन करणेंही त्या सारखीच मोठी अवघड गोष्ट आहे. या जगांतील जेवढे ह्मणून मुलापासून वृद्धापर्यंत प्राणी उद्योगांत गुंतलेले दिसतात तेवढे सर्व आयुष्यसंरक्षणार्थच. ( शेतकरी कापूस उत्पन्न करितो, कोष्टी कापड विणतो, घिसाडी अवजारें बनवितो, सुतार जोडणी करतो, गवंडी भिंती बांधितो व वैद्य औषधोपचार करतो इत्यादि ) तरी त्या सर्वांची नजर चुकवून या आयुष्यावर अकल्पिक घाला काळ कसा घालतो हें समजत नाहीं. या आयुष्याचे संबंधानें कृतायुग, त्रेतायुग, द्वापार यांत अनुक्रमे लक्ष, दहा हजार व हजार वर्षे आयुष्याची यत्ता होती ह्मणून पुराणांतरीं ऐकतों पण हल्लीं तर ७०।८० वर्षे झालीं ह्मणजे अतिशय वृद्ध झाला व एकंदर यत्ता १०० पर्यंत आहे. पण एक १०० वर्षांचा मनुष्य पाहिजे असें ह्मणून शोधावयास गेलें तर १००।५० कोस जमीन पालथी घालावी लागेल व इतकें हिंडून सापडले तर एक दोनच पराकाष्ठेनें सापडतील. तें असो. पण प्रत्येकजण अनादिकालापासून आयुष्यसंरक्षणार्थ उपाय शोधित आहे यावरून दिवसेंदिवस त्याचा टिकाव पूर्वीपेक्षां अधिक काळ व्हावा तो तसा न होतां शतांश, सहस्रांश अशा क्रमानें कमी ( पूर्वींचे लेखावरून ) होत चालला आहे. याला कारणें अनेक आहेत. विद्वानांचा असा तर्क आहे कीं पूर्वीं वस्ती फार विरळ होती तेणेंकरून आयुष्यास हितावह द्रव्याचा पुरवठा भरपूर होत असे पण अलीकडे प्राणीसंख्या वाढून दाटी झाली व सदर्हू नियमित द्रव्यावरच निर्वाह करूं लागले तेणेंकरून पूर्वींप्रमाणें आयुष्य टिकत नाहीं.

आतां हल्लीं काळीं जितकीं वर्षें आयुष्याची यत्ता आहे त्याचे मागें तरी किती ह्मटें? अन्न पाणी जे प्राण रक्षणाचें मुख्य साधन तेंच अनावृष्टीमुळें आटवी होऊन दुष्काळ पडणें, प्राणहाणी होणें, अकस्मिक वादळ होऊन, अगर अतिवृष्टी होऊन धुळधाणी होणें व या शिवाय अनेक आहेत. त्यांत कांहींकांचें निवारण करणें आपल्या शक्ती बाहेर होतें तेथें उपाय नाहीं व त्याप्रसंगीं रक्षणार समर्थ तो जगदीश्वरचखरा. बाकी या शिवाय मनुष्यकृतींतही पुष्कळ गोष्टी आयुष्याचा क्षय करणाऱ्या असतात. जसें अनियामित भोजन, अति निद्रा, आळस व विषयासक्तपणा. ह्मणून जे सुज्ञ असतात ते त्यापासून अलग रहातात व दीर्घकाल सुखें नांदतात. आणि अज्ञानी त्याचे बाह्य देखाव्याला भुलून त्यांशीं रत होतात ते व्यसनी बनून अनेक व्याधीनें ग्रासले जातात व जर जर होऊन लवकरच यमपाशांत अडकतात. तसें न घडावें ह्मणून कोणतेंही व्यसन आरंभापासून जडवून घेण्याविषयीं सावध असावें व ईश्वरानेंही तसें वर्तण्याविषयीं बुद्धीद्वारें सहाय्य करावें ह्मणून त्यास सहसा न विसरत शुद्ध अंतःकरणें त्याचें चिंतन करावें.

---

## वऱ्हाड

---

अलिशान रेसिडेंट साहेबांची स्वारी उष्ण काळामुळें महाबळेश्वरास गेल्याचें सहजतें.

---

एथील जुडिशियल कमिशनर मेजर बेल साहेब विलायतेस रजेवर होते ते काल मुंबईकडून येऊन थेट उमरावतीस गेले त्यांजकरितां कचेरीचे लोक वगैरे बरीच मंडळी रे. स्टेशनावर मुलाकतीस गेली होती. व आज रविवारची सुटी असल्यामुळें कांहीं मंडळी त्यांजबरोबर उमरावतीस ही गेली.

---

बुलढाण्याचे माजी लोकलफंड इंजिनियर रा. रा. रामचंद्रराव हरी शिंदे यांणीं पुण्याकडे कट्राक्टानें कांहीं कामें फार चांगलीं केल्यावरून त्यांस सरकारांनीं हल्लीं सुपरवायझर नेमलें असें कळतें.

---

( रेसिडेन्सीआर्डरवरून )

तारीख १९ मार्च १८७७.

मद्रास स्टाफकोरपैकीं मेजर सी हेटर यांस सिकंदराबादचे क्यांटनमेंट माजिस्त्रट नेमिलें.

तारीख १ माहे एप्रिल पासून हैदराबादेस रेसिडेन्सी बाजारांत सन १८६९ चे ११ वे अक्टांतील ६ वे कलमांतील स्वरूपा प्रमाणें २५० रुपयां पर्यंतच्या दाव्याचे जिकाल करण्या करितां स्माल काज कोर्ट स्थापन करण्याचा रेसिडेंट साहेबांनीं निजाम सरकारचे अनुमतानें ठराव केला. व रेसिडेन्सी बाजार सुपरइंडेंटेंट यांस स्माल काज जडजाचा अधिकार दिला.

महमद यासिनखान रेसिडेंट साहेबांचे अऱ्याची यांस रेसिडेंसी बाजार सुपरिंटेंडेंटचे असिस्टंट केले व थर्ड क्लास माजिस्त्रटचा अधिकार दिला.

पोलिस आक्ट सन १८६१चा ५वा याचें ३४वें कलम उमरावती शहराचे बाहेरील भाग राजपेठ व महाजनपुरा यास लागू केलें.

मे० दस्तुर बहिमनजी जामासजी यांस तारीख १ एप्रिलपासून अथवा ते लागू करतील तेव्हांपासून ५२दिवसांची हक्काची रजा मिळाली.

क्या० एफ डब्ल्यु ग्रांट अकोल्याच्या स्मालकाजकोर्टाचे जडज यांस तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

मेजर सी ओ मेन अकोल्याचे आफिसियाटिंग डिपुटी कमिशनर यांस खालीं लिहिलेले अधिकार दिले.

१ जिल्हा माजिस्त्रेट या नात्यानें क्रिमिनलप्रोसिजर कलम ३६ प्रमाणें त्यांच्याकडे जे मुकदमे येतील त्यांची चौकशी करण्याचा अधिकार.

२ जिल्हा जडज या नात्यानें दिवाणी दावे त्यांच्यापुढें येतील ते कोणत्याही स्वरूपाचे व कितीही रकमेचे असोत ते त्यांनीं ऐकण्याचा व ठराव करण्याचा अधिकार.

अकोला जिल्ह्यांतील सबार्डिनेट कोर्टांच्या ठरावावर अपिलें घेण्याचा अधिकार.

जोंपर्यंत अकोला जिल्ह्याचे ते अक्टिंग डिपुटी कमिशनर आहेत तोंपर्यंत त्यानीं हे अधिकार चालवावे.

---

लोकांचें आरोग्य व पिकें यांचा फेब्रु० चा आहवाल.

अमरावती— या महिन्यांत अवकाळीं पाऊस पडल्यानें जिल्ह्यात कांहीं कांहीं भागांत पिकें बिघडलीं असें रिपोर्ट आले आहेत. कांहीं गावांतून लोक थंडीनें व खोकल्यानें बेजार आहेत. गुरांस कांहीं रोग नाहीं.

वणी— रबीचीं पिकें गहू, लाख, जवस यांची कांहीं भागांत कापणी चालू आहे व कांहीं ठिकाणीं पुरी झाली. पोटदुखी, देवी, आणि ताप यांची सांथ बहुतेक तालुक्यांतून आहे. हवा थंड आहे.

अकोला—गारा व अवकाळीं पाऊस यांनीं पिकाचा बराच नाश केला ह्मणतात, लोकांचें आरोग्य चांगलें आहे. अकोला, जळगाव, व बाळापुर तालुक्यांत देवीची सांथ आली आहे. हवा सर्द आणि साभ्र आहे.

बुलढाणा— रबीची कापणी वेचणी संपत आली. लोकांस सितज्वराचा आणि मुलांस देवी, गोवर, कांजण्या यांचा आजार उद्भवला आहे. गुरांना कांहीं रोग नाहीं. आकाश साभ्र असून वारा वायव्य कडील असतो.

वाशिम— रबीची कापणी वेचणी चालू आहे. लोकांस आरोग्य चांगलें आहे. गुरांस आजार नाहीं आकाश साभ्र असतें.

---

जळगाव तालुक्यांत जामोद एथें रा. बळवंत गणेश सोमण म्हणून एक असिस्टंट मास्तर आहेत ते मुलांस कसरतीचे खेळ चांगले शिकवितात. तेणेंकरून कांहीं शाळेंतील व कांहीं बाहेरील मुलें बरींच तयार झालेलीं आहेत. नुकतेच गाववाल्यांनीं त्यांची कसरत पाहून ६ रु. त्यांस बक्षीस दिले. व रा. रा बापूजी यादव देवी खात्याचे सुपरिंटेंडेंट याणींही मुलांच्या कसरती पाहून त्यांस बक्षीस दिलें असें एक पत्र आल्यावरून समजतें.

---

उमरावती एथें तारीख २९ मार्च सन १८७७ इसवी रोजीं प्रातःकाळीं ८ वाजण्याचे सुमारास तेथील हाय स्कुलांत मोठा समाज जमला होता त्या वेळीं युरोपियन आफिसर व त्यांच्या स्त्रिया व नेटिव मंडळी मिळून ४शावर मंडळी जमली होती. मे० कर्नल निंभार्ड साहेब कमिशनर लवकरच नोकरी सोडून विलायतेस जाणार ह्मणून तेथील हिंदू व मुसलमान मंडळीनें त्यांस पान सुपारी देण्याकरितां बोलाविलें होतें. कमिशनर साहेब व त्यांची मडम साहेब यांजकरितां एक छंच अशी स्वगंत्र जागा चांगली तयार केलेली होती व त्यांचे बाजूस युरोपियन लोक व मडमा बसल्या होत्या. डायरेक्टर साहेब रा. ब. नारायण भाई हेही तेथें होते व जें मानपत्र ह्मणून तयार करून छापलेलें होतें तें मंडळीनें राव बहादूर यांजकडून वाचविलें. नंतर एका मुसलमान सभ्य गृहस्थानीं उर्दू भाषेंत लिहिलेलें मानपत्र वाचलें. व एक मराठींत रा. रा. चिंतो पंत केळकर यांनीं वाचलें. हीं तिन्ही सन्मानदायक पत्रें प्रौढीनें लिहिलेलीं होतीं. कमि. सा. ही थोडेंसें बोलले. परंतु ते हा देश सोडून जाणार ह्मणून त्यास इतकें अवघड वाटलें कीं जास्त बोलवेना. नंतर हार तुरे वगैरे होऊन सभा विसरजन झाली.

कर्नल नेंभार्ड सा. आज बऱ्याच वर्षां पासून या मुलखांत मोठे कामगार आहेत. व कमिशनरचे जागीं आज सुमारें १० वर्षें आहेत. त्यांणीं जी लोकप्रीति संपादन केली त्याबद्दल त्यांचा अशा प्रकारचा सत्कार होणें ही खचीतच मोठ्या भूषणाची गोष्ट आहे.

मे. नेंभार्ड साहेबांच्या भेटीकरितां बाहेरून मे. डायरेक्टर साहेब मे० एजुकेशनल इन्स्पेक्टर साहेब व बहुतेक तहशिलदार वगैरे कामदार लोक आले आहेत.

---

देउळगाव राजा—मित्राकडून ता. २८।३

च्यार पांच दिवस झाले मेहेरबान डेपुटी ए. इन्स्पेक्टर साहेब जिल्हे बुलढाणें यांची स्वारी येथें आली होती. तीन च्यार मुक्काम करून काल निघून गेली. एथील सर्व शाळांची परीक्षा झाली. उष्णता बरीच भासू लागली आहे. पण आज पासून अवडंबर घातलें आहे. या सालीं आठ दहा दिवस झालें कीं एक तरी लहानसा पाऊस पडतो. पुढें काय होईल समजत नाहीं.

गावांत रामनवमीचे संबंधानें एथील प्रामस्थ जोशी लोकांनीं नाटक केलें. तीन च्यार दिवस उत्साह चालला होता. नाटक पात्रांतील संभाषण अप्रतीम होतें व योजना तर फारच उत्तम. नारायणराव पेशवे यांचा फार्स केला त्यांत नाना फडणवीस यांस सखारामपंत बापू भेटावयास आले तेव्हां ह्मणालें कीं 'नाना चरणाप्रत वंदन करतो'. मग नाना ह्मणालें 'तुजप्रत कल्याण असो'. अशा बहुत देण्यासारख्या टुमा पहाण्यांत आल्या. भाषणाचा वेग हरासा सारखा होता तेणेंकरून दिल फार खुष झालें.

---

## वर्तमानसार

सन १८७५ सालांचे आखेरी पावेतों विलायतेंत १३६५४२० टन लोखंड १५,६४,५७,७४० रुपये किमतीचें तयार झालें. त्याचप्रमाणें तांबें ४३२२ टन किमत रुपये ३८,८९,८३०, शिसें ५७४३५ टन किमत १,२९,०३,७३० रुपये; जस्त १८१३ टन किमत रुपये १६२७९००; कथीलापासून चांदी काढली ती ४,८७,३५८ औन्स किमत रुपये ११,५७,४७० व सोनें ५४८ औन्स किंमत रुपये २१,०५०. एकंदर उत्पन्न ६७४८७६८८०. इतका कोळसेखेरीजकरून खाणीपासून माल उत्पन्न केला.

अहमदाबाद एथें भयंकर आग— गेल्याचे मागील शनिवारी सुमारें सात वाजल्यावर आग लागली ती गेल्या रविवारी नऊ वाजल्यानंतर विजली. सुमारें २५० घरें जळालीं व सहापासून दहा लक्षपर्यंत नुकसान झालें. एक मनुष्यही मेलें.

इराणांत एका गांवीं सहा मैल लांब व चार मैल रुंद अशी सोन्याची खाण सांपडली आहे. त्या खाणींतून वर्षास पंचवीस कोटीचें सोनें निंघेल असें ह्मणतात इराणच्या शाहानीं त्याजवर काम लाविलें आहे व बंदोबस्त केला आहे.

टर्कींत लढाईची तयारी—का. च्या ता० २४ च्या तारेवरून असें कळतें कीं, टर्की लोकांनीं रशियाच्या सरहद्दीवर चांगले भक्कम बंदोबस्ताचे पहारे ठेविले आहेत. एरजेरूम व वटून येथें लढाईच्या तयाऱ्या चालल्या आहेत. बोसनियामध्यें द्वेषबुद्धीनें तंटे पुनः सुरू झाले आहेत.

इं. प्र.

---

## हिंदुस्थानांतील दुष्काळाबद्दलचें विलायेंतंत व्याख्यान.

विलायेंतंत ईस्टइंडिया असोशिएशन सभेपुढें ता. २८ फेब्रुवारी रोजीं 'हिंदुस्थानांतील दुष्काळ' या विषयावर मि. एलियट यांनीं निबंध वाचला. या प्रसंगीं अध्यक्षस्थानीं सर जार्ज क्यांबेल हे होते. या देशांतील दुष्काळाचें संकट टळण्याकरितां सरकारास त्या व्याख्यान देणारांनीं सर्वत्र ठिकाणीं झाडें लावावीं, व पाटबंधारे विहिरी, तलाव वगैरे बांधावे असें सुचविलें आहे परंतु या सूचनेचा उपयोग चांगला होऊं लागल्यास ४० वर्षें लागतील असा एलियट साहेबांनीं अजमास केला. आतां हिंदुस्थानांत तर दर तीन चार वर्षांनीं दुष्काळ पडावयाचाच अशी स्थिति आहे. यास्तव या दुष्काळाचें संकट निवारण करण्यास मार्ग व्हावा एतदर्थ सरकारानें नेहमीचा चालू खर्चच कमी करण्याचा विचार केला पाहिजे. सरकारानें पब्लिक वर्क्स खात्याकडील लोकोपयोगी कामाचा खर्च पुष्कळ कमी केला पाहिजे. त्याप्रमाणेंच आगगाडीचे रस्ते करण्याकरितां कर्ज काढण्याचा प्रकार चालवूं नये. तसेंच मद्रास व मुंबई यांतील मोठी खर्चाची व्यवस्था आहे ती कमांडर इन चीफसुद्धां एकंदर राज्यव्यवस्थेस धक्का न बसतां कमी करावी. काळ्या फौजेपैकीं पुष्कळ लोक अर्ध्या पगारानें रजेवर घरीं पाठवावे आणि वर्षांतून एकदां सर्वांस लश्करांत हजर करावें ह्मणजे फौजेची योग्यता कमी होणार नाहीं. शिवाय, हिंदुस्थान देशांत सरकारास जें सामान लागतें तें हिंदुस्थान सरकारास जेथें स्वस्तदरानें मिळेल तेथें घेण्याची मोकळीक असावी ह्मणजे पुष्कळ पैसा वांचेल. युरोपियन गोरी फौज हिंदुस्थानांतील फौज ह्मणूनच स्वतंत्र करून तिजमध्यें भरती करावयाची ती विलायेंतील प्रस्तुत चालू असलेल्या प्रकाराप्रमाणें न करतां अल्प खर्चानें करावी. तसेंच हिंदुस्थानास जें कर्ज आहे त्याची जोखीम इंग्लंडच्या सरकारानें घ्यावी ह्मणजे व्याजाची रकम पुष्कळ कमी होईल आणि त्यांत इंग्लंड देशावर कांहीं अधिक जोखीम पडेल असें नाहींच. याप्रमाणें त्या व्याख्यान देणारानीं आपल्या निबंधांत सुचविलें आणि पुढें जो वादविवाद झाला व जीं भाषणें झालीं त्याजवरून एलियट साहेबांचें ह्मणणें सर्वांस पसंत पडलें. आतां या सूचना उत्तम व विचार करण्यासारख्या आहेत. याप्रमाणेंच कितीएक लोक व दरबारी पुरुष सांगत आले आणि राणी सरकारच्या व योग्य इंग्रज लोकांच्या मनांत या देशांतील लोकांचें हित व्हावें व त्यास सुखप्राप्ति व्हावी असें वागत देखील असेल, परंतु सरकारच्या आप स्वार्थीं कामगारांच्या मनांत आपले नातलग, इष्टमित्र व देशबांधव यांचे चालवावयाचें असल्यामुळें त्यांचा खर्च व कर्ज वाढविण्याचा सारखा क्रम चालला आहे. इकडे आमचे दुर्दैवी लोक मात्र अतिशय दरिद्री होऊन उपाशीं मरत आहेत. ईश्वरेच्छे पुढें इलाज नाहीं.

इं. प्र.

---

## मजूरांचा दर उतरण्याचीं टेम्पल साहेबांचीं कारणें.

सर रिचर्ड टेम्पल साहेब लिहितात कीं, मनुष्याचा जीव व शरीर यांचें योग्य संरक्षण करण्याचे संबंधानें वैद्यशास्त्राचे आधारानें जे कांहीं नियम केले आहेत ते नवीन आहेत व त्यांचा या देशांतील लोकांत प्रचार नाहीं तेव्हां ते हल्लींच्या प्रसंगीं लागूं करण्याचें कारण नाहीं. जीव व शरीर यांच्या संरक्षणाचे संबंधानें मद्रास एथील डाक्तर कार्निश साहेबांनीं एडिंबरो एथील जीं उदाहरणें दिलीं आहेत तीं फक्त युरोपियन लोकांस मात्र लागू आहेत. नेटिवांस लागू नाहींत. टेम्पल साहेब लिहितात कीं, थंड हवेंत शरीरास फार झीज येते ह्मणून तिकडेस अन्नही फार लागतें. तसा या हवेंत प्रकार नाहीं. ह्मणून मजूरास हल्लीं देत असल्यापेक्षां अधिक पोटिया देण्याचें प्रयोजन नाहीं. कार्निश साहेबांच्या मताप्रमाणें सशक्त मनुष्यास साठ रुपये भार अन्न पाहिजे व ज्यांस सर्व दिवस एकसारखी मेहनत करावी लागते त्यांस पुरे दोन पौन्ड अन्न पाहिजे. टेम्पल साहेब लिहितात कीं मजूरी बद्दल हल्लीं एक पौन्ड धान्य व दोन पैसे मजूरास मिळतात ते बस आहेत. कारण कार्निश साहेबांचें ह्मणण्याप्रमाणें दोन पैशांत मीठ मसाला व लांकडे खेरीज करून आणखी धान्यही घेण्यास सवड रहात असेल तेव्हां कार्निश साहेबांचे ह्मणण्याप्रमाणें दीड पौन्ड मजूरास धान्य मिळतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं असें टेम्पल सा. लिहितात. एन्जिनियर लोकांनां एका दिवसाचें नेमून दिलेलें काम ज्या लोकांस करावें लागतें त्यांस हल्लींच्या दरापासून पोटभर अन्न मिळावयाचें नाहीं असा कार्निश साहेबांचे लिहिण्याचा मुख्य मुद्दा आहे त्याचा टेम्पल साहेब जबाब देतात कीं मजूरीचे नियम घालून दिले आहेत खरे परंतु त्याप्रमाणें मजूर लोक काम करतात असें नाहीं तेव्हां त्यास दीड अथवा दोन पौन्ड अन्नाची जरूर आहे असेंही नाहीं. जे मजूर लोक नेमून दिलेलें काम बहुतेक करतात त्यांस एक पौन्ड धान्य व एक आणा या प्रमाणें मजूरी देतात व ही कार्निश साहेबाच्या ह्मणण्याप्रमाणें आहे. टेम्पल सा. अखेरीस लिहितात कीं मजूर लोक जे हल्लीं कामें करतात तें मोठें श्रमाचें आहे असें ह्मणतां येत नाहीं. एकंदर लिहिण्याचा झोंक हल्लींचा सुरू केलेला मजूरीचा दर ठीक आहे असा आहे. याप्रमाणें टेम्पल सा.नीं कार्निश सा.चें ह्मणणें खोडलें आहे.

ने. ओ.

---

## नोटिस.

---

कनुलाल वल्लद पुरणलाल भुसारी अगरवाले रहाणार कसबे अकोट तालुके मजकूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिसीचें उत्तर देण्यांत येतें कीं, तुह्मी तारीख १६ फेब्रुवारी सन १८७७ इसवीची नोटिस दिली कीं, पन्नास खंडी जवारी लावणी तुह्मी आणि रतनसिंग वल्लद अज्यानसिंग रजपुत असे उभयतांनीं तारीख १४ अक्टोबर सन १८७६ इसवी रोजीं सवदा दर खंडीस रुपये १९ प्रमाणें करून इसाराबद्दल प्रत्यकाणीं पंचवीस रुपयेप्रमाणें पन्नास रुपये घेतले त्याचा सट्टा लिहून द्यावे वगैरेची दिली ती काल तारीख १८ माहे मार्च सन १८७७ इसवी रोजीं पावली त्याप्रमाणें कांहींच मजला देणें नाहीं. सदर्हू सवदा मी मुळींच केला नसून नोटिशी प्रमाणें मजला कांहींच देणें नाहीं. सदरील रतनसिंग यांणीं मजला बोलाविलें ह्मणून मी सवद्याचे ठिकाणीं होतों इसाराचेही रुपये मी घेतले नाहींत. बाजारांत जसे चार लोक होते. तसाच मीही होतों आणि हा सवदा माझेशी नाहीं ही गोष्ट सर्व ठिकाणीं त्रयस्त लोक होते त्यांनां सुद्धां माहित आहे अशी फाजीलपणाची नोटिस दिली. हल्लीं एक वेळ गई केली नाहीं तर जबाब देण्यास अडचण पडली असती. कळावें. तारीख १९ माहे मार्च सन १८७७ इसवी.

( सही ) रामसिंग भवानसिंग रजपुत
रहाणार अकोट
दस्तुर खुद्द

---

नोटिस.

कनुलाल वल्लद पुरणलाल आगरवाले भुसारी रहाणार कसबे अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येतें कीं ता० १६ फेब्रुवारी सन १८७७ इसवी रोजीं ५० खंडी जवारी लावणी दर खंडीस भाव १९ रुपयेप्रमाणें देण्याचा सवदा तुह्मी आणि रामसिंग वल्लद भवानसिंग रजपुत रहणार अकोट असे उभयतांनीं ता. १४ अक्टोबर १८७६ इसवी रोजीं बाजारांत केला त्याचा सट्टा लिहून दिला नाहीं वगैरे मजकुराची दिलेली नोटिस पावली त्या प्रमाणें कांहीं देणें नाहीं.

सदर्हू सवदा रामसिंग हा आणि मी असे उभयता मिळून तुमच्यासी केला नसून मी एकट्यानेंच केला व इसाराचे रुपये घेतले आणि मग ता. १७ अक्टोबर सन १८७७ इसवी रोजीं मी आणि तुह्मी मिळून कचेरींत सट्टा लिहिण्यास गेलो आणि मी वकिलास सट्टा लिहिण्याचें विचारलें तर त्यांनीं सांगितलें कीं याचा सट्टा नसतो. पाहिजे असल्यास चिठ्ठी लिहावी. त्या वेळेस मी हें तुमचेपाशीं सांगितलें तेव्हां जवारीचा भाव मंदा असल्यावरून सवद्यांतून तुह्मी निघून गेले आणि इसाराचे रुपये सोडले. आतां जवारी तेज झाल्यावरून तुह्मी खोटी नियत धरून नोटिस दिली पण मला कांहींच देणें नाहीं. सवद्यांतून तुह्मी निघाले ते वेळेस कचेरींत आणखी चार भले माणस होते त्यांनां सुद्धां माहित आहे. माझा नोटिशीस लागलेला खर्च तुह्मास द्यावा लागेल आणि सट्टा लिहून देण्यास मी नाराज झालो तर तेव्हांच नोटिस तुह्मी कां दिली नाहीं? यांतही तुमचा खोटेपणा सहजी दिसतो. ळकावें. तारीख १९ माहे मार्च सन १८७७ इसवी.

( सही ) रतनसिंग वल्लद सुजानसिंग
वस्ती कसबे अकोट.

---

## जाहिरात.

विक्रीस तयार.

## जमाखर्चाची पद्धती.

( कीर्द खतावणीसहित प्रश्नोत्तर रूपानें. )

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति गेल्या आगष्ट महिन्यांत काढिली ती सर्व खपल्यामुळें हल्लीं तिसरी आवृत्ति छापिली आहे. या आवृत्तींत कांहीं जास्त प्रश्न घालून पूर्वींच्या प्रश्नांत बरीच सुधारणा केली आहे; त्याचप्रमाणें पुस्तकाचे शेवटीं जो कीर्द खतावणीचा नमुना आहे त्यांतही विशेष सुधारणा केली आहे. पुस्तक उत्तम टाइपांनीं जाड कागदांवर सुरेख छापिलें आहे. मेहेरबान डायरेक्टर साहेब यांणीं हें पुस्तक पाहून पसंत केलें आहे व त्यास आपला उदार आश्रयही दिला आहे. या पुस्तकापासून सहाव्या यत्तेची परिक्षा देणारे उमेदवारांस व इतर हिशेबी लोकांस फारच उपयोग होणार आहे. या पुस्तकाची, तारीख १५ माहे मे सन १८७७चे आंत घेणारांस, किंमत टपाल खर्चाशिवाय साडेसहा आणे व पुढें घेणारांस, आठ आणे पडेल. टपालांतून नेणारांस दरप्रतीस एक आणा जास्त पडेल. किंमतीबद्दल तिकिटें पाठविणें झाल्यास अर्ध आणा दराचीं वर्ताळ्यासह खालीं सही करणाराचे नांवें पाठवावीं.

तारीख १६ माहे मार्च सन १८७७.

वासुदेव बाळकृष्ण लोटलाकर.
रत्नागिरी.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 6,1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० ८ माहे एप्रिल सन १८७७ इ० अंक १४

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहांशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा

बापू वल्लद हरी पाटील कारभारी राहणार तळेगाव प्रगणे पातुर्डे तालुके अकोट यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचीं शेतें हते येथील सर्वे नंबर १९३।१९९ आकार ९३ यांत माझी भागीन ८=आण्याची असोन भागिणीबुकास नाव आहे. सालमजकुरीं तहशिलदाराचे हुकूमानें कपासी पेरली व एक दिवस वेचली ती एक खंडी तीनमण, बाकी वेचावी इतक्यांत तुह्मी पोलिसांत फिर्याद करून सर्व माल तुह्मी रबीसुद्धां नेला. हा माल नेण्यास तुह्मास हक्क नवता ह्मणून या नोटिसीवरून अशी सूचना देण्यांत येते कीं कपासीखंडी ४।२ आकार १९५०१२, गहू एकखंडी ५०, जवस १ खंडी ७०, कर्डीचे ३०४ कुटाराचें १० येकूण ३२९ तीन शें येकूणतीस रुपयांचा आमचा माल नेला याचा आठ दिवसांत उलगडा करावा नाहींपेक्षां दिवाणींत फिर्याद होईल. याचें आठ दिवसांत उत्तर द्यावें. कळावें. तारीख २९ माहे मार्च सन १८७७ इसवी.

( सही ) नारायण वल्लद एकोजी
निशाणी खुद.

नोटिस

रंजाजी वल्लद अनाजी काळे रहाणार मुंडगाव तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी मुंडगाव एथें माझे घरामागे माझी पडीत जागा होती ती रहाण्यास मागून घेतली त्यास सुमारें आठ वर्षे होत आलीं. हल्लीं त्या जागेवर तुह्मी धावें बसवून जागा आपलीसी करून घेणार अहात असें मला समजलें तर तुह्मी धांवें बसवूं नये. आणि ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत जागा रिकामी करून द्यावी जर तुह्मी धावें घाईनें बसविलें तरी त्याचीं लाकडें उकलून न्यावीं लागतील. व त्याचा खर्च ही तुह्मासच सोसावा लागेल. आह्मी जबाबदार नाहीं या शिवाय कोर्टखर्च व या नोटिसीचा खर्च असा तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख १ एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) अमराजी वल्लद विष्णाजी
वाठोळकर वस्ती मुंडगाव
दस्तुर खुद

नोटिस.

रावजी वल्लद श्रावण पाटील मौजे वालंपी तालुके अकोले यास विक्रमजी कडून उत्तर देण्यांत येतें कीं, तुह्मी वऱ्हाडसमाचार पत्रांत तारीख १८ माहे मार्च सन मजकूरची नोटिस देऊन लिहिलें कीं, तीनशें रुपया ऐवजी गहाण ठेविलेले झाडांवरील अंबे उतरून नेले वगैरे मनमानेल तितकीं फलें व त्याचा आकार दाखवून सहाशें तीस रुपये तुह्मी बाकी काढता. हें लिहिणें तुमचें खोटें आणि बिन आधार असून तुह्मी तुमचे दस्तैवजास आतां विरुद्ध आणिता काय?

२. तुह्मी गहाणखतांत झाडाबद्दल फळाची काय काय शर्त लिहून दिली याचें स्मरण करून विचार करावा असें आह्मी तुह्मास सुचवितों.

३. आणखी तीन झाडांबद्दल नोटिशींत कांहीं लिहिलें होतें पण त्याचा निकाल मेहेरबान निकोलिट्स साहेब यांणीं केले दिवसापासून आह्मी त्याजकडे पहातसुद्धां नाहीं.

४. नोटिशीवर सही विठोबा वल्लद लक्ष्मण नावची होती पण त्याजला नोटिस देण्याचा काय अधिकार होता हें समजत नाहीं.

५. सदर्हू नोटिस देण्याला आह्मास अकोल्यास यावें लागलें. वगैरे कारणांसुद्धां ८ रुपये तुह्मी अह्मास पाठवून द्यावे. कळावें. तारीख २८ मार्च १८७७ इसवी

[सही] विक्रमजी निशाणी खुद
दस्तुर भगवान

नोटिस.

सेमा बीबी मर्द नवाजखा जमादार रहाणार दहीहंडा तालुके अकोट यांस नोटिस देणार दवलत खतु मर्द करीमखा वल्लद नवाजखा जमादार रहणार दहीहंडा तालुके मजकूर नोटिस देण्यात येते कीं, नवाजखा जमादार यांच्या पहिल्या कुटुंबाचा लेक करीमखा असोन नवाजखा व करीमखा हे दोघेही मयत झाले आहेत. हल्लीं फक्त तुह्मी, तुमचा लहान चिरंजीव हयादखा व मी करीमखाची अवरत आहे ह्मणजे तुमची सून आहे असे आपण तीन इसम जिवंत अहोंत. आजपावेतों तुह्मी व आम्ही एकत्र होतों. सर्व जिंदगी माझे नवऱ्याचे स्वसंपादित असोन देणें घेणें माझे नवऱ्याचे नावें चालत होतें. माझा नवरा मयत झाल्यानंतर माझा सासरा नवाजखा जमादार यांणींही पूर्वींप्रमाणेंच वहिवाट चालविली असतां दैवयोगानें आज ३ वर्षे झालीं तेंही मरण पावले. नंतर घरांत तुह्मी वडील अहात. सबब आजन पावेतों तुह्मी वहिवाट बरी चालविली. हल्लीं १२ महिने झाले मी आपले बापाचे घरीं होते तेथें मला समजलें कीं जिनगीचा अफरा तफर होऊन राहिला आहे सबब मी एथें आलें असून सर्व जिनगी सोनें, चांदी, नगदी रुपये, माल, पेवें, शेती, लोकांकडून येणें आहे ते व दस्तैवज वगैरे आणखी इस्टेट तुह्मी आपले ताब्यांत घेऊन मला घराचे बाहेर आज एक महिना झाला काढून दिलें. पण वरील सर्व जिनगीची मालकीण मी आहे फक्त अन्न वस्त्र खान्याचे तुह्मी मालक अहात. हल्लीं तुमची चाल रीतीप्रमाणें राहिली नाहीं. सर्व जिनगीचा अफरा तफर करीत अहात असें तुमचे वहिवाटीवरून दिसत आहे. करितां या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत माझी सर्व जिनगी माझे ताबेंत द्यावी. असें न झालें तर तुमचेवर रीतीप्रमाणें कोर्टांत फियादि करून या नोटिसीच्या खर्चासुद्धां जिनगी कबजांत घेण्यांत येईल. कळावें तारीख ४ माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

(सही) दवलतखतु मर्द करीमखा
निशाणी बांगडी.

नोटिस.

जमनाजी वल्लद गोरखू कोकणे साळी वस्ती पेठ-देऊळगांव राजा तालुके चिखली जिल्हा बुलढाणें यांस खालीं सही करणारी इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं माझे तुमच्याशी लग्न झाल्यावर तुह्मी पूर्वी संकेताप्रमाणें माझ्या आई बापाच्या घरीं घरजावई होऊन तीन महिने राहिलेत. पुढें लोकांच्या नादीं लागून कांहीं दिवसांनीं माझ्या आईबांपावर व मजवर फिर्याद फौजदारींत दोन वेळा केली. आणि कराराप्रमाणें माझे आइबापाचे घरीं न रहातां निराळे राहूं लागल्यावरून तुह्मास माझा संसार करणें नाहीं अशी माझी पक्की खात्री झाली आहे. तरी ही नोटिस पावतांच तुह्मी कराराप्रमाणें माझे जवळ येऊन रहावें त्यांत उभयतांचें हित आहे.

घरीं घरजावई होऊन रहाण्यास कबूल असल्यास तुह्मी लोकांचे नादीं न लागतां व मला हान मार न करितां व माझे जिवास धक्का न देतां आणि लोकाचे देणें माझे येथून निघाल्या पासून जें झालें असेल तें फेडून ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत माझ्या घरीं आलें पाहिजे. न आल्यास माझ्यावर तुमचा हक्क रहाणार नाहीं, व मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन. माझा संसार तुह्मास करणें नसल्यास लग्न लागल्याच्या अगोदर मी तुमचे रुपये देणें फेडिले तें, व लग्नाचा खर्च रुपये १५० दीडशें एकूण रुपये १७० नोटिस पावल्या पासून पंध्रा दिवसांचे आंत द्यावें. न दिल्यास कायद्या प्रमाणें कोर्टांत फिर्याद करणें भाग पडेल ही नोटिस मी लाच्यार होऊन दिली आहे. कुबुद्दीनें दिली नाहीं हें ईश्वरास ठाऊक आहे. कळावे. तारीख २८ माहे मार्च सन १८७७ इसवी.

( सही ) रमाई मर्द जमनाजी कोकणे
साळी दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आज प्रात:काळीं ९ वाजतां एथील स्कूल कमेटीचे प्रेसिडेंड रा० रा० विनायकराव देशमुख यांणीं एथील सरकारी शाळेंत वार्षिक समारंभ केला. सुमारें २०० लोक जमले असून शाळेंत ५० मुलें हजर होतीं. सर्व लोक जमल्यावर विनायकराव यांचे चिरंजीव रा. रा. अमृतराव जे हल्लीं सब रजिष्ट्रार आहेत यांणीं मुलांची परीक्षा घेतली. पहिले वर्गाची परीक्षा तिसरे यत्तेप्रमाणें घेतली, दुसऱ्याची दुसरे यत्तेप्रमाणें, आणि तिसऱ्याची पहिले यत्तेप्रमाणें परीक्षा घेतली. मुलें चांगलीं हुशार दिसतात. मास्तर मेहेनती आहेत. ही शाळा लोअर क्लास पहिले ग्रेडची आहे. यांत अभ्यास चवथे यत्तेचा असला पाहिजे परंतु मुलांचा सर्व भरणा अगदी नवा असून मुलें फार अज्ञान आहेत. चवथे यत्ते करितां मुलें लवकरच तयार होतील अशी उमेद आहे. परीक्षा झाल्यानंतर प्रेसिडेंट यांणीं १० रुपयांची वर्गणी जमवली ती:-

| | |
|---|---|
| रा. रा. विनायकराव देशमुख | २०८ |
| ,, नारायण हरी पंडित हे. मा. | १०८ |
| ,, बाळकृष्ण गणेश देशपांडे | १ |
| मिरतर लुत्फुल्ला शेट | १ |
| ,, प्यारमहमद सौदागर | १ |
| ,, अमीरमहमद | ०८ |
| रा. रा. हैबती चौधरी | ०८ |
| ,, भगवान सिंह रजपूत | ०८ |
| ,, हरीसिंह रजपूत | ०८ |
| ,, गोरखू पाटील सोनाणी | ०८ |
| ,, जानजी जंजाळ | ०८ |
| | १० |

या प्रमाणे दहा रुपये वर्गणी जमा होऊन त्यापैकीं ६ रुपयांचीं बुकें व ४ रुपयांच्या गांठ्या सर्व मुलांस वाटल्या. नंतर

अमृतराव यांणीं हल्लींचे काळास अनुसरून
लोकांचे आचरणांत, जो स्वभावेंच फरक
पडला आहे. याविषयीं रचलेलें भाषण
एका मुलाकडून वाचविलें. भाषणांतील
सर्व मुद्दे भाषणविषयास अनुसरून बरेच
स्पष्ट करून दाखविले होते. हें झाल्यानंतर
नमलेल्या सर्व लोकांस हार, तुरे, विडे,
अत्तर वगैरे देऊन सभाविसर्जन झाली.
यावरून येथील देशमूख यांस शाळेची ब
रीच काळजी आहे असें दिसतें. आलि
शान रेसिडेंट साहेब यांणीं अकोल्याचे
समारंभांत जीं सर्टिफिकिंट वाटून दोन
राहिलीं होतीं त्यापैकीं एक याच विनायक
राव देशमुख याचें होतें.

एडिटरराव, शाळाखात्यापासोन वऱ्हा
डांतील लोक, सुधारणेच्या पंथास लागेना?

आपला एक बातमीदार

ब.

## नोटिसा

रामजी वल्हद मुरडाजी सुतार हल्लीं
वस्ती हतें तालुके बाळापुर यांसी खालीं
सही करणार याजकडून देण्यांत येते कीं,
आमची खातेबाकी तुम्हाकडे होती त्यांत
बैलाची जोडी १ व शेत १ तुह्मी आह्मा
स विकत दिलें त्याबद्दल तुह्मी आह्मास शे
त आमचे नावेंच करून दिलें नाहीं तर
ही नोटिस पावतांच आठ दिवसाचे आत
आमचे नावे नंबर करून द्यावा. व खाते
बाकीबद्दलचा उलगडाही करावा जर ना
हीं कराल तर आह्मी तुह्मावर योग्य फिर्या
द करून आमचा निकाल करून घेऊ व
या नोटिशीस जो खर्च लागेल तोही तु
ह्मास द्यावा लागेल कळावे तारीख ६ मा
हे एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) माधवराव चुणिलाल दस्तुर
मिठाराम गुमास्ता रहाणार निं
बे तालुके बाळापूर दस्तुर
खुद.

### नोटिस

बापू भट बिन हरभट जोशी रहाणार
मौजे निंबे तालुके बाळापुर जिल्हे अकोलें
यांस खालीं सही करणार याजकडून नोटि
स देण्यांत येतें कीं सालमजकुरीं जवारी-
ची तिखी होण्याचा प्रसंग आला त्या वेळीं
तुमशी आमशीं जवारीचा सवदा दर खंडी
३९ रुपये प्रमाणें दोन पेवें त्यांत लाख
थोडी बिनमोजी दर ४० रु. चार शेरी
पायलीचे २९ खंडीचे ठरून आह्मी त्याब-
द्दल तुह्मास ३ रुपये विसार दिला. सदर्हू
आह्मास देऊ केलेली जवारी आह्मी अट
काव करीत असतां दुसऱ्यास तुह्मी जवारी-
नें विकली व पेठेंत त्या तशा जवारीचा
भाव ६९ रुपये खंडीप्रमाणें झाला होता.
या भावाप्रमाणें आमचे नफ्याचे ७९० रु
पये तुह्माकडून जवारीचे येणें आहेत. व
लाखेबद्दल नफा ६ रुपये आह्मास दिले ही नो
टिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत पा
वते करावें असें न केल्यास योग्य कोर्टांत
फिर्याद करून नोटिसीचे खर्चासुद्धां रकम
भरून घेण्यांत येईल. कळावें तारीख २
माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

[ सही ] नानराव वल्हद दिनानी दे-
शमुख रहाणार मौजे निंबे

### नोटिस.

तुळशी मर्द विठोबा म्हाली रहाणार
मौजे टेंभुरणें तालुके खामगाव इला खालीं
सही करणार याजकडून नोटिसीचें उत्तर
देण्यांत येतें तें येणेंप्रमाणें:—

लग्न झाल्यापासून तूं आमचे घरीं असू
न तुला ३ मुलें झालीं व २ मुलें मयत हो
ऊन एका मुलीचें लग्नही झालें आहे. असें
असतां तूं लिहितेस मी २९ वर्षे टाकिलें
त्यावरून हीं मुलें कोणाची असावीं न जा-
णो. गेल्या कार्तिक महिन्यांत तूं आमचे
एथून आह्मास न विचारतां पळून गेलीस
त्यानंतर मी तुला आणण्याकरितां आलो
असतां तूं आली नाहींस याला पंच साक्षी
दार आहेत तें पंच जानजी देठें व महादु
पिशे यांस सर्व माहित आहे. तसेंच तूं पं
चाईतीचे वेळचे लिहिलें तर पंचाईत झा
ल्यापासून मी तुला चांगल्या रीतीनें वाग-
विलें व मी दुसरी बायको केली आहे तिचा
ही सांभाळ करीत असून हल्लीं ती प्रसूत
होण्याकरितां माहेरीं गेली आहे. दुसरें तुझें
मागणें सोडचीठीचें आहे तर तुला सोड
चिठी मजपासून मिळणार नाहीं कारण प्र
तिज्ञेनें सांगतों कीं तुला चांगल्या रीतीनें
वागाविण्यास मी तयार आहे करितां तुला
नांदणें असेल व माझा गरिबाचा संसार क
रणें असेल तर १९ दिवसांत माझे घरीं
यावें. यापमाणें न आल्यास रीतीप्रमाणें तें
जबीज करीन. कळावें तारीख ७ माहे ए-
प्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) विठोबा वल्हद महादू म्हाली
रहाणार हिंगणें ता. खामगाव
दस्तुर खुद्द

# वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र वद्य १० शके १७९९

## हैदराबादेस कापसाची गिरणी

कलाकौशल्याचीं यांत्रिक कामें जेथें सु
रू होऊं लागलीं तो भाग विशेष उदया
स येण्याचा निश्चितार्थ झाला असें ह्मटलें
पाहिजे. मुंबईस यांत्रिक कामें हल्लीं किती
सुरू आहेत व त्यामुळें तेथील स्थिति क-
शी उच्चावस्थेस आली आहे हें सहजी स
र्वांचे लक्षांत येईल. आमची हैदराबाद ह्म
णजे मोंगलाईचे राजधानी शहर तेथें अ-
शीं कलाकौशल्याचीं यंत्रें सुरू झालीं ह्मट
लें ह्मणजे नेटिव संस्थानाचें नष्टचर्य संप
ण्यास आरंभ झाला असा त्याचा अर्थ सम
जला पाहिजे. अशी प्रत्येक नेटिव संस्था
नांतून यांत्रिक कामें सुरू होतील तर कि
ती चांगली गोष्ट होईल.

हैदराबादेस निजाम सरकारानीं ही का
पडाची गिरणी आणविली. हिच्या इमार
तीचें काम २ वर्षे चालू होतें. तें नुकतेंच
पुरें झालें. व यंत्रें वगैरे सर्व नीट नेटकीं
लाऊन ता. २३ मार्च रोजीं काम चाल
विण्याची सुरुवात केली. तो समारंभ फा-
र मोठा झाला. हुसेन सागर तलावाच्या
खालच्या बाजूस हा कारखाना सज्ज केला
आहे. तेथें त्या दिवशीं छावणींतील बहुते-
क साहेब लोक व त्यांच्या स्त्रिया यांस आ
मंत्रणें केलीं होतीं त्याचप्रमाणें शहरांतील
ही नेटिव सभ्य गृहस्थ बोलाविले होते. फ
र्स्ट असिस्टंट रेसिडेंट मेजर स्मिथ साहेब
हीं या समारंभास होते. निजाम सरकार ये
ण्याचा विचार होता परंतु उष्णकाळामुळें
त्यांचें समारंभास येणें झालें नाहीं मग दि-
वाण सा. सर सालरजंग यांनींच समारंभ
साजरा केला. व सुमार १०० युरोपियन
लोकांस मोठी मेजवानी दिली. त्या प्रसंगीं
दिवाण साहेबांनीं थोडक्यांत संभाषण के
लें त्यांतील तात्पर्य असें:—

हैदराबादेंत अशा प्रकारचा यांत्रिक
कारखाना हा पहिलाच होय. निजामसर
कारचे राज्यांत दुसऱ्या प्रकारचे कित्येक
कारखाने आहेत. जसे वरंगुळचा सतरंज्या
चा कारखाना, कलबुर्ग्याचा जरतारेचा
कारखाना, तसाच बेदरचा लोखंडाचा
कारखाना इत्यादि आहेत, परंतु त्यांची
प्रस्तुत भरभराट नाहीं व मालाचा खप
नाहीं. आणि विलायती धाटणीवर तिक
डील यंत्र आणून मांडलेला हा कारखाना
पहिलाच होय व याला तेजी चांगली
आहे ह्मणून आह्मी ही मोठी आनंदाची
गोष्ट समजतों. व आशा बाळगतों कीं,
आज सुरू केलेला हा वस्त्रें विणण्याचा यां
त्रिक कारखाना चांगले भरभराटीनें चाले
ल व त्यांस चांगला फायदा होईल.

त्यावर मे० स्मिथ साहेबानींही समर्पक
व चांगलें उत्तर दिलें. व यंत्रें पाहून सर्व
मंडळी संतोषित होऊन परत गेली. या
समारंभास दिवाण साहेबांचे उभयता पुत्र,
मकरूम उदवला बहादुर, मतशाम उदव
ला बहादुर, समशेरजंग बहादुर, साहिबजंग
बहादुर, खाजेपादशहा बहादुर इत्यादि पु
ष्कळ मंडळी आली होती.

### स्वामी दयानंद सरस्वती यांचा शिष्य.

पंडित शामजी कृष्णवर्मा हे मुंबईचे
आर्य समाजाचे तर्फे नाशकास गेले होते.
तेथें तारीख १।२ एप्रिल रोजीं संध्याका
ळीं इंग्रजी शाळेंत संस्कृत भाषेंत त्यांनीं
दोन व्याख्यानें दिलीं. मंडळी बहुत न
मली होती. शास्त्री, पंडित हेही आले
होते; परंतु या पंडिताशीं वाद करण्याजो
गें सामर्थ्य कोणामध्येंही नव्हतें. बहुतकरू
न सर्वांनीं त्यांस शाबासकी दिली. त्यांचें
व्याख्यानांतील सारांश असा होता कीं,
वेदाशिवाय बाकी सर्व प्रमाणें गौण आहेत
म्हणून तीं वेदाज्ञेस विरुद्ध असल्यास सो-
डावीं गुण व कर्म यांनींज्ञाती कायम होतात.
जन्मावरून किंवा वाडवडिलांचे जातीवरू-
न सिध्ध होत नाहींत. वेद पाठ करण्यास
सर्वांस अधिकार आहे. जे बुद्धिवान अस
तील त्यांणीं वेद ह्मणावा. बाळपणी लग्न
करणें हें अगदी वाईट व पाप आहे. स्त्री
चे लग्न ऋतू प्राप्तीनतर व पुरुषांचे तीस
वर्षांनंतर करावें.-पाशाणादि पदार्थांची पू
जा करूं नये. माता, पितर, गुरु अतिथी
व ईश्वर हेंच पंचायतन आहे.-जडाची पू
जा ह्मणजे आदर करणें केवळ असंभाव्य
आहे. ईश्वर एकच आहे त्यास वैदिकें मा
र्गानें भजावें. परदेशांत जाण्याची बंदी न
सावी, ज्ञानाचा संकोच कदापि करूं नये-
व स्वदेशांत मोठे बुद्धिवान असतील त्यां
चा जाती वगैरे कारणानें अनादर करूं न
ये तेच वरिष्ठ जातीचे ह्मणावे. कारण कीं
उत्तम बुद्धीचो गरज देशास आहे. मुद्रा-
चा संग्रह उत्तम वर्णांत झाल्यामुळें देश
नाशाप्रत पावला. संस्कृत भाषा व वेद अं
गोपांगासहित यांचें अध्ययन करण्याचा स
र्वांनीं उद्योग करावा याप्रमाणें त्यांचे बोल
ण्याचा आशय होता. यांचें वय सुमारें
२० वर्षांचें असून मुंबईतील शे
ट छबिलदास लल्लूभाई भंगसाली ह्मणजे
क्षत्री यांचे हे पंडित जामात आहेत.
कच्छ देशांत रहाणारे आहेत परंतु यांचा
संस्कृत अभ्यास प्रमाणस्फूर्ति व संस्कृत
भाषा सुलभ रीतीनें बोलण्याची धाटी बहुत
योग्य होती. नाशकाहून ९वे तारखेस हे
मुंबईस गेले. पुढें पुण्यास जाणार आहेत.
नंतर गुजराथेंत फिरावयाचा बेत आहे म-
ग नागपुर व वऱ्हाड प्रांतींही येतील की
सा त्यांचा विचार आहे.

## यात्रांचा मोसूम

यात्रा ह्या देशाचे हिताचे संबधानें पा
हिल्यास बाजारादाखल व्यापारास सहाय्य
करितात. तसेंच यांचे उत्पत्तीकडे गेलें तर
देवाचे उत्सव; आणि साधू पुरुषांचीं स्मा-
रककृत्यें होत तेव्हां एकंदर तीन प्रकारांतून
एकादें बलवत्तर असून दोन कमी असता
त अगर कोठें कोठें तीनही प्रकार जागृत
असतात. यात्रांचा मोसूम ह्मटला ह्मणजे
मार्गशीर्षापासून चैत्रापर्यंत. तशा आशाढां
तही कांहीं यात्रा भरतात पण चैत्रांत जि
तक्या यात्रा भरतात तितक्या बाकीच्या
अक्रा महिन्यांत आढळत नाहींत यावरून
ही व्यापाराची सोय यांत साधल्याचें दि
सून येतें व हा रिकामपणाचा महिना यांत
शेती व लग्नकार्य हीं दोन्ही बंद असतात.

फक्त या अकोल्याचे आसपास जर
यात्रा पाहूं गेलें तर पांच पन्नास मोजतां
येतील. त्यांतून बहुतेक चैत्र शुध्द १२ व
१९ या दिवशीं अनुक्रमें महादेव व भवाणी
यांच्या भरतात.

सिनखेड— म्हणून एथून दक्षिणेस ९
कोशांवर एक खेडें आहे. तेथें महादेवाचें
चांगलें देऊळ आहे. तेथें चैत्र शुद्ध ८स
महादेवाचें लग्न लागतें त्याप्रीत्यर्थ १०।१९
कोसावरून बैलगाड्यांची रेहे लागते. सं
ध्याकाळीं लग्नाचा बराच समारंभ होऊन
दोन प्रहराचे आंत सर्व खलास होतें. नंत
र चार दिवसांनीं शुध्द १२शीस नवस क

रणारे गावोगावचे लोक जमून नाडे. लाटांगण व जावळें उतरणें यांची गर्दी उडते. व गुळाच्या शेरण्यांचा कडेलोट होतो. नंतर बाजारची देवघेव होते. संध्याकाळीं फुगारे व दारूकाम सुटून कांहीं नाच गाणेंही रात्रभर होतें व दुसरे दिवशीं यात्रा बसरते. एथें गूळ मात्र १०।२० खंडी खपतो.

वेळवन—हें गाव एथून पांच सात कोसांवर आहे. तेथें मानभाव लोकांचे देऊळ आहे व त्यांत एक समाधी सारखा ओटा असून तेथें सर्व पूजा आर्पण होते. एथे मानभाव, त्यांचे भवाळू, ख्यालतमासगार व बाजारकरू व्यापारी इतक्यांचा एथें चैत्र शुद्ध पौर्णिमेस समुदाय जमतो. एथें एका दिवसांत निदान खंडी दहा मण कापूर जळतो व रात्रीं ख्याल तमासे होतात. याविषयी व उचले लोकांविषयीं ही यात्रा फार प्रसिद्ध आहे.

टाकळी—पौर्णिमा या दिवशीं लोक एथें जमतात प्रतिपदेस दुपारून गोपाळकाला होतो व रात्रीस भोजनोत्तर वहनाची मिरवणूक निघते ती खोलेश्वराचे देवळांतून निघून दुसरे दिवशीं संध्याकाळपर्यंत घरीं येते. एथें ठिकठिकाणाहून भजनाच्या दिंड्या येतात. एथें अन्नखर्च चांगला होतो. या यात्रेच्या उत्कर्षास कारण ह्मटलें ह्मणजे तेथील साधू महाराज गोविंदबाबा हे होत. यांजकडून कोणीही पांथस्थ ब्राह्मण आल्यास त्यास भोजन व एक रुपया दक्षिणा मिळते. हा त्यांचा नियम बाराही महिने चालू आहे. यात्रेचेवेळीं पाहिजे त्या अनोळखी मनुष्यांस सिधा देऊन रात्रभर ब्राम्हण व इतर लोकांच्या पंक्ती चालू असतात. असाच जन्मअष्टमीचाही उत्सव चांगला होतो. कोजागरी पौर्णिमेस "भरतभेट" हा उत्सव होत असतो.

या टाकळीस जे वर्षांतून दोन तीन वेळा उत्सव होतात यास कारण सर्वस्वी साधूमहाराज गोविंद बाबा हेच होत. हे संसारिक असून परमार्थास मोठे तत्पर आहेत आसपास याची शिष्यशाखा असून अकोल्यासही आहे. हे वयोवृद्ध आहेत. दानशूर आहेत व यांच्या साधेपणामुळें व सदय अंतःकरणामुळें त्यांची सर्वत्र कीर्ति आहे.

## वऱ्हाड

कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर मंगळवारीं तिसरे तारखेस वऱ्हाडांतून गेले. अकोल्याच्या स्टेशनावर त्यां साठीं मंडळींनीं पानसुपारीचा समारंभ केला होता. त्याप्रमाणें स्टेशनावर गाडी येतांच त्यांनीं खाली उतरून समारंभाच्या जागीं जाऊन मंडळीचा संतोष राखिला. त्यांच्या व सर्व साहेबलोकांच्या गळ्यांत पुष्पांच्या माळा घातल्या व विडे, अत्तर गुलाब, आणि तुरे दिले. साहेबबहादुरांनीं सर्वांस आदरपूर्वक क्षेमकुशल विचारिलें व शेकह्यांड करून त्याचा निरोप घेतला. तेवेळीं मंडळीस परमदुःख झालें व साहेबांचाही कंठ दाटून आला. नेंभार्ड साहेबांसारखे लोकांच्या ठिकाणीं अनुपम प्रेम ठेवणारे, मायाळू, व साधे असे सरदार वऱ्हाडास पुन्हा मिळाले तर या प्रांताचें मोठें भाग्य समजलें पाहिजे. अस्तु आह्मी साहेबबहादुरांस दीर्घायु व अखंड सुख इच्छितों.

कमिशनरसाहेबांस भेटण्याकरितां पुसदचे तहशिलदार मि० सादतमिरखा येथें आले होते. व उमरावतीहून मि० इनायत हुसेन तहशिलदार व रा. रा. केशव जयकृष्ण क्लार्क आले होते.

मि. जोन्स साहेब नागपुराहून इकडे कमिशनरच्या जाग्यावर येणार ते पुढील आठवड्यांत येतील असें समजतें.

मि. हेर साहेब असिस्टंट कमिशनर यांची अकोल्यास नेमणूक झाल्यामुळें ते एथें येऊन काम पाहूं लागले.

यवतमाळचे तहशिलदार रा. रा. अंबादास संतो व चांदुरचे तहशिलदार वामन नारायण बापट, तसेच यवतमाळचे पोलिस इन्स्पेक्टर रा. रा. कृष्णराव सखाराम हे रजा घेऊन या आठवड्यांत एथें आले होते व पुन्हा आपापले ठिकाणीं परत गेले.

मलकापुरचे व बाळापुरचे तहशिलदार रा. रा. त्रिंबकराव यशवंतराव व गोविंदराव यशवंतराव रजेवरून परत येऊन आपआपले कामावर रुजू झाले.

सरकारी नोकर ज्यांचा ३ महिन्यांचा पगार २०० रुपयांहून अधिक आहे त्यां सर्वांवर या सालीं पोलिसपट्टी बसली व ती अकोल्याचे डिपुटी कमिशनर साहेबांनीं त्या लोकांचे मार्च महिन्याचे पगारांतून कापून घेऊन म्युनिसिप्यालिटीकडे जमा करविली. तिजबद्दल कोणा कोणाची समजूत झाली नाहीं ह्मणून त्यांनीं बरीच गडबड केली असें ऐकतों.

मेजर बेल साहेब गेले आठवड्यांत मुंबईहून येऊन नीट उमरावतीस गेले होते ते मंगळवारीं कर्नल नेंभार्ड साहेबांरोबर परत एथें आले. व दोन तीन दिवस एथें राहून शुक्रवारीं पुन्हा उमरावतीकडे गेले. तूर्त कमिशनर व जुडिशियल कमिशनर हीं दोन्ही कामें त्यांकडेसच आहेत. व उमरावतीस उद्या सेशनचे मुकद्दमे आहेत असें कळतें.

उमरावतीकर रा. रा. बाळकृष्ण नाईक पेंडके यांचे घरचे लग्नसमारंभांत बंदुकीचे दारूस आग लागून कांहीं माणसें मरण पावलीं व कांहीं भाजून मरणोन्मुख झालीं त्या संबधांत दारूची बरोबर काळजी घेतली नाहीं असा पेंडके यांजवर माजिस्त्रेट साहेबांनीं च्यार्ज्य ठेवून त्यास ५०० रुपये दंड केला असें समजतें.

यवतमाळचे लोकांनीं सोलापुराकडील दुष्काळ पीडितांस मदत करण्याकरितां ४२५ रुपये जमविले व ते तिकडे पाठवून दिले. अकोल्यास जमल्या पैशाचें धान्य घेऊन पाठविण्याची तजवीज सोलापुरचे कलेक्टर साहेबांचे अनुमतानें चालू आहे.

हैदराबादेस एका लग्नसंमारंभाची मोठी तयारी चालली आहे ह्मणजे दिवाण साहेब आपली वडील मुलगी नवाब मुकरम उदवला बहादुर आपले पुतणे यांस देणार. हे मोठे हुशार, तरतरीत व नामांकित आहेत. दिवाण साहेब मागें बिलायतेस गेले होते तेव्हां व दिल्लीचे दरबारास गेले होते तेव्हां दिवाणगिरीचें यांनींच मोठ्या दक्षतेनें काम चालविलें होतें.

मद्रास इलाख्यांत करनूल जिल्ह्यांत मोंगलाईतून रोहिले लोक जाऊन लुटालूट करूं लागले आहेत. व त्यामुळें तिकडे फार गडबड चालली आहे असें कळतें.

नवा सिव्हिल्प्रोसिजर ह्मणजे दिवाणी कामाचे वहिवाटीच्या आक्टाच्या मसुद्याविषयीं हिंदुस्थानसरकारचे कायदेकौसलांत बरेच दिवस वाटाघाट चालली होती तो गेल्या २९वे तारखेस सर्वांनुमतें मंजूर झाला. व त्यावर नंबर पडला. आतां आक्टोबर महिन्याचे पहिले तारखेपासून तो अमलांत येईल.

या आठवड्यांत उर्दूअकबाराचे मालकावर मि० म्याकिंटाश साहेब यांनीं अब्रू घेतल्याची फिर्याद केली आहे. हा मुकद्दमा मि० निकोलिटस साहेब यांजकडे १८ वे तारखेस चालणार आहे.

शुक्रवारचे टाइम्स आफ इंडियामध्यें लिहिलें आहे कीं नागपुर प्रांताच्या चीफ कमिशनरचे सेक्रेटरी मि० डब्ल्यू बी जोन्स सिविल सर्व्हिस यांची नोकरी फारेन ह्मणजे परराष्ट्रीय खात्याकडे दिली आहे. हेच जोन्स आमचे वऱ्हाड प्रांतास कमिशनर येणार आहेत व यांची नेमणूक आतां हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटांत लवकरच छापून प्रसिद्ध होईल.

क्या० ग्रांट साहेब एथील स्माल काज कोर्टाचे जज्ज यांस तीन महिन्यांची रजा मिळाल्याप्रमाणें काल रोजीं ते रजेवर गेले.

## वर्तमानसार

**गिरण्या**— मुंबईत पहिली कापड विणण्याची गिरणी मि० कावसजी नानाभाई देवर नावाच्या उद्योगी पारशी गृहस्थानीं सन १८५५ सालीं विलायतेहून आणिली. पुढें सन १८६१ सालीं मुंबईस ११ गिरण्या झाल्या. व ३३८००० चात्या चालू लागल्या. सन १८७४ सालांत एकंदर गिरण्या २४ व ५९३००० चात्या झाल्या. सन १८७६ सालीं सर्व गिरण्यांतून चात्या ११२४००० झाल्या. दर चातीस दरसाल ३।७॥ शेर कापुस लागतो असा कमींत कमी हिशेब धरला तर मुंबईस कापडाकरितां वर्षास सवादोन लक्ष कापसाचे गठ्ठे खर्च होतात. व त्याचे ३८ कोटी यार्ड कापड तयार होतें. व दिवसानुदिवस हा उद्योग अधिक तेजिनें चालू आहे.

**इंग्लंड**— रशियाचा वकील ज० इग्नातीफ हा लंडनाहून वियना शहराकडे गेला.— ता० २३ रोजीं मि० कोर्टनी यांनीं हौस आफ कामन्सच्या सभेंत ह्मटलें कीं, तुर्कस्थानचें राज्य कायम राखण्याविषयीं इंग्लिश सरकारानें कबूल केलें असलें तरी त्यापासून तें तुर्क लोकांचा अन्याय रुशवतखोरी, व क्रूरपणा यांवरून मुक्त झालें. तुर्क सरकारानें आपल्या ख्रिस्ती प्रजेशीं न्यायानें वर्त्तावें ह्मणून त्यांस आग्रह करावा अशाविषयीं मि० फासेटच्या सूचनेवरून थोडा वाद झाला.— कान्स्तांतिनोपल एथील इंग्लिश वकील सर हेनरी एलियट यांच्या वर्तणुकीविषयीं पार्लमेंट सभेंत ता० २७ रोजीं निकरानें वादविवाद झाला.— रशियाचें सरकार इंग्लिशांच्या ह्मणण्यास मान्य झालें ह्मणून इंग्लिश सरकारानें त्याच्या सूचनापत्रावर सही केली अशी बातमी आहे.

रशियांतील वर्तमानपत्रें इंग्लिश सरकारास असा दोष लावतात कीं, त्यानें रशियन सरकारास अशा अडचणींत पाडलें आहे कीं, अप्रामाणिकपणानें वर्तणें व लढाई करणें यांतून एक निवडून घेतलें पाहिजे.— जनरल इग्नतीफ हा बर्लिन एथें गेला आहे.

**तुर्कस्तान**— मांतेनिग्रो संस्थानाशीं तहाचें बोलणें पुरें व्हावें ह्मणून तुर्कसरकारानें लढाईच्या तहकुबीची मुदत १३ एप्रिलपर्यंत वाढविली आहे.— कान्स्तांतिनोपल एथील शिबंदी बदलून तिच्या जागीं सिरिया देशाची फौज ठेविली आहे— सोफता लोकांनीं जी गडबड मांडली आहे ती माजी वजीर मिधत पाशा यांस माघारें आणावें ह्मणून केली.— मांतेनिग्रो सरकारचे जे वकील तहाचें बोलणें करण्याकरितां कान्स्तांतिनोपल एथें होते त्यांनीं बोलणें बंद केलें. ते शनवारीं परत जाणार होते. ज्ञा. द.

सोलापुरास आजपर्यंत जितक्या अनाथ मुलांस देवी आल्या होत्या तितक्या मुलांस आमचे एथील एका व्यापाऱ्यानें एकत्र जमवून त्यांस तेल वगैरे लाऊन न्हाऊ घातलें. व प्रत्येकाचे हातांत निंबाचा ढाळा देऊन बरोबर आंबील वगैरे घेऊन देवीच्या दर्शनास वाजत गाजत नेलें. हीं अनाथांची यात्रा झाल्यानंतर घरीं आणून तूप पोळीचें जेवण घातलें. आणी अखेर सर्वांचे अंगावर दोन दोन हात कपडा घालून आनंदानें सर्वांस वाटें लावलें. मुलांची संख्या सुमारें १२०० होती. क. त.

पंढरपूर येथील सबार्डिनेट जडज काल शंकर उमया शंकर यांजला मुंबई सरकारानें सिव्हील प्रोसिजर कोडचे गुजराथी भाषांतर करण्याकरितां मुंबईस नेलें आहे. दी. बं.

पृथ्वीवरील बहुतेक देशांत जमीनीचे पोटीं कोळसा सांपडतो. प्रत्येक देशांत दरसाल कोळसा किती उत्पन्न होतो याचे आंख पुढें दिले आहेत:— विलायतेंत १२,७०,१६,७१७ टन, युनैटेडस्टेट्स ५०,९,१२,१००; जर्मनी

REGISTERED NO. 6.1877.



७९३३९७४१; फ्रान्स १७४०००० बेलजम १,७०,००,०००; आस्ट्रिआ १,१०,००,०००; रशिआ १२,००,०००; स्पेन ९,७०,०००; पोर्तुगाल १८०००; नोवास्कोशिअ ( अमेरिका ) १०,९१,९६७ आस्ट्रेलिआ १०,००,०००; हिंदुस्थान ५००,०००; इतरदेश १०,००,०००.

खोटे कागद करणारा एकयुरोपियन-लरेन्स ग्रे सेंथवेट नांवाच्या युरोपियनानें लखनौ एथें तो अपरइंडिया ब्यांकिचा क्याशियर असतां खोट्या सह्या व कागद बारा १२ ह० रुपये मिळविले होते व ते घेऊन या देशांतून तो पळून जात होता तों ता. १९ मार्च रोजीं मुंबईस पोलिसानें त्यास जहाजावर पकडलें. यास धरण्याबद्दल एक हजार रु० चें बक्षीस लाविलें होतें. यानें आपलें नांवही बदललें होतें. याचें वय २१ वर्षांचें असून हा चांगल्या कुळांतील आहे असें ह्मणतात. ता.२१ मार्चला त्यास लखनौकडे रवाना केलें.

बल्लारि व हुबळी यांजमध्यें रेलवेचा रस्ता करण्याचें काम दुष्काळाच्या संबंधानें चालण्याविषयीं हिंदुस्थानसरकारानें परवानगी दिली असें समजतें. इं. प्र.

---

## प्रिन्सिपाल वर्डस्वर्थ यांचें बौध्धधर्माविषयीं व्याख्यान.

बुधवार ता० २१ माहे मार्च सन १८७७ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां फ्रामजी कावसजी हालांत एल्फिन्स्तन कालेजाचे प्रिन्सिपाल मि० वर्डस्वर्थ यांनीं " थिबेट देशांतील धर्ममंडळी आणि बौद्धधर्म " या विषयावर इंग्रजी भाषेंत व्याख्यान दिलें. साहेब मजकूर हे मुंबई एथील एका नामांकित विद्यालयाचे मुख्य गुरु असून मोठे जाडे विद्वान आहेत ह्मणून त्यांचें व्याख्यान ऐकण्याची सर्व लोकांच्या ठायीं मोठी जिज्ञासा उत्पन्न झाली होती. या कारणास्तव नेमलेल्या वेळेपूर्वीं एक तास ह्म० ४॥ वाजल्यापासून लोक येऊन चांगल्या जागा धरून बसूं लागले. थोडक्याच वेळांत सर्व खुरच्या भरून जाऊन पुष्कळ लोक उभे राहिले होते. या दिवाणखान्यांत व वरच्या सज्जांत [ ग्यालरींत ] ५००।६०० लोक बसण्यापुरती जागा आहे, पण सदर्हू प्रसंगीं ७०० किंवा ८०० लोक जमले असावेत असें अनुमान आहे. त्या समाजांत मुख्यत्वेंकरून हिंदु व पारशी विद्यार्थी, युरोपियन व नेटिव प्रोफेसर व शिक्षक, सरकारी नौकर, इत्यादिक लोक असून कित्येक ख्रिस्ती उपदेशक व एतद्देशीय ख्रिस्ती लोकही होते. ५॥ वाजल्यावर आन० रा० सा० विश्वनाथ नारायण मंडलिक यांनीं सभेचें अधिपत्य स्वीकारून व्याख्यानकर्त्याविषयीं सभेस परिचित करण्या करितां थोडें भाषण केलें. मग प्रो० वर्डस्वर्थ साहेब उठले तेव्हां सर्व समाजानें टाळ्या पिटून मोठाच गजर केला.

प्रोफेसर मजकूर यांचें व्याख्यान फार लांब होतें. तें वाचायास दीड तासाहून ज्यास्त वेळ लागला, आणि तें बरोबर ऐकूंही आलें नाहीं, तरी जेवढें ऐकूं आलें व समजलें तेवढ्यावरून इतकें सांगतां येतें कीं, त्यांनीं अनेक ग्रंथ वाचून व चांगला शोध करून तिबेट देशांतील धर्मसमाजाची व्यवस्था, बौद्धधर्माची उत्पत्ति, वृद्धि, प्रसार व त्याची रूपांतरें यांचा इतिहास, त्यांतील नीति व कितीएक धर्मसिद्धांत यांविषयीं चांगली माहिती दिली. त्यांनीं बौद्धधर्म व ख्रिस्ती धर्म यांच्या इतिहासांतील कियेक गोष्टींचा सारखेपणा दाखविला. त्यांनीं आपल्या विषयाची योजना व रचना मोठ्या विद्वत्तेनें केली होती यांत संशय नाहीं. साहेब मजकूर हे आलीकडील कितीएक विद्वानांप्रमाणें निःशास्त्रवादी, ह्मणजे परमेश्वरानें लेखी शास्त्र दिलें नाहीं, अशा मताचे असल्याकारणानें अर्थांतच ते इतर धर्मासारखा ख्रिस्ती धर्मही मनुष्यकृत आहे असें समजतात. तरी त्यांनीं असें ह्मटलें कीं, दुसऱ्या धर्मांपेक्षां बौद्धधर्म चांगला, व त्यांतील नीति फार उत्तम आहे; पण ख्रिस्ती धर्म बहुत गोष्टींविषयीं बौद्धधर्मापेक्षांही फार चांगला आहे.

व्याख्यान कर्त्यानीं बौद्ध व ख्रिस्ती धर्माच्या इतिहासांतील कियेक गोष्टोशी कशी तुलना केली हें वाचकांच्या लक्षांत यावें ह्मणून तिचा किंचित मासला दाखवितों. मसीहा ह्मणजे तारणारा याविषयीं जसें यहूदी व ख्रिस्ती यांचें मत आहे तसें बौद्धांचेंही मत होतें एवढेंच नाहीं, तर त्यांच्यांत कियेक तारणोर होऊन गेले. जसा ख्रिस्ती धर्माचा संस्थापक विरक्त होता व सर्व सोडून चहूंकडे धर्मोपदेश करीत फिरला, तसाच बौद्धधर्माचा स्थापक जो शाक्यमुनी तोहि होता. जसा ख्रिस्ताचा व त्याच्या शिष्यांचा छळ झाला, तसा बौद्धांचाहि झाला. जों जों छळ झाला तों तों ख्रिस्ती धर्माची दृढता व प्रसार होत गेला, त्याचप्रमाणें बौद्ध धर्माचीहि गोष्ट झाली. जसा ख्रिस्ती धर्म प्रथमारंभीं साधा होता व पुढें त्यांत कर्मकांड वाढत गेलें, तसेंच बौद्धधर्मांतहि वाढत गेलें. जसे ख्रिस्ती धर्मांत मंक व नन यांचे मठ झाले, तसे बौद्ध धर्मांतहि झाले. जशा ख्रिस्ती मंडळीच्या " कॉन्सिलें " ह्मटलेल्या धर्मसभा झाल्या, तशा बौद्ध लोकांतहि झाल्या. जसे ख्रिस्ती लोकांत बैबल व मोश्याचा पंचग्रंथ हीं आहेत, तसे बौद्ध लोकांत ही आहेत. ज्या देशांत ख्रिस्ती धर्माची मूळस्थापना झाली त्या ठिकाणीं ख्रिस्तांचें फारसें महात्म्य नाहीं. त्याचप्रमाणें ज्या ठिकाणीं बौद्धधर्माची उत्पत्ति झाली त्याठिकाणीं ह्मणजे उत्तरा हिंदु०त त्याच्या संस्थापकाच्या नांवाचें स्मरण सुद्धां कोणी करीत नाहीं. ख्रिस्ती लोकांत कान्स्तताइन बादशहा, ज्युलियन आपास्टेट, तिसरा इनोसेंत पोप, वगैरे झाले, तसेच पुरुष बौद्ध लोकांत हि झाले. जशी पोपांची धर्मराज्याची व्यवस्था होती, तशीच थिबेटांतील धर्माध्यक्ष जे " लामा " त्यांचीहि आहे.

त्यांनीं आणखी असें ह्मटलें कीं, जसा बौद्धधर्मानें हिंदुधर्म किंवा ब्राह्मणधर्म मोडकळीस आणला होता, तसाच शैवपंथानें बौद्धधर्महि मोडकळीस आला होता. जेव्हां शैवपंथ चालू झाला तेव्हां त्याच्या टोलेजंग, भव्य, सुंदर, नक्षीदार, चित्रमय देवळांपुढें बौद्ध लोकांचीं चैत्यें ( देवळें ) फिकीं पडलीं. शैवपंथाचे योगी किंवा गोसावी यांची विरक्तता व अवधूतपणा यांपुढें बौद्धांचे उपदेशक व योगी हे दिपून गेले. तरी पुढें ते दोन्ही पंथ शेजारीं शेजारीं नांदूं लागले.

व्याख्यानकारांनीं ज्या गोष्टींवरून बौद्ध धर्माची प्रशंसा केली त्यांतून कांहीं गोष्टी येणेंप्रमाणें;—थिबेटांतील बौद्धांचा एक षडाक्षरी बीजमंत्र आहे तो लक्षावधि लोक मुखपाठ करतात. प्रो० वर्डस्वर्थ यांचें ह्मणणें असें आहे कीं, लांब लांब विश्वास प्रकरणें ( क्रीड ) व प्रश्नोत्तरबली यांपेक्षां असे लघु बीजमंत्र बरे. पण असल्या बीजमंत्रांमध्यें धर्मतत्वाचा फारसा समावेश होत नाहीं, आणि जो होतो तो अस्पष्ट व दुर्बोध असतो, हें ते लक्षांत आणित नाहींत. आणखी त्यांनीं सांगितलें कीं, बौद्धधर्मी लोक फार प्रार्थना करणारे आहेत. शेतकरी, धनगर, साधारण लोक व पाणी भरावयास जाणाऱ्या मुली सुद्धां प्रार्थना करतात. त्यांच्यांत प्रार्थना तयार करण्याचा धंदा करणारे लोक आहेत. जपमाळ फिरविण्याची रीत रोमनक्याथोलिक लोकांनीं बौद्धांपासूनच घेतली.

आणखी साहेब मजकूर ह्मणाले कीं "ह्या मरणाऱ्या शरीरापासून मुक्त" होण्याचे योग्य उपाय थिबेटांतील बौद्ध लोकांनीं चालू केले आहेत. पण ते कोणते हें त्यांनीं दाखविलें नाहीं आणखीं ते बोलले कीं बौद्ध धर्मांतही नरक सांगितला आहे, पण जसा दुसऱ्या धर्मांतील प्रखर कल्पनेच्या लोकांनीं अशाम्य ह्मणजे अक्षय नरक वर्णिला आहे त्याप्रमाणें बौद्ध ग्रंथकारांनीं वर्णिला नाहीं. अशा प्रकारचा नरक मानल्यानें पापबुद्धीचें आवरण होईल कीं नाहीं याचा विचार विद्वान व्याख्यानकारांनींच करावा. आणखी यांची कल्पना आपल्यास रुचती किंवा त्यांची रुचती हें पहाणें काय कामाचें?

व्याख्यान आटोपल्यावर अध्यक्षांनीं व्याख्यानकारांचे आभार मानण्याविषयीं सूचना करतांना ह्मटलें कीं, " हे साहेब फार विद्वान व ज्ञानी आहेत, सबब त्यांच्यां बोधाचें सर्वांनीं अनुकरण करावें हें बरें." ज्ञा. द.

---



## जाहिरात

## सटीक पुराव्याचा अक्ट

सन १८७२ चा १ ला [ पुराव्याचा अक्ट ] हा अमलांत येऊन बरींच वर्षें झालीं परंतु त्याचें मराठी भाषांतर व्हावें तसें खुलासेवार झालेलें नाहीं ह्या मुळें त्यांतील विषय समजण्यास अडचण पडते. इंग्रजींत ह्या विषयावर पुष्कळ ग्रंथ आहेत. व हा अक्ट सुरू झाल्यावर त्यावर पुष्कळ टीकेचे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत त्यांचा उपयोग इंग्रजी जाणणारास मात्र होतो. केवळ मराठी जाणणारास त्याचा मुळीच उपयोग होत नाहीं यास्तव कांहीं मित्र मंडळीचे सूचनेवरून या संबंधानें आपण कांहीं यत्न करावा असें माझ्या मनांत आल्यावरून मद्रासचे आडव्होकेट जनरल हेनरी स्टुअर्ट कानिंघम एम. ए. बारिष्टर यांनीं या अक्टावर केलेल्या टीपेच्या पुस्तकाचें भाषांतर करण्याविषयीं त्यांची परवानगी मागितली व मेहेरबानी करून ती दिल्यावरून त्यांचे टीकेच्या पुस्तकाचे मराठी भाषांतर करून "पुणें ज्ञानप्रकाश" छापखान्यांत तें खिळे छापावर छापण्याचें काम चालू आहे. भाषांतर होईल तितकें सुबोध केलें आहे. या पुस्तकांत विषय आहेत ते:—

१ उपोद्घात प्रथम दिला आहे तो अजमासे ७५ पृष्ठें होईल तो वांचला असतां ह्या आक्तांतील विषय समजण्यास फार सुलभ पडणार आहे.

२ सन १८७२ च्या पहिल्या आक्ताचे सरकारी मराठी भाषांतर जसें आहे तसेंच ठेऊन कलमा खालीं समजुतीच्या टीपा दिल्या आहेत त्यावरून कलमाचा संशय बहुतकरून रहाणार नाहीं.

३ सन १८७२ चा १८ वा आक्त पुराव्या विषयीं आक्त सुधारण्याविषयीं झाला आहे त्याचे कलमांतील ठराव ज्या त्या कलमांत सामील केले आहेत.

४ सन १८५३चा आक्त कलम २६

५ विक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या १९।२० वर्षाचा चापटर ११३, २२ वे वर्षाचा चापटर २०,२२।२३ वर्षाचा चापटर ६३,२४ वे वर्षाचा चापटर ११ व ३१।३२ वर्षाचा चापटर ३७.

हें पुस्तक आजमासे आष्टपत्री साच्याचे ४०० पृष्टावर होईल. दिवाणी, फौजदारी, मुलकी वगैरे सर्व कामांत पुराव्याची जरूर लागते व तो विषय चांगला अवगत असण्याची मुनसफ, माजिस्त्रेट वगैरे वकील व मुखत्यार यांस फार जरूरी आहे त्याचा अनुभव त्यांस आहेच. केवळ मराठी जाणणारास तसें साधन नाहीं असें पाहून हा ग्रंथ तयार केला आहे. मूळ इंग्रजी प्रतीची किंमत ८ रुपये आहे. मुळापेक्षां भाषांतर मोठें होतें हें सर्वांस विदितच आहे तरी लोकांस घेण्यास सोयीवार पडावें ह्मणून ह्याची किंमत ठेविली आहे ती:—

| | |
|---|---|
| मे सन १८७७ अखेरपर्यंत भरणारास | ४ रु. |
| जुलै ,, ,, | ५ रु. |
| जुलै सन १८७७ अखेरपर्यंत पुस्तक घेऊ अशी सही देणारास | ६ रु. |
| पुस्तक तयार झाल्यावर घेणारास | ७ रु. |

अगाऊ किंमत भरणारास टपाल खर्च बसणार नाहीं बाकीच्या लोकांस टपालखर्च दर प्रतीस ०१० आणे पडेल ज्यास अगाऊ पैसा भरणें असेल त्यांनीं पुणें ज्ञानप्रकाश छापखान्याचे म्यानेजर यांजकडे भरावा. येत्या नोवेंबर महिन्यांत पुस्तकें तयार होतील. वऱ्हाडसमाचार छापखान्यांत ही पैसा भरल्यास हरकत नाहीं. कोल्हापुर- ता.१ मार्च १८७७ इसवी.

वामन गोविंद रानडे
वकील पुणें व कोल्हापुर



---

हे पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERED NO. 6,1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० १५ माहे एप्रिल सन १८७७ इ० अंक १५

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकह्यशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात

## सटीक पुराव्याचा अक्ट

सन १८७२ चा १ ला [ पुराव्याचा
अक्ट ] हा अमलांत येऊन बरींच वर्षे झा
लीं परंतु त्याचें मराठी भाषांतर व्हावें तसें
खुलासेवार झालेलें नाहीं ह्या मुळें त्यांतील
विषय समजण्यास अडचण पडते. इंग्रजींत
ह्या विषयावर पुष्कळ ग्रंथ आहेत. व हा
अक्ट सुरू झाल्यावर त्यावर पुष्कळ टीके
चे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत त्यांचा उपयो
ग इंग्रजी जाणणारास मात्र होतो. केवळ
मराठी जाणणारास त्याचा मुळींच उपयो-
ग होत नाहीं यास्तव कांहीं मित्र मंडळी
चे सूचनेवरून या संबंधानें आपण कांहीं
यत्न करावा असे माझ्या मनांत आल्याव
रून मद्रासचे आडव्होकेट जनरल हेनरी
स्टुअर्ट कनिंघम एम. ए. बारिष्टर यांनीं
या अक्टावर केलेल्या टीपेच्या पुस्तकाचें
भाषांतर करण्याविषयीं त्यांची परवानगी
मागितली व मेहेरबानी करून ती दिल्या
वरून त्यांचे टीकेच्या पुस्तकाचे मराठी
भाषांतर करून "पुणे ज्ञानप्रकाश" छाप
खान्यांत तें खिळे छापावर छापण्याचें का
म चालू आहे. भाषांतर होईल तितकें सु
बोध केलें आहे. या पुस्तकांत विषय आहे
त ते:—

१ उपोद्घात प्रथम दिला आहे तो
अजमासे ७९ पृष्ठें होईल तो वांचला अ
सतां ह्या आक्तांतील विषय समजण्यास
फार सुलभ पडणार आहे.

२ सन १८७२ च्या पहिल्या आक्ता
चे सरकारी मराठी भाषांतर जसें आहे त-
सेंच ठेऊन कलमा खालीं समजुतीच्या टी
पा दिल्या आहेत त्यावरून कलमाचा संश
य बहुतकरून रहाणार नाहीं.

३ सन १८७२ चा १८ वा आक्त
पुराव्या विषयीं आक्त सुधारण्याविषयीं
झाला आहे त्याचे कलमांतील ठराव ज्या
त्या कलमांत सामील केले आहेत.

४ सन १८९३चा आक्त कलम २६

५ विक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या
१९।२० वर्षाचा चापटर ११३, २२ वे
वर्षाचा चापटर २०, २२।२३ वर्षाचा चा
पटर ६३, २४ वे वर्षाचा चापटर ११
व ३१।३२ वर्षाचा चापटर ३७.

हें पुस्तक आजमासे आष्टपत्री साच्या
चे ४०० पृष्टांवर होईल. दिवाणी, फौजदा
री, मुलकी वगैरे सर्व कामांत पुराव्याची
जरूर लागते व तो विषय चांगला अवग
त असण्याची मुनसफ, माजिस्त्रेट वगैरे व
कील व मुखत्यार यांस फार जरूरी आहे
त्याचा अनुभव त्यांस आहेच. केवळ मरा
ठी जाणणारास तसें साधन नाहीं असें पा
हून हा ग्रंथ तयार केला आहे. मूळ
इंग्रजी प्रतीची किंमत ८ रुपये आहे.
मुळापेक्षां भाषांतर मोठें होतें हें सर्वांस वि
दितच आहे तरी लोकांस घेण्यास सोयी
वार पडावें ह्मणून ह्याची किंमत ठेविली
आहे ती:—

| | |
|---|---|
| मे सन १८७७ अखेरपर्यंत भरणारास | ४ रु. |
| जुलै ,, ,, | ५ रु. |
| जुलै सन १८७७ अखेरपर्यंत पुस्तक घेऊ अशी सही देणारास | ६ रु. |
| पुस्तक तयार झाल्यावर घेणारास | ७ रु. |

अगाऊ किंमत भरणारास टपालखर्च
बसणार नाहीं बाकीच्या लोकांस टपालख
र्च दर प्रतीस ०१० आणे पडेल ज्यास
अगाऊ पैसा भरणें असेल त्यांनीं पुणें ज्ञा
नप्रकाश छापखान्याचे म्यानेजर यांजकडे
भरावा. येत्या नोवेंबर महिन्यांत पुस्तकें त
यार होतील. वऱ्हाडसमाचार छापखान्यांत
ही पैसा भरल्यास हरकत नाहीं. कोल्हापुर-
ता.१ मार्च१८७७ इसवी.

वामन गोविंद रानडे
वकिल पुणें व कोल्हापुर

## नोटिसा

गोविंदराम टिकमदास वहिवाटदार गि
रधारीलाल हरीराम साहू दुकान आदमपु-
र तालुके अकोट यांस खालीं सही करणा
र याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तु
मचें कर्ज मी घेतलें त्यांत मी तुह्मास मा-
झा स्थावर माल गहाण लिहून दिला असू
न त्या गहाण मालाबद्दल मी घेतलेले रुप
ये तुह्मास देण्यास तुह्माजवळ घेऊन आ
लो तर तुह्मी रुपये घेतले नाहींत. आतां
तुह्मास अशी नोटिस देतों कीं सदर्हू रक-
मेचें व्याज तुह्मास ही नोटिस पावल्यां ता
रखेपासून पुढें मिळणार नाहीं आणि जी
रकम तुह्मास देण्यास आणिली आहे ती
माझ्या घरांत पडली आहे तिची जडजो
खीम व चोरीचिट्टा याजबद्दल नुकसानीची
जबाबदारी तुह्मावर राहिली असून सदर्हू
गहाण माल लिहून दिला त्याजवर तुमचा
हक्क रहाणार नाहीं. सदर्हू रकम मी जग
रामदास, हरी तिव्हानें, सुगालचंद, ला
ल चवकीदार व इर्यागोजी भाकरे-असे पां
च इसमांचे समक्ष तुमचे घरीं तीन वेळ घे
ऊन आलो पण तुह्मी घेतली नाही; सबब
ही नोटिस दिली आहे तर सदर्हू नोटिसी
चा जो खर्च पडेल तो तुमचे जवळून भ-
रून घेतला जाईल. तुह्मास लिहून दिले
ल्या नंबरांचा तपशील:—

१सर्वे नंबर २५ एकर १९०२७ आका
र ३६ रु. ठिके जाफरापुर वाटेचें.

२ ठिके निंबाचें सर्वे नंबर २४ एकर
५०६ आकार रुपये ९

३ ठिके उकळीवाट सर्वे नंबर ५३ एक
र १३०१९ आकार रुपये २०

४ठिके झाड पळसाचे सर्वे नंबर ६१ ए
कर ६०९ आकार रुपये ११

५ ठिके नंबर विहिरीचें सर्वे नंबर१ एक
र ६०३९ बागाईत आकार रुपये १६

सदर्हू नंबर पांच तुमचे जवळ गहाण
लिहून दिले आहेत त्याजवर तुमचा हक्क
वारसा बिलकूल नाहीं कारण तुह्मी आप
ले रकमेचे मालक व रकम घेऊन आह्मी
सिद्ध आहो पण तुह्मी घेत नाहीं करितां
या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल
व व्याजही पुढें मिळणार नाहीं. कळावें.
तारीख ९ माहे एप्रिल सन १८७७ इ.

( सही ) एकोजी वल्लद अंबरसिंग पा
टील रहाणार मौजे वाडी अ
दमपुर दस्तुर खुद्द

### नोटिस.

गिरजाबाई मर्द बापू भट पूर्णपात्रे र-
हाणार कसबे उमरखेड तालुके पुसद जि
ल्हा वाशिम इस खालीं सही करणार या
जकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी
फालगुन शुध्ध ५ ते दिवशी गणभट बिन
बुधभट पूर्णपात्रे याचा चिरंजीव वामनभ-
ट याचे दत्तविधान करून मौंजबंधन करू
न तुमची निमे वृति सर्व तुमची ह्मणोन
दत्तपत्र लिहून दिलें परंतु हे आगदी ब
रोबर रितीनें झालें नाहीं कारण दत्तविधा
न होतेसमयीं हिंदुधर्मशास्त्र नवऱ्याचे नाव
जर असल्यावाचून व विधवा स्त्रीस दत्तक
घेण्यास अधिकार नाहीं व सर्व भाऊबंदा
चे संमतीनें दत्तविधान झालें पाहिजे तसें
तुह्मी केले नसून आमचे संमत घेतले ना
हीं यास्तव नोटिसीनें कळविण्यांत येतें
कीं तुमचे वृतींवर माझा हाक होणार आ
हे त्या वृतीस हा घेतलेला दत्तक लागू हो
णार नाहीं. व याबद्दल तुमचें काय ह्मण
णें आहे याचें उत्तर पंध्रा दिवसांत कळ
वावें नाहींपेक्षां दिवाणी कायद्या प्रमाणें
तजवीज करून तुह्मी घेतले दत्तकपत्र र
द्द करण्याविषयीं सोहोळे होऊन त्याच्या
वृत्तीचा हक्क उडविला जाईल. कळावें ९
माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) हरभट बिन मणभट
रहाणार उमरखेड

### नोटिस.

त्रिंबक रामचंद्र वकील रहाणार अड
गाव तालुके अकोट जिल्हा अकोलें यां
स खालीं सही करणार याजकडून नो
टिस देण्यांत येते कीं, तुह्मी आमच्या
पाशी नोकरी आजपर्यंत होतां व आ-
ह्मी ठेविले परंतु आतां आह्मी तुह्मास आ
ज मितीस रजा दिली आहे तर आमचे
पासून तुह्माला वकिली संबंधी कांहीं काम
केल्यास पैसा मिळणार नाहीं. हे आप-
णास कळावें तारीख ११ माहे एप्रिल स
न १८७७ इसवी.

परवतराव व नारायणजी व भाऊ दे
शमुख हे तीन इसम त्यार आण्याचे माल
क आहेत. खुशालराव व अनंदराव व चि
मणाजी देशमुख हे तीन इसम त्यार आ
ण्याचे मालक आहेत त्याचे तर्फे खालीं
सह्या करणारे दोघे.

( सही ) परवतराव वल्लद फकिरजी
देशमुख मौजे अडगांव
दस्तुर खुद्द.

( सही ) खुशालराव वल्लद सखाराम
देशमुख निशाणी खुद्द
दस्तुर परवतराव.

### नोटिस.

लक्ष्मण वल्लद शिंगराजी काळवाडे
वस्ती मौजे अलेगाव तालुके बाळापुर जि-
ल्हा अकोला यांस खालीं सही करणार
याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुमचे
आमचे एकंदर जिनगीचा मालमत्तेसुद्धां
शेती वगैरेचे आपसांत गावांतील लोक पा
टील पांडे मार्फत न वानल्यामुळें हिस्से र
सिदी प्रमाणें सालीम जिनगी वाटून घेत-
ली त्याजबद्दल तुमची व आमची कांहीं त
कार नाहीं. शेतीच्या संबधांत तुमचे आम
चे हिस्से रसीदीचे दस्तैवज होऊन अम-
क्यानें अमुक शेताची वहिवाट करावी अ-
सें लिहिलें असून त्याप्रमाणें आज सुमारें
१२।१३ वर्षें गुदरून गेलीं वहिवाट करी
त आहों. नंतर सरकारातून पोटभागीन-
दाराचीं नावें शरीक करावी ह्मणून हुकूम
झाला त्याप्रमाणें भागिनबुकांत हिस्सेरसी
दी ज्याचे त्याचे नावें आपआपले हक्काप्र
माणें सरकार कागदीं दाखल झाले असें
असून आजपर्यंत आपसांतील लेखाप्रमाणें
वहिवाटण्याचें काम सुरूं असून सालमज
कुरीं मौजे गोळेगाव संमत डोंगर एथील
सर्वे नंबर ३१ । ८ । ६ । २६ । १७ ।
२८ व मौजे अलेगाव एथील सर्वे नंबर
१७७ पैकीं १४९ पैकीं १७३ । १६८ ।
७१ या गावाचे शेतांत तुह्मे व आमचे
हिस्से असून त्याप्रमाणें तुह्मी व आह्मी वा
टणीप्रमाणें वहिवाट करीत आहो. असें
असून सालमजकुरीं सरकारचा सारा तुह्मे
तांबेतील जमीनीचा तूं न दिल्यामुळें आ-
मचे पासून भागिणीबुकाप्रमाणें सरकारानीं
त्या शेताचा सारा वक्तशीर न पोंचल्यामुळें
तुजला व आह्माला तालुके मजकुरीं समक्ष

बोलावून भागिणीबुकाप्रमाणें सालीम शेता चा पैसा तुमचे वाटणीपैकीं आह्मी दिला. त्याची रकम सरकारानीं जबरदस्तीनें आ मचेपासून घेतली आहे. ती तुह्मी आठ दिवसांचे आंत द्यावी न दिल्यास रीतीप्रमाणें दिवाणींत दावा करून ३१८६ व नोटिशीचा खर्च भरून घेऊं.

वर लिहिलेल शेतांत तुमचा व आमचा हिस्सा सरकार बुकांत दाखल आहे व त्याची वहिवाट आपसांतील वाटणीप्रमाणें करीत आहों करितां आतां तुह्मास असें कळविलें जातें कीं तुमचे ताब्यांतील शेत आहे त्याची तुह्मी हवी तशी व्यवस्था करावी माझे ताब्यांतील शेतांत जो तुमचा हिस्सा आहे त्या ऐवजी माझा हिस्सा तुमचे ताब्यांतील शेतांत आहे परंतु वहिवाट करीत नाहीं करितां तुह्मी माझे ताब्यांतील जमीनीचा तुमचा हिस्सा कोणास लिहून द्याल तर त्या लिहून घेणाराचा व तुमचा हक्क रहाणार नाहीं. कोणास तुह्मी आपले कर्जा ऐवजी अगर खुशीनें लिहून द्याल व घेणारा घेईल तर तुमचे दोघांचे हक्क त्या जमीनीवर रहाणार नाहींत. कारण या जमीनी ऐवजी जमीन तुमचे ताब्यांत आहेच करितां या हिशावर तुमचा हक्क राहिला नाहीं. व तुह्मास जरूरी वाटल्यास माझे ताब्यांतले शेतांतील हिशाचा राजिनामा तुह्मी द्यावा. व तुमचे वाटणीचा तुह्मी माझे करून घ्याल तर मी त्याप्रमाणें करण्यास राजी आहे. याप्रमाणें केल्यास उत्तम आहे नाहीं पेक्षां तुमचा हक्क याजवर राहिला नाहीं- कळावें तारीख ९ माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

(सही) तुकाराम वल्लद भिकाजी
माळी काळवाडे व सदू
वल्लद असाजी काळवाडे
निशाणी हातची.

---

# वऱ्हाडसमाचार

---

मिति वैशाख शुध्ध २ शके १७९९

---

## ADMISSION OF NATIVES INTO THE CIVIL SERVICE.

In attempting to raise our feeble voice, on the all important question of the admission of Natives into the Civil Service, a question which has at this present moment engrossed the attention of the native community throughout the length and breadth of this vast appendage of the British Crown, we need scarcely apologise for treading over the oft beaten ground, as the question is one which if solved satisfactorily will lead to results the importance of which can hardly be over estimated.

We must in the first instance note our sincere gratification and pleasure at findig Lord Lytton's expressions as plain as they are true.

His Lordship has on more than one occasion expressed his views regarding the admission of our countrymen into the Civil Service, which is now well nigh monopolised by our brethren of the west.

We feel sure that none of our countrymen were disappointed when on the last convocation of the Calcutta University His Lordship said that "the prospective claims to the sanctioned aspirations of the natives does not involve the retrospective loss to the tried abilities of the Officers already in the Service", for, this it must be admitted is a plain truth.

We are doubtless assured that His Lordship who is more anxious than any body else, to see the orders of the Home Government practically carried out at an early date will take every precaution to distribute justice evenly between the two races.

In endeavouring to arrive at a right decision on a question of such vital importance, the duration of time must be of secondary consideration. not only to the governed but the Governors as well, for if His Lordship the Viceroy should arrive at a hasty conclusion either one way or the other, we hope we shall not be charged as exaggerating the thing, when we say that the representative of the Crown will have to prepare himself to face a civil commotion which cannot but result in a total change of events, that will throw the present peaceful administration of the country, again into a chaos, from which happily we are now being gradually evolved.

Our countrymen need be under no apprehension of any length of time being occupied for the solution of the question as His Lordship has undoubtedly taken the matter into his serious consideration.

Indeed a happy begginning has already been made in our Province for Entertaining Natives into the service hitherto ocuppied to a large extent by our military comrades. We allude to the appointment of "attaches" all of whom are young gentlemen of promise, and we doubt not that under the fostering care of our highly esteemed and thoroughly experienced Resident Sir R. Meed K. C. S. I. they will soon attain to a standard that will fit them to govern their Country as we at least sincerely hope with that extraordinary skill and ability which has characterised the British administration of this country and which eminently fits them to govern any country, however widely that country may differ from them in creed, colour or caste.

The system of appointing attaches to every Government will in our humble opinion be of great advantage not only to those whose lot it may be to occupy important position under Government but also to the Governors ofthe country who are anxious to see qualified young men in the higher branch of the Service, as it gives the attaches opportunities of acquiring every information during their apprenticeship on points on which they may be called upon to adjudicate when actually entertained in the service.

We are persuaded that it will be of no mean advantage to Government, if some of the best graduates of our Universities are picked up for this preliminary training as the combination of theoretical aud practical knowledge is certain to produce most beneficial results.

There is another question closely allied to the one under consideration on which we desire to say a word, and that is, the contemplated change in the age of those who may wish to present them selves for the open competitive examination.

Our brethren at Calcutta having fully exhausted this subject at a large and influential meeting held the other day, we need say no more than assure the noble Lord our SECRETARY OF STATE FOR INDIA that such a step as the one His Lordship is inclined to introduce, if enforced, will lead to most disastrous results, and we cannot put it better than in the words of the resolution moved by Dr. Mohendralala Sirkar at the meeting which is as follows. "That this meeting contemplates with deep regret the reduction of maximum limit of age for candidates for the Indian Civil Service Competetion from 21 to 19 years in as much as this change in the limit of the age is calculated to aggravate the existing evil of cramming, to lead to the admission of men of inferior training and capacity, to lower the efficiency of the service, and practically to exclude natives of India from the open competitive examination."

We trust that when "Peterhoff" is ready to receive its illustrious guest it will also keep ready a comfortable chamber, whese His Lordship can contemplate upon the future destinies of those whom he governs, & announce His Lordship's plan as early as possible and allay the anxieties, which are now hanging thick on the minds of millions of the loyal and dutiful subjects of Her Most Graceous Majesty the Empress of India.

---

## हिंदुस्थानांतील गहू

या हिंदुस्थान देशाचा, यांतील प्रत्येक वस्तुच्या उत्तम गुणधर्मावरून पूर्वींपासून प्रसिद्धी आहेच; तरी इतर देशाशीं असावें तसें दळणवळण पूर्वींपासून नसल्यानें आमचे हातून इतर देशांतील वस्तूंशीं तुलना झाली नाहीं. पण अलीकडे हा देश सर्व कला व विद्यासंपन्न अशा इंग्लिश सरकारचे हस्तगत झाल्यापासून यांतील एकेकच वस्तु सर्व जगास मागें टाकून आपले उत्तम गुणधर्मांनीं पुढें सरसावित आहे. जसें जवस, अफू, कापूस हे जिन्नस परदेशास जाऊं लागले आहेत. व अलीकडे गव्हाचीही चाल परदेशीं होऊं लागली आहे. व ते विलायतेंतील रसायन शास्त्रज्ञ लोकांनीं अमेरीकेंतील गव्हापेक्षां हिंदुस्थानांतील गव्हाचे अंगीं पौष्टिकत्व अधिक आहे" असें सिद्ध केल्यावरून दिवसे दिवस या देशांतील गव्हाची चहा वाढत आहे. ह्मणजे सन १८७१ सालीं २३९६४४९ रुपयाचे गहूं विलायतेस गेले होते तें मान दर साल वाढत जाऊन सन १८७६ सालीं १६७३४००१ रुपयांचे गहूं गेले. ही मोठी आनंदाची गोष्ट होय. व यापासून आपले देशास बराच नफा होईल.

या देशांतील गव्हांत मातीची भेसळ करतात असें नाहीं साहेब लोकाचे नजरेस येतें तें बरोबर आहे कारण त्यांची स्वच्छतेची रहणी व इकडील रीति भाती पासून अगदी निराळे. पण एतद्देशीय लोकांस इकडील सर्व दळलें कांडलें समजावें पण क्वचित त्यांचा देखील तर्क धावतो कीं, "मळणी झाल्यावर दाणा विकते वेळीं त्यांत माती मिसळतात", यावरून फार वाईट वाटतें.

आतां इकडील गव्हांत मातीची भेसळ नसते असें आमचें मुळींच ह्मणणें नाहीं पण अधिक फायदा व्हावा याकरितां कोणी मुद्दाम त्यांत मिसळत नाहीं हें निर्विवाद आहे.

गव्हाचें पीक शेतांतून जमा करतेवेळीं त्याचे मुळास माती चिकटून येती, पुढें मळणी करतेवेळीं खळ्याची जागा रानांतच पाणी घालून ठोकून पिटून चांगली तयार करतात. नंतर त्या पिकाचे मुळास चिकटलेली माती लाकडानें निराळे जागेवर झाडतात नंतर तीं झाडें तयार केलेल्या जागेवर टाकून वर बैल फिरवितात तेणेंकरून लोंब्यांपासून धान्य मोकळें होतें मग वाऱ्यावर धरून काडी पत्ती निराळी झाल्यावर जेठा माल विकतात अगर भरून ठेवितात. व मुळयाची माती झाडल्यानें जे गहू खालीं पडतात ते अगदी निराळे ठेवून त्यांत माती पुष्कळ असतें ह्मणून ते गहू धुतात व निराळेच विकतात पण त्याची देखील जेथें भेसळ शेतकरी करित नाहींत हें इकडील प्रत्येकजण सांगूं शकेल.

आतां [illegible] ची माती झाडतेवेळीं चुकून एकादें ढकूळ जात असेल तेवढें मात्र नजरेस यतें. याशिवाय मळणीची जागा मूळची चांगली नसली अगर तिची चांगली मेहनत झाली नसली तर खळें ह्मणजे ती जागा फुटते व तेणेंकरून ही केव्हां केव्हां धान्यांत अधिक मातीची भेसळ होते. या ठिकाणीं शेतकऱ्याचा नाइलाज होतो ह्मणून व्यापाऱ्यानें इकडे लक्ष्य ठेवावें हें योग्य.

इतर देशांत गहू इत्यादि धान्य निर्मळ

शेत असतील ह्मणून त्यांचा कित्ता घेऊन आपले इकडेही तशी सुधारणा व्हावी हें चांगलें असून तत्संबंधी उपयुक्त माहिती मिळवून अडाणी शेतकऱ्यांचे वहिवाटींत आणून सोडण्याचें काम विद्वान लोकांनीं उचललें पाहिजे. कारण इकडील गहू जवारी या पेक्षां लाख, हरभरे, मूग व उडीद यांत माती अतिशय असती ह्मणून हीं धान्यें धुवावीं लागतात. तसेंच तांदुळांत ही गारेचे वगैरे खडे मनस्वी असतात. ह्मणून ही भेसळ होणार नाहीं अशा युक्तीची गरज आहे व तशी निघाली पाहिंजे; पण ती युक्ती "वैरण वाळगण्याचे युक्ती" प्रमाणें असल्यास कठीण पडेल. ह्मणजे ९ रुपयांची वैरण ठेवण्यास ७ रुपयांचे मीठ पुरावयाचें दुर्लभ. तेव्हां अशा युक्ती पासून विशेष फायदा होण्याची आशा नाहीं. ह्मणून थोड्या श्रमानें व सुलभ उपायानें निर्भेळ माल करण्याची युक्ती असावी. तसेंच इकडील शेतकरी लोकांनींही धान्यांत मातीची भेळ होणार नाहीं अशी चांगली खबरदारी ठेवावी. ह्मणजे होत आहे याहून काहीं अशी चांगला माल होईल व तेणें करून सर्वोपरी चांगला ठरून बहुत प्रकारें फायदा होईल.

## वऱ्हाड

मि० सी० प्रेयारो हैदराबाद रेसिडेंसी मधील हेड क्लार्क यांस तारिख १४ जानेवारीपासून हैदराबाद असाइनडिस्ट्रिक्टमध्ये एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर नेमिलें.

मे० दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर यांची प्रकृती चांगली झाली हें कळविण्यास आह्मास संतोष वाटतो. त्यांना ९२ दिवसांची रजा मिळाली आहे तीप्रमाणें ते २० वे तारखे नंतर महाबळेश्वराकडे जाणार आहेत.

उमरावतीस मि० सयद फत्ते अलीखान यांस दुसरा हुकूम होईपर्यंत अॅक्टिंग स्पेशियल माजिस्त्रेट नेमिलें.

क्या० ग्रांट साहेब अकोल्यांचे स्माल काज जडज आहेत तोंपर्यंत त्यांस ५०० रुपयेपर्यंत दिवाणी दावे पहाण्याचा अधिकार व क्रि० प्रो० कायद्याचे २० वे कलमाप्रमाणें फर्स्ट क्लास माजिस्त्रेटचा अधिकार व सबार्डिनेट जडजाचा अधिकार व नादारी कोर्टांचा अधिकार दिला.

असे ऐकण्यांत आलें आहे कीं, मि० म्याकिंटाश साहेब उमरावती हैस्कुलाचे हेडमास्तर यांजबद्दल रेसिडेंट साहेबांकडे लिहून गेलें होतें त्यांजकडून सदर्हू प्रकरणाचा निकाल झाला. म्याकिंटाश साहेबांनीं राजीनामा द्यावा किंवा ६ महिन्यांची रजा मागितली आहे ती रजा घेऊन पुन्हा हायस्कुलावर येऊं नये. हें खरें असेल तर म्याकिंटाश साहेबांस येणेंकरून वाईट वाटेल व त्यांचें मोठें नुकसान होईल याजबद्दल आह्मांस वाईट वाटतें.

कारण त्यांचा आमचा नुकताच स्नेह झाला आहे.

कर्नेल नेंभार्ड साहेब वऱ्हाडांतून नोकरी सोडून गेले त्या संबंधानें त्यांविषयींचे आपले विच्यार रेसिडेंट साहेबांनीं रेसिडेन्सी आर्डरमध्यें छापून प्रसिद्ध केले आहेत त्यांत ते ह्मणतात कीं, नेंभार्ड साहेबांच्या उत्तम कामगिरीबद्दल माझ्या पूर्वीच्या सर्व रेसिडेंटांनीं व हिंदुस्थान सरकारानीं त्यांची स्तुती केली आहे. सन १८६७ सालीं सर रिचर्ड टेंपल साहेब यांनीं नागपुर प्रांतांतून नेंभार्ड साहेब यांस बढती करितां वऱ्हाडांत आणिलें ते सन १८७४ पावेतों पूर्व वऱ्हाडाचे कमिशनर होते व नंतर साऱ्या वऱ्हाडाचे कमिशनर झाले. यांची बुद्धिमता, उत्सुकता, व तत्परता फार वर्णनीय होती व तेणेंकरून यांची एकंदर कारकीर्द भरभराटीची, व उत्तम फलद्रुप अशी झाली याबद्दल रेसिडेंट साहेब संतोषपूर्वक त्यांचे आभार मानून ही गोष्ट सर्वत्र प्रसिद्ध करितात. व त्यांचा पुढील काळ सुखानें जावो असें इच्छितात.

कर्नेल अलार्डाईस साहेब यांचे जाण्याचे संबधानेंही रेसिडेंट साहेबांनीं रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध केलें आहे कीं, हे सन १८५४ सालापासून वऱ्हाडांत होते यांनीं या देशाकरितां फार श्रम केले. हे डिस्ट्रिक्ट आफिसर व कमिशनर होते व त्यांचीं कामें रेसिडेंट साहेबांचे पहाण्यांत आलीं तीं मोलवान व लोकांस सुखप्रद अशीं आहेत हें प्रसिद्ध रीतीनें सांगितल्या वाचून रेसिडेंट साहेबांच्यानें रहावत नाहीं. व ते त्यांचे आभार मानून त्यांस पुढें सुख इच्छितात.

स्टांप विकणारे लायसेन्स वेंडर यांजबद्दल काहीं नवीन नियम झाले आहेत ते आह्मी पुढील अंकांत लिहू.

आस्पिटल असिस्टंट लोकांच्या परिक्षेकरितां कामिटी नेमली आहे तींत सरजंट मेजर आवट साहेब स्यानिटरी कमिशनर प्रेसिडेंट व डा० लिटल साहेब मेंबर नेमिले आहेत.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं वणीचे तहशिलदार रा. रा. सी शेषाचलम मुदलियार प्रोबेशनरी होते त्यांस रेसिडेंट साहेबांनीं तिसरे प्रतीचे कायम तहशिलदार नेमिलें.

वऱ्हाडांत उमरावतीस ल्युनाटिक असाइलम ह्मणजे वेड्याचे इस्पितळ नवीन केलें आहे त्यासंबंधी नियम दुसरे तारखेच्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें छापून आले आहेत त्यांतील मतलब आह्मी पुढें लिहू.

खामगावचे पोलिस इन्स्पेक्टर मि. स्टिविन्सन साहेब यांनीं डाके घालणारे १०।१२ वणजारी लोक मोठे बहादुरीनें पकडले याबद्दल त्यांची इन्स्पेक्टर जनरल यांनीं तारीफ केली व ती कमिशनरमार्फत रेसिडेंट साहेबांकडे गेल्यावरून त्यांनाही ती मान्य होऊन स्टिविनसन साहेबांचे गौरवार्थ त्यांनीं ती रेसिडेंसी आर्डरमध्यें सविस्तर छापून प्रसिद्ध केली आहे. स्टिविनसन सा. पहिले प्रतीचे इन्स्पेक्टर आहेत. यांना, चांगल्या कामगिरीबद्दल एक तरवार बक्षीस मिळाली आहे व परवा जानेवारी महिन्यांत रेसिडेंट साहेबांनीं उत्तम वर्तणुकीबद्दल सर्टिफिकेटही दिलें आहे. याच प्रकरणांत आमचे एथील थर्ड क्लास पोलिस इन्स्पेक्टर मि० स्याविंयल सा. यांनीं त्यांस चांगली मदत केल्याबद्दल त्यांचीही तारीफ आली आहे ती पाहून आह्मांस संतोष होतो.

एथील वकील रा. रा. रंगोरामचंद्र यांचे माडीवर चोर तारीख ११ रोज बुधवारीं रात्रीं चढून छपून बसला. व काहीं प्रयत्न करूं लागला इतक्यांत रंगोपंत जागे झाले तेव्हां तो पळूं लागला पण त्यांनीं त्यास पछाडलें व गलबला केला त्यावरून शेजारी पाजारी व पोलिसचे लोक धावून येऊन त्यास गिरफ्त केलें. हा एथीलच राहाणारा असून रजपुत जातीचा तरुण मुलगा आहे कालरोजीं मि. निकोलेट्स साहेबांपुढें हा मुकद्दमा चालून यास शिक्षा १०० फटक्यांची झाली.

बालहात्या व गर्भपात—तारीख १२ रोजीं रस्त्याच्या बाजूस एका विहिरींत दोन तीन दिवसांपूर्वीं टाकलेलें एक मूल नाळासह मेलेलें सापडलें पण अजून त्याचे घातक आईचा पत्ता नाहीं पोलिसमार्फत तपास चालू असल्याचें कळतें.

इकडील दिवाणी कोर्टें आजपासूनच उन्हाळ्याचे सुटीनिमित्त १० जूनपर्यंत बंद रहातील.

इकडील हैस्कूलें तारीख २० एप्रिल पासून तारीख १० जूनपर्यंत उष्णकाळाचे सुटीसाठी बंद रहातील.

या आठवड्यांत इचलकरंजीकर नाटकार एथें येऊन नागपुराकडे गेले. व वाशिमाकडून सांगलीकर तारीख १२ रोजीं आले काल त्यांचा सुरतसुधन्वा हा पहिला खेळ झाला.

उमरावती ( मित्राकडून तारीख १३ माहे एप्रिल सन १८७७ इसवी.)

कोहिनूरचे माजी एडिटर फैजूलहुसेन अकोल्यास नुकतेच आले होते त्यांनीं एके दहा रुपयाच्या नोटीचे दोन भाग दहा दहा रुपयांस विकले अशा गुन्ह्यावरून उमरावतीस त्यांस पोलिसानें पकडलें आहे.

उमरावतीचा सेशनमुकद्दमा पुढले लिपेवर तकूब राहिला. व एवतमाळच्या गुन्हेगारास दोन वर्षांची शिक्षा झाली.

कपाशीचे व्यापारी मि० बर्गर साहेब यांजकडे नक्त रुपये व नोटा वगैरे मिळून सुमार सवापांचशे रुपयांची चोरी झाली.

कर्नेल मिलेट साहेब पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल राजिनामा देऊन १६वे तारखेपासून काम सोडणार व विलायतेस जाणार. त्यांना ४२५० रुपये सालीना पेनशन मिळणार.

रा. रा. एकनाथ मोरेश्वर क्लार्क आफ धि कोर्ट यांनीं येथील अव्वाची रा. रा. भिमरावजी यांशी कांहीं अधिक प्रसंग केल्याबद्दल डिपुटी कमिशनर साहेबांनीं ह्यांकडून त्यांची क्षमा मागविली व ती त्यांनीं निमुटपणें मागितली असें ऐकतों.

## वर्तमानसार

कबुलाकडील खबर— रशियन गव्हरनरानें सरदार अबदुल रहमानखान यास चार पायदळ पलटणी व साहा घोडेस्वारपलटणी इतक्या फौजेचे मुख्य केलें असून सरदार जहांदरशहा यास कमांडर इन्चीफ केलें आहे. जहांदरशहा यास हिरात व मेमन यांच्या हद्दीवरील संस्थानिकांकडे पाठविलें आहे. या पाठविण्याचा हेतु असा सांगतात कीं, हुमन नदीच्या काठीं कार्चीं व शराबाद एथें जमादिलावल महिन्यांत दरबार होणार आहे तेथें गव्हरनरास सन्मान देण्याकरितां तिकडील राजे रजेवाड्यांस बोलावणें करावें. हा दरबार झाल्यावर गव्हरनरही त्या त्या ठिकाणीं आपल्या छावण्या स्थापन करण्याकरितां जाणार आहे. जे संस्थानिक या दरबारांत येऊन गव्हरनराचा सन्मान करणार नाहींत त्यांजवर घुसा होऊन खोकंदच्या खाना सारखी त्यांची स्थिति केली जाईल अशीही त्यास धमकी दिली असून जे मुद्दाम गैरहजर रहातील त्यांचा मुलूख खालसा करून त्यांचीं मुलें माणसें ठार मारलीं जातील असेंही कळविलें आहे या नव्या छावण्या स्थापन झाल्यावर सरदार अबदुल रहमानखान यास कार्षीं, एथील छावणीचा मुख्य करून सरदारखानास शिराबादच्या छावणीचा मुख्य करावा आणि बाकीची राज्यव्यवस्था रशियन लोकांच्या हातांत ठेवावी असा रशियन गव्हरनरचा हेतु आहे.

टर्कीच्या संबंधानें जो एक मसुदा इतर राष्ट्रांच्या सह्यांकरितां रशियानें पुढें आणला होता व ज्यावर इंग्लंड वगैरेनीं नुकत्याच सह्या केल्या त्या मसुद्यांत किंवा त्या कागदांत अशा मतलबाचा ठराव आहे कीं, टर्कीबद्दल एकोप्यानें विचार करणें जरूर आहे; व तो एकोपा मांटिनिग्रोच्या फायद्याकडचा आहे. टर्कीनें आपली फौज लढाईपासून माघारी घेऊन आपली राज्यव्यवस्था सुधारण्याविषयीं खात्री करावी. याप्रमाणें व्यवस्था होते कीं, नाहीं यावर या सहा राष्ट्रांचे वकील नजर ठेवतील व योग्य सुधारणा होण्याची आशा नाहीं असें जर त्यांस दिसून येईल तर टर्कीच्या राज्यांतील ख्रिस्ती प्रजेच्या सुखाकरितां व इतर व्यवस्थेकरितां तीं सहा राष्ट्रें एकमतानें विचार करून निर्णय करितील. असें ता. ६ च्या विलायतच्या तारेवरून समजतें, पण ता. ९ च्या कान्स्टांटिनोपलच्या तारेवरून समजतें कीं, तो करार टर्कीसरकारास नापसंत आहे आणि त्यांत ठरविल्याप्रमाणें फौज माघारी घेण्या

चे टकीसाकार बहुतकरून नाकबूल करील.

हिंदुस्थानांतील सर्व मिठागरे आपल्या हातांत घेऊन आपल्या हुकुमावाचून कोठें कोणीही मीठ पिकवूं नये असें करण्याविषयीं हिंदुस्थानसरकार तजवीज करीत आहे व आपल्या राज्यांतील तें खातें बंद करावयाचें झाल्यास आपल्यास सालिना ४,००,००० रुपयांचें नुकसान येणार तें इंग्रजसरकारानें भरून देण्यास तयार झालें पाहिजे असें जयपूरच्या महाराजांचें ह्मणणें आहे.

वऱ्हामपूर जिल्ह्यांतील लालगोळा येथील डेपुटी माजिस्त्रेट मि. अंडरू याजवर एक चमत्कारीक आरोप आला आहे. तेथील हिरा लाल शा याणें त्याजवर अशी फिर्याद केली आहे कीं, ता. १९ मार्च रोजीं मि. अंडरू हा सकाळचे ११ वाजतां दारू पिऊन छाकटा होऊन माझ्या आफीसांत आला व त्याबरोबर म्युनिसिपल ओव्हरसियर बाबू अविनशचंद्र होता. त्याणें माझ्या आफिसांत कांहीं उपद्रव केल्यावरून माझ्या चाकरांनीं मला कळविलें व मी येऊन त्यास सलाम केल्यावर मि. अंडरू मला ह्मणाला कीं, एक घेऊन ये [ हा शब्द बिभत्स असल्यामुळें गाळला आहे ] मी तो हुकूम नाकबूल केल्यावरून त्याणें मला सक्तीनें आपल्या घरीं नेलें व तेथें त्रासदायक वर्तणूक करून जे भेटले त्यांस शिव्यावगैरे दिल्या आणि माझ्या बायकोस पकडूं लागला तेव्हां ज्यांचीं नावें मी साक्षींत घातलीं आहेत त्यांणीं तीस सोडविलें. या अर्जाचा अद्याप निकाल होणें आहे, पण तो काय होईल पाहावा.

पाच वर्षांपूर्वींच्या युरोपांतील बड्या लढाईंत प्रसिधीस आलेले प्रशियाचे प्रधान प्रिन्स बिस्मार्क यांणीं आपल्या प्रधानकीच्या कामाचा राजीनामा दिला असें ह्मणतात. अ. द.

ह्मैसूर येथें गेल्या सोमवारीं दीड तास चांगला पाऊस पडला असें समजतें.

दिल्ली कालेज मोडूं नये ह्मणून लाहोर एथील शिकलेल्या लोकांनीं वैसराय यांस अर्ज केला आहे.

हिंदुस्थानांतील सर्व सरकारी खजिन्यांत मिळून गेल्या फेब्रुवारी अखेर १२,००,२७,२९५ रुपये शिल्लक होती.

नाशिक जिल्ह्यांत बनावट हुकूम मामलेदारांस पाठवून सरकारी खजिन्यांतील सुमार वीस हजार रुपये उपटण्याचा कोणी लुच्चे लोकांनीं प्रयत्न केला होता. त्याबद्दल पोलिस चौकशी करीत आहे असें समजतें. इं. प्र.

इंडियन डेली-न्यूज वर्तमानपत्रावरून समजतें कीं, हिंदुस्थान सरकारानें असा हुकूम फरमाविला आहे कीं, यापुढें १८ वर्षांचे वयाचे आंतील गुन्हेगार मनुष्यास काळेपाण्याची शिक्षा देऊं नये.

विलायतेंतील अथिनियन नावाचे वर्तमानपत्रावरून कळतें कीं, तारीख १६ शुक्रवार रोजीं डाक्टर बर्डवुड साहेबांनीं, एतद्देशीय वर्तमानपत्रें, या विषयावर फार सुरस व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं आपलें मत असें दर्शविलें कीं एतद्देशीय वर्तमानपत्रें स्वामिभक्तीपरायण असतात.

सुरत एथील सरकारी तिजोरीचा खजानिस यानें तिजोरींतून सुमार २५००० रुपये खाऊन पळून गेल्याचें समजतें.

मि० इडन बंगालचे लेफटिनेंट गवरनर यांणीं असा ठराव केला आहे कीं, बंगाल्यांत जीं अपिलें ऐकण्याचीं कोर्टें होणार आहेत त्यांवरील जज्जाच्या जागा नेटिव व युरोपियन यांत भेद न करितां सारख्याच द्यावयाच्या. या जागांचा पगार १५०० पासून ३००० रुपया पर्यंत ठेवणार. व ज्या जागा नेटिवास द्यावयाच्या त्या नेटिव बारिस्टर वगैरे लोकांस देणार ह्मणून समजतें. ने. ओ.

सोलापुर येथील व्यापाऱ्यांकडून थोडेच दिवसांत एकंदर जातीचे मिळून चाळीस हजार लोकांस भोजन मिळणार आहे. व याजबद्दल हल्लीं पेठेंत वर्गणी चालू आहे. हें भोजन बहुतकरून अनाथ लोकांकरितां असून एकच दिवस न होतां आठ दिवस चालेल. भोजनाचा बेत तूप, भात, पांढरी पोळी आणि गव्हाची खीर असा होणार. क. त.

## सिविल सर्विसच्या परिक्षेच्या संबंधानें कलकत्ता एथें जाहिर सभा

अलिकडे सिविल सर्विसच्या जागा एतद्देशीय लोकांस देण्याच्या बाबतींत दिवसेंदिवस सरकाराकडून अधिकाधिक प्रतिबंध आणि लोकांकडून त्या मिळाव्या ह्मणून अधिकाधिक उत्सुकता व प्रयत्न, असा प्रकार होत चालला आहे. स्वार्थ मोठा वाईट आहे कारण त्याजमुळें मन शुद्धि व प्रेम यांजमध्यें कमीपणा, न्यायान्याय व धर्माधर्म यांजकडे दुर्लक्ष आणि उपकाराचे व एकंदरीत वास्तविक हिताचे देखील विस्मरण होऊं लागतें. हल्लींच्या स्थितींत आमच्या देशांतील राज्याधिकारी सरकार व त्यांचे युरोपियन कामगार आणि एतद्देशीय प्रजा व नवीन शिकलेले लोक यांजमध्यें परस्परांविषयीं प्रेम व पूज्यबुद्धि कमी होत जाऊन असंतोष वाढत जाणें ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. सरकारानें वर्षानवर्ष व वेळोवेळीं वचनें देत जाणें आणि तीं त्याजकडून पूर्ण न होणें हा प्रकार थोर, मोठ्या व उदार सरकारास शोभत नाहीं. लोकही सरकारास विशेष मेहरबानी करा असें ह्मणत नाहींत. फक्त बोलल्याप्रमाणें परीक्षा वगैरे घेऊन योग्य तें करा एवढेंच त्यांचें ह्मणणें आहे. त्याप्रमाणें तर कांहीं होत नसून उलट व प्रतिबंधक असे प्रकार होत चालले आहेत हें पाहून कलकत्ता एथील एतद्देशीय सुशिक्षित गृहस्थांनीं विशेष उद्योग करण्याचें मनावर घेतलें आहे. सरकारानें विलायतेंतील एतद्देशीय लोकांकरितां स्कालरशिपा होत्या त्या कांहीं वर्षांपूर्वीं बंद केल्या आणि आतां सिविल सर्विसच्या परीक्षेस जाण्याच्या वर्षाचीही यत्ता २१ होती ती १९ केली. याजवरून एतद्देशीय गृहस्थांस विलायतेस या परीक्षेस जाण्याचा वस्तुतः मार्गच बंद झाला. यास्तव कलकत्ता एथील इंडियन असोसिएशनच्या उद्योगानें ता. २४ मार्च रोजीं टौनहालमध्यें राणी सरकारास अर्ज करण्याचा विचार करण्याकरितां एतद्देशीय लोकांची मोठी सभा झाली. या प्रसंगीं दोन हजारांपासून तीन हजार पर्यंत नवीन शिकलेले गृहस्थ जमले होते व बसावयास तर काय पण उभे रहाण्यास देखील कित्ती एकांस जागा मिळाली नाहीं ह्मणून परत जावें लागलें. एतद्देशीय लोकांस सिविल सर्विसच्या जागा मिळाव्या हा विषय विशेष सर्वांस सारखा व साधारण असल्यामुळें आमच्या लोकांनीं जाति, धर्म, पंथ वगैरेच्या बाबी एकीकडे ठेवून सर्व प्रकारचे लोक तेथें त्या प्रसंगीं जमले व त्यांनीं आपापलें कर्तव्य केलें ही मोठी आनंदाची गोष्ट मानली पाहिजे. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती ब्राह्मधर्मी वगैरे सर्व प्रकारचे प्रमुख गृहस्थ त्या वेळेस तेथें आले होते सबब या सभेची हकीकत आह्मी आपले वाचकांस थोडक्यांत कळवितों-

प्रथम बाबू केशव चंद्रसेन यांच्या सूचनेवरून आन. महाराज नरेंद्र कृष्ण बहादुर यांची अध्यक्ष स्थानीं योजना झाली. अध्यक्षानीं कामास आरंभ केल्यावर बाबू आनंद मोहन बोस यांनीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतून व गृहस्थांकडून या कामास आपली पूर्ण संमति आहे ह्मणून वगैरे मजकुराचीं आलेलीं पत्रें व तारा वाचल्या. पुढें बाबू बारिस्टर मन मोहन घोस यांनीं अशी पहिली सूचना केली कीं या सभेचें असें मत आहे कीं आपल्या प्रिय राज्याधिकारी राणी साहेब यांनीं हिंदुस्थानच्या लोकांस विचारपूर्वक व खात्रीनें दिलेलें वचन यथास्थित रीतीनें पुरें करण्यास ज्या प्रमाणें विलायतेंतील लोकांस हिंदुस्थानच्या सनदी सिविल सर्विसमध्यें प्रवेश होण्यास सवडी आहेत त्या प्रमाणेंच हिंदुस्थानांतील लोकांस वस्तुतः असणें अवश्य आहे आणि हिंदुस्थानच्या सिविल सर्विस करितां इंग्लंडच्या व हिंदुस्थानच्या उमेदवारांच्या गुणाच्या व योग्यतेच्या संबंधानें समजुतीच्या प्रकारांत देशाच्या व ज्ञातीच्या संबंधानें भेद असणें गैर आहे असें या सभेस वाटतें. या सूचनेस रेवरेंड कालिचरण बानर्जी यांनीं अनुमोदन दिलें व ती सर्वांनुमतें मान्य झाली.

डाक्टर महेंद्रलाल सरकार यांनीं दुसरी अशी सूचना केली कीं हिंदुस्थानच्या सिविल सर्विसच्या परीक्षेच्या संबंधानें वयाची यत्ता २१ होती ती १९ वर्षें केली याजबद्दल या सभेस वाईट वाटतें. कारण या वयाच्या फेरफाराच्या योगानें हल्लींचा पाठ करण्याचा वाईट प्रकार आहे तो अधिक वाढेल. सिविल सर्विसच्या कामांत कमी शिक्षणाच्या व योग्यतेच्या मनुष्याचा प्रवेश होईल, सिविल सर्विसचें काम चांगल्या प्रकारच्या हुशारीनें चालणार नाही आणि हिंदुस्थानच्या लोकांनीं या परीक्षेस जाऊं नये असा वस्तुतः परिणाम होईल. या सूचनेस बाबू हेमचंद्र बानर्जी यांचें अनुमत मिळून ती सर्वांनुमतें पास झाली.

बाबू आनंद मोहन बोस यांनीं पुढें अशी सूचना केली कीं सिविल सर्विस करितां चांगले सुशिक्षित व हुशार मनुष्य मिळावे हा जो महाराणी सरकारचा उद्देश आहे तो उत्तम आहे असें मानून या सभेचें असें मत आहे कीं तो उद्देश त्या वेळचे गवरनर जनरल लार्ड नार्थब्रूक व दुसरे योग्य सरकारी कामगार यांनीं शिफारस केल्याप्रमाणें २५ वर्षांची यत्ता ठरविल्यानें उत्तम प्रकारें सिद्धीस जाईल, आणि सरकारी काम चांगल्या प्रकारें चालावें याजकरितां व हिंदुस्थानच्यां उमेदवारांस या परीक्षेस येण्यास मार्ग व्हावा याजकरितां ही वयाची यत्ता वाढविणें अवश्य आहे असें या सभेस वाटतें. बाबू अमरेंद्र नाथ चातर्जी यांचें अनुमत या सूचनेस मिळून ती सर्वांनुमतें कबूल झाली.

त्याजवर बाबू नरेंद्रनाथ सेन यांनीं केलेली सूचना मान्य झाली ती येणेंप्रमाणें:- या सभेचें असें मत आहे कीं राणी साहेब व पार्लमेंट याचे सत् हेतु सिद्धीस जाण्याकरितां, हिंदुस्थानच्या लोकांच्या मान्य केलेल्या हक्काप्रमाणें आशेच्या तृप्त्यर्थ व त्यांच्या स्वदेच्या सिविल सर्विसमध्यें प्रवेश होण्याच्या सवडीसाठीं लंडनाप्रमाणें हिंदुस्थान देशांत एक अगर अनेक ठिकाणीं त्याच वेळेस तशीच परीक्षा होण्याची तजवीज होणें अवश्य आहे व तेथें एकंदर नेमणुकांपैकीं अमुक मानानें त्या जाग्याकरितां परीक्षा प्रतिवर्षीं होत जावी.

नंतर कुमार कांतीं चंद्र सिंग यानीं सूचना केली व तीस बाबू शामचरण सरकार यांचें अनुमोदन मिळून सर्वांनुमतें मान्य झाली तीः—या सभेत झालेल्या ठरावाचे तात्पर्याचा अर्ज तयार करून पार्लमेंट सभेस पाठविण्याकरितां. पुढील गृहस्थांची कामिटी नेमिली:— आन. महाराज नरेंद्र कृष्ण बहादूर; डा. राजेंद्रलाल मित्र; आन. क्रिस्त दासपाळ; आन. नवाब मीर महमद अल्ली; बाबू केशव चंद्रसेन; डा० महेंद्रलाल सरकार; बारिस्टर बाबू मनमोहन घोस; बाबू चंद्रनाथ बोस, एम. ए. बी. एल. राजे शामशंकर राय चौधरी; बाबू गुरुदास बानर्जी व बाबू आनंद मोहन बोस सभासद व सेक्रेटरी.

पुढें आन. नवाब मीर महमद यांची सूचना झाली ती येणेंप्रमाणें:—या सभेची हकीकत छापून प्रसिद्ध व्हावी व ती पार्लमेंटच्या दोनही भागांतील सभासदांकडे अध्यक्षानीं सहीनिशी पाठवावी. या सूचनेस राजे शाम शंकर राई बहादर यांचें अनुमोदन मिळून ती सर्वांनुमतें मान्य झाली शेवटीं अध्यक्षाचे आभार मानून सभाविसर्जन झाली.

आतां हा आरंभ झालेला उद्योग एकदेशीय व एकाच भागाच्या हिताचा नसून सर्व हिंदुस्थानभर एतद्देशीय लोकांच्या हक्कांच्या व हिताच्या संबंधाचा आहे तेव्हां कलकत्याप्रमाणें, मुंबई; पुणें, मद्रास, अलहाबाद वगैरे मुख्य ठिकाणीं सभा होऊन राणी सरकारास या प्रमाणेंच अर्ज गेले पाहिजेत. अशा प्रसंगीं तरी आमची बाँबे असोसिएशन ही मंडळी जागृत होऊन आपलें काम करते किंवा कसें तें पहावें. ने. ओ.

---

हे पत्र अकोला एथें खंडेरावबाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता० २२ माहे एप्रिल सन १८७७ इ० अंक १६

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०१ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

## विविधज्ञानविस्तार.

मासिकपुस्तक.

[कुलस्त्रियः व गृहस्थ यांकरितां.]

शास्त्रीयविषय, आरोग्यविषय, भाषासुधारणा, मनोरंजन, पुस्तकपरीक्षा, सुंदर ग्रंथांचीं भाषांतरें, इतिहास, विख्यात पुरुषांचीं चरित्रें, कविता इत्यादि विषयांचा समावेश करणारें या प्रकारचें, सर्व महाराष्ट्र देशामध्यें हें एकच पुस्तक आहे.

किंमत.

| | रु. आ. |
|---|---|
| वर्षाची आगाऊ ........... | ३—० |
| मागाहून. ........ | ४—८ |
| सहामाही आगाऊ. | २—० |
| किरकोळ अंकास | ०—६ |
| टपाहांशील वर्षाचे. | ०—६ |

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत व्यवस्थापक यांच्या नांवें वर्षाची अगाऊ वर्गणी ( रु. ३ आ. ६ ) सुद्धां पत्र पाठविल्यास पुस्तक चालू होईल.

व्यवस्थापक, विविधज्ञानविस्तार,

मराठ्यांच्या इतिहासाला साधनीभूत अशा आमचे लोकांनीं लिहिलेल्या मराठे व मुसलमान यांच्या राज्याविषयीं जुन्या बखरी छापून प्रसिद्ध करण्याचा आजपर्यंत कोणी यत्न केला नव्हता, त्या आमचे पुस्तकांतून प्रसिद्ध व्हावयास आरंभ झाला आहे; हें पाहून राजेरजवाडे व संस्थानिक याकडे लक्ष देतील अशी उमेद आहे.

## नोटिसा

गंगाधर लोरावरमल साहू दुकान अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुकाराम चिमणाजी कुळकर्णी गोरेगावकर याजबद्दल चैत्र शुध्द १४ ची रकम रुपये २०९चा आकडा ज्यांत ज्यावेळेस रुपये मागाल त्यावेळेस देऊ ह्मणोन लिहिलें त्यास या नोटिसीने कळवितों कीं नोटिसीचे तारखेपासून ८ आठ दिवसांचे आंत सदरील रुपये देऊन आकड्यावर भरपाई करून घ्यावे असें न केल्यास दरमहा दरशेकडा दुहोत्राप्रमाणें व्याजासह घेण्याविषयीं कोर्ट खुलें होतांच फिर्याद करूं. तारीख १९ माहे एप्रिल सन १८७७ इसवी

[ सही ] दुलाजी वल्लद देवाजी पाटील मौजे कळंबेश्वर द. खु.

नोटिस.

महादजी वल्लद मारुती जाधव देशमुख रहाणार मोटेगाव प्रगणें रिसवड तालुके वाशिम यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यात येतें कीं तुह्मी आमचेवर हक्कामाबद्दल फिर्याद देणार तर तुमचा बाप व तुह्मी ज्याप्रमाणें मागाहून रुसूम घेत आलां त्याप्रमाणें मी देण्यास सिध्ध आहे. जर करितां रुसूम न घेतां विनाकारण फिर्याद कराल तर फिर्यादीचा खर्च मी देणार नाहीं. कळावें तारीख १८ माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) हणमंतराव वल्लद खानाजी देशमुख मुकद्दम मौजे मोटेगाव प्रगणे रिसवड ता० वाशीम दस्तुर खुद्द

नोटिस.

शिवलाल मिठूलाल ऊर्फ शिवलालबाबा आगरवाले रहाणार बाळापुर यांस सदु बाळमुकुंद आगरवाले अज्ञान पाळण करणार मातुश्री चिमाबाई भ्रतार बाळमुकुंद शंकरदास आगरवाले याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, मयत बाळमुकुंद शंकरदास यांणीं आपले मरणसमयीं माझा मुलगा अज्ञान असल्याकारणानें रुपयाचा अव्यवस्थित खर्च न व्हावा या हेतूनें च्यार पंचासमक्ष तुमचे जवळ ५००१ पांचहजार एक रुपया देऊन दुकानदारी चालविण्याकरितां दुकानावर मुनीम गुमास्ता सुंदरलाल मुऱ्हारसा यांजला नेमून दिला त्याप्रमाणें सदरील रुपयांबद्दल दुकानदारी लोकांचे गहाणवट वगैरेबद्दल बाळमुकुंद हे मेल्यापासून आजपावेतों ह्मणजे सुमार २॥ अडीच वर्षें चालले. तारीख २७ मार्च सन १८७७ इसवी रोजीं आमचा मुनीम गुमास्ता सुंदरलाल याजपासून तुह्मी दुकानच्या किल्ल्या हिसकून घेऊन त्याजला काढून दिलें तो मजकूर आह्मास कळल्यावर आह्मी तुह्मास चार लोकां समक्ष व पंचासक्ष किल्ल्या व दुकानदारींतील रोकड; गहाणवट व जमाखर्चाच्या वह्या पुर्जे वगैरे सर्व आमच्या अगर आमच्या मुनीम गुमास्त्याच्या स्वाधीन कराव्या असें सांगितलें असतां तुह्मी कांहीं एक न देतां जबाब दिला कीं तुह्मास वाटेल तो इलाज करावा. करितां तुह्मी किल्ल्या हिसकून घेतल्या त्या दिवसापासून आजपावेतों गहाणवटाच्या असाम्या व इतर रुपये घेऊन येऊन परत जातात त्यायोगानें आमचें नुकसान होत आहे करितां ही नोटिस तुह्मास देण्यांत येते कीं दुकानदारींतील रोकड, गहाणवट, जमाखर्चाच्या वह्या, किल्ल्या सहीत व पुराव्याचीं दस्तऐवजें कीं आहेत तीं असे सर्व आजपासून ८ आठ दिवसांचे आंत आमचे ताब्यांत द्यावे न दिल्यास रीतीप्रमाणें तजवीज करून नुकसानीसहित सर्व रकमा भरून घेण्यांत येतील शिवाय या नोटिसीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल. कळावे तारीख १९ माहे एप्रिल सन १८७७ इसवी मुक्काम अकोलें

(सही) सदु बाळमुकुंद आगरवाले अज्ञान पाळण करणार मातुश्री चिमाबाई भ्रतार बाळमुकुंद शंकरदास वस्ती बाळापुर हल्लीं मुक्काम अकोलें निशाणी खुद्द दस्तुर सदु बाळमुकुंद

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. गेल्या महिन्यांत मी प्रवासांत असतां पाहिलें कीं एका मास्तरानें रिटनांत बेवीस दिवस शाळा खुली होती ह्मणून लिहिलें आणि दुसऱ्या मास्तरानें तेराच दिवस शाळा खुली होती ह्मणून लिहिलें. दोन्ही रिटनें बिसाबीस लिहिलीं होतीं. आतां या दोहोंतून खरा कोण हें कोणी तरी सांगोंव कळावें.

एक प्रवासी

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

विनंती करण्यांत येते कीं, खालील चार ओळी मी आपले अल्प बुध्धीनें लिहिल्या आहेत त्यांत कांहीं कमजास्त असल्यास मेहेरबानीनें दुरुस्त करून येत्या अंकीं छापून प्रसिद्ध कराव्या.

या वऱ्हाडांत माजी डायरेक्टर आर. एस. सिंक्लेर साहेब बहादूर हे या प्रांतांत ८ । ९ वर्षें होते. तितक्या वेळांत वऱ्हाडांतील मास्तर लोक व शाळेंतील विद्यार्थी हे सुखांत असून आपलें कामही मोठ्या काळजीनें करीत होते. परंतु साहेब बहादूर मरण्याचे वेळेस असें वाटत होतें कीं पुढील डायरेक्टर कसे येतील ते येवोत परंतु ५ । ४ महिन्यांनीं सर्वत्र लोकांनीं असें ऐकिलें कीं, राव बहादूर नारायण भाई डायरेक्टर होऊन येणार तेव्हां सर्वत्रांस फारच आनंद झाला. कारण कीं, आतां आपले नेटिव्ह डायरेक्टर आहेत तर आपल्यावर तलवार न गाजवितां माजी डायरेक्टर साहेबांसारखे ठेवितील. अशा पुष्कळ ठिकाणीं गोष्टी निघत होत्या त्याप्रमाणें दिवसानुदिवस मास्तरांच्या हितयुक्त गोष्टी येत चालल्या आहेत—भाईसाहेबांस या प्रांतांत येऊन एक वर्ष होऊन गेलें तितक्यामध्यें इयत्ते विषयीं आणि मास्तर लोकांचे फेरफारा विषयीं ज्या तजावीजी केल्या त्या फारच उत्तम प्रकारच्या केल्या आहेत परंतु एक महिन्यामध्यें अशी वर्दता आह्मी ऐकिली आहे कीं जून महिन्यांत रिडक्शन होणार आहे. व गेल्या पांच वर्षांत ज्याप्रमाणें रिडक्शन झालें त्याप्रमाणें आताही तजवीज नवीन आलेले डायरेक्टर करतील ही आह्मास भरवसा आहे. हल्लीं वऱ्हाडांत भाई साहेबांनीं मास्तर लोकांच्या सहा, पाच, आठ अशा रुपयांच्या जागा पुणें व सातारा प्रांताच्या रीती प्रमाणें केल्या आहेत त्या आतां लागू करावयाच्या नव्हत्या. कारण अद्यापपर्यंत तिकडील सर येऊन इकडच्या लोकांस विद्येची रुची लागली नाहीं. अशा प्रकारच्या जागा झाल्यामुळें विद्याखात्याचा मान फार कमी झाला तो असा कीं ज्या गावांत मास्तर आहे त्या गावांतील अडाणी लोक आपलीं मुलें शाळेंत न पाठवितां असें कारण सांगतात कीं, तुह्मी अकोलें, उमरावती एथील परीक्षा देऊन जवळचे पैसे खर्चून ६ अगर ८ रुपयांची जागा मिळविली. शिपाई देखील कोणत्याही प्रकारची कटकट न करितां ते ७, ८ रुपये मिळवितात. याकरितां आमचे जवळचे पैसे खर्चून आह्मी आपल्या मुलांस शिकवीत नाहीं. यामुळें वऱ्हाडांतील बहुत शाळा बरोबर चालत नाहींत.

या करितां पत्रद्वारें भाई साहेबांस विनंती करण्यांत येते कीं आतां भाई साहेबांनीं रिडक्शन करण्याचे वेळेस या गरीब लोकांचे पगार निदान १० रुपये तरी करावे कारण दर वर्षीं काळ पडतोच व तेणेंकरून या गरीब लोकांचे फार हाल होतात. कारण त्या लोकांस पगारा शिवाय दुसरी कांहींच मिळकत नाहीं. आह्मी यावेळेंत आपले दुकानावर बसलों असतां एक खेड्याचा मास्तर निदान ६० वर्षे वयाचा असून त्याला मुलें बाळेंही बरींच होतीं. तो आमचेपुढें कांहीं कपडा घेण्याकरितां बसला असतां त्याच्या पाठी मागून त्याचा ९ वर्षांचा मुलगा आला तो अज्ञान असल्यामुळें ह्मणूं लागला कीं मला बंडी करितां एक छींट घ्या असें ह्मटल्यावरून त्या वृद्धाच्या डोळ्यांत पाणी आलें. त्यावरून आह्मी त्याला विच्यारलें कीं तुह्माला पगार काय मिळतो तेव्हां त्यांणीं असें सांगितलें कीं पहिल्यानें १५ मिळत होते आणि भाई साहेब आल्यापासून आतां दहा मिळतात आणि जवळ खटला मोठा

असल्यामुळें मला हे रुपये पुरे होत नाहींत असें सांगितल्यावरून मनाला फार दुःख वाटून आम्ही आलों छीट बक्षीस दिलें याकरितां भाई साहेबांस विनंती करितो कीं आपण रिडकुशन करते वेळेस अशा गरीब लोकांसही दोन दोन रुपये वाढवावे म्हणजे तें त्यांचे फार आभारी होऊन त्यांचे उपकार जन्मभर विसरणार नाहींत. पत्रविस्तार फार झाला म्हणून आतां पुरे करितों कळावें.

चिंतामण मोरेश्वर साहू
दुकान नामरदास.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. पुढील मजकुरास आपल्या सुंदर व सर्वमान्य पत्रीं जागा मिळावी अशी विनयपूर्वक प्रार्थना करितों.

अकोट एथील इंग्लिश मराठी शाळेंतील विद्यार्थ्यांस वार्षिक परीक्षेबद्दल बक्षिसें वाटण्याचा समारंभ तारीख १९ माहे मजकूर रोजीं सायंकाळीं चार वाजतां शाळागृहांत झाला. समारंभस्थल उत्तम प्रकारें सुशोभित केलें होतें व लोकांस बसण्याची व्यवस्था चांगली केली होती. मि. अर्देसर दिनमाजी साहेब तालुक्याचे तहशिलदार, मि. सिराजुद्दीन मुनसफ सा. रा. रा. गबुसिंग जमादार साहेब, रा. रा. विठ्ठल कृष्ण जोध, मि. गुलाम हसन वल्द गुलाम रसूल उर्फ हसुबाबा संमत देशमुख स्कूल कमेटीचे मेंबर, रा. रा. केशव कोंडो वकील, व गांवांतील सभ्य गृहस्थ शेट सावकार व इतर लोक मिळून १९० मंडळीचा समाज जमला होता. शाळेचे हेडमास्तर सदाशिव गोविंद दामले यांच्या विनंतीवरून तहशि० सा. यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें. सर्व मंडळी आपापल्या योग्य स्थानीं बसल्यावर अध्यक्षांनीं सभेचा उद्देश सर्वांस कळविला. नंतर हेडमास्तर यांणीं या शाळेची व शाळाखात्याची हकीकत थोडक्यांत सांगितली. तींत वऱ्हाड प्रांतांत शाळाखातें कधींपासून सुरू झालें, अकोट एथील शाळा कधीं स्थापन झाली, व त्या वेळेस तींत मुलें किती होतीं व हल्लीं मुलांची संख्या बरीच अधिक झाली याचें कारण काय, हायस्कूलच्या प्रवेश परीक्षेत या शाळेंतील किती मुलें पास झालीं, सरकारी व इतर प्रकारच्या नोकऱ्या कोण कोणास मिळाल्या, स्कूल कमेटीचे मेंबर शाळेच्या हिताविषयीं कोणत्या रीतीनें झटतात वगैरे मुख्य मुख्य मुद्दे होते. नंतर पहिल्या वर्गांतील एका मुलानें "विद्येपासून फायदे" या विषयावर एक निबंध वाचिला व कांहीं मुलांनीं इंग्रजी व मराठी कविता उत्तम प्रकारें म्हटल्या. नंतर अध्यक्षांनीं शाळेची सांप्रतची स्थिति चांगली आहे, मास्तर लोक आपापलीं कामें फार लक्ष लावून करितात वगैरे गोष्टींस अनुसरून सुरस भाषण केलें आणि मुलांस झटून विद्याभ्यास करण्याविषयीं व आईबापांस आपापलीं मुलें नियमानें शाळेंत पाठविण्याविषयीं उपदेशपर दोन गोष्टी सांगून मुलांस बक्षिसें वाटलीं. बक्षिसें मिळण्यास योग्य अशा मुलांच्या संख्येच्या मानानें सरकारांतून मिळालेलीं पुस्तकें थोडीं होतीं म्हणून तहशिलदार साहेब व स्कूल कमिटीचे अध्यक्ष रा. रा. गबुशिंग जमादार या उभयतांनीं १८ रुपयांची रक्कम पूर्वींच तयार करून ठेविली होती, त्या रकमे पैकीं सुमारें दहा रुपयांचीं पुस्तकें मुलांस वाटलीं, व बाकीचे रुपये मिठाई करितां व समारंभाच्या इतर खर्चा करितां दिले. बक्षिसें वाटणें झाल्यावर, तहशिलदार साहेब यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें व ते शाळेच्या कामीं नेहमी पाहिजे ती मदत मोठ्या उत्कंठेनें देतात, व स्कूल कमिटीचे मेंबर शाळेच्या हिता विषयीं फार झटतात, व इतर गृहस्थांनीं समारंभास येण्याची तसदी घेतली, याजकरितां त्यांचे यथानुक्रमें हेड मास्तर यांनीं आभार मानिले. शेवटीं सर्वांस विडे, तुरे, अत्तर, गुलाब दिल्यावर मुलांस मिठाई वाटली आणि सभा विसर्जन झाली. याप्रमाणें बक्षिसें वाटण्याचा समारंभ सिद्धिस गेला, व तो पाहून सर्व लोकांस फार आनंद झाला व त्यांनीं समारंभ करणाऱ्यांची मोठी तारीफ केली, व शाळेपासून मुलांस खरोखर फायदा होतो असे उद्गार त्यांच्या मुखांतून निघाले. अशा प्रकारचा समारंभ या पूर्वीं अकोटांत कधींच झाला नव्हता. ही एक नवी टुम रा. रा. सदाशिवराव हेड मास्तर यांनीं लोकांच्या नजरे समोर आणिली.

यासमयीं एक महत्वाची गोष्ट येथें लिहिणें अवश्य आहे ती ही कीं शाळेंतील मुलांची शरीरप्रकृति नीट राहण्याकरितां व्यायामाची फार आवश्यकता आहे. अशा अलिशान रेसिडेंट साहेब बाहादुर यांच्या उद्देशावरून, कमिटीचे मेंबर रा. रा. गबुशिंग जमादार यांनीं २५ रुपये व रा. रा. विठ्ठल कृष्ण जोध यांनीं २५ रुपये मिळून ५० रुपयांची रक्कम कसरतीचे सामान तयार करण्याकरितां दिली, व तिसरे मेंबर हसुबाबा देशमुख हेही २५ रुपये देणार आहेत व सामान तयार करण्याचें काम चालू आहे. गबुशिंग हे या कामीं आणखी पैसा लागल्यास देण्यास तयार आहेत. हे गृहस्थ कोणत्याही सार्वजनिक हिताच्या कामीं मदत करण्यास नेहमी पुढारी असतात. कमिटीदारांनीं वर्गणी दिल्याबद्दलचा रिपोर्ट हेड मास्तर यांनीं राव बहादुर डायरेक्टर साहेब यांजकडेस केल्यावरून, या आपल्या उदार कृत्यानें आम्ही फार खुष झालों, ही गोष्ट वऱ्हाड शाळा पत्रकांत व खात्याच्या वार्षिक रिपोर्टांत मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करूं, आम्ही आपले फार आभार मानितों, असें कमिटी दारांस कळविण्याविषयीं डायरेक्टर साहेब यांचा हुकूम झाल्यावरून हेड मास्तर यांनीं समारंभाच्या वेळीं तें कमिटी दारांस कळविलें. कळावें. तारीख १९ माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

एक लोकहितेच्छु.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख शुध्द ९ शाके १७९९

# मनुष्याच्या निर्वाहास निदान किति अन्न पाहिजे?

मुंबई व मद्रास इलाख्यांत मोठा दुष्काळ पडला आहे व लोकांची अन्नान्न दशा झाली आहे व कित्येक मरत आहेत हें पाहून सरकारानें गरीब लोकांचे जीव वाचविण्याकरितां रस्ते, तलाव वगैरेचीं कामें काढलीं आहेत व त्यांवर मजुरी करणारे लोक ठेवून त्यांस अच्छेर धान्य व दोन पैसे दररोज देण्याचा ठराव केला आहे. बंगाली अच्छेर धान्यानें मनुष्याचा गुजारा होत नाहीं व ज्याना दिवसभर मजुरी करावी लागते त्यांना तर सुमार शेराहून अधिक अन्न लागते म्हणून तेवढ्याच अन्नावर त्यांस ठेवल्यानें त्यांचा उपासमारा होतो. व असे कित्येक दिवस होत गेल्यानें कित्येक मजूर काम करण्यास अशक्त झाले, आजारी पडले व मरणेंही पावले अशीं वर्तमानें आलीं आहेत हें ऐकून आम्हांस फार दुःख वाटतें.

पहिल्यानें मजुरीचे दर बरेच सढळ होते व तेणेंकरून लोकांचा गुजारा चांगला होत असे पण अलीकडे सरकारानें सर रिचर्ड टेंपल सा. यांची दुष्काळ निवारणार्थ योजना केली व त्यांनीं मजुरीचें मान कमी करून प्रत्येकास अच्छेर धान्य द्यावें असें ठरविलें व त्याबरहुकूम वाहिवाट सुरू केली आणि ती हिंदुस्थान सरकारास मानवली पण हिचा परिणाम चांगला होतो दिसत नाहीं. लोकांचे व वर्तमानपत्र कर्त्यांचे बोभाट मजुरांचा उपासमारा होतो अशाविषयीं बहुत आहेत. व मद्रासचे स्यानिटरी कमिशनर डा. कार्निश सा. यांनीं तर मजुरांचे जीव वाचविण्यावर दृष्टी देऊन साहसानें मोठी खटपट चालवली आहे. आम्ही इच्छितों कीं कृपाळुपरमेश्वरानें त्यांचे प्रयत्नास यश द्यावें.

सर रिचर्ड टेंपल साहेब यांनीं अच्छेर धान्य मनुष्यास पुरेल असें मत काढिल्या बरोबर डा० कार्निश साहेबांनीं आपलें मत दिलें कीं, तितक्यानें मनुष्याचा यथास्थित उदरनिर्वाह व्हावयाचा नाहीं. पुढें तें सर्व प्रकरण हिंदुस्थान सरकाराकडे गेलें व त्यांनीं टेंपल साहेबाचें मत मात्र सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध केलें व त्याप्रमाणें ठराव केला. हें पाहून अलीकडे कार्निश साहेबांनीं टेंपल साहेबाच्या मताविरुद्ध असें दुसरें एक मोठें विस्तारयुक्त पत्र सरकारास लिहिलें आहे व तें या आठवड्यांतल्या टाइम्स आफ इंडियामध्यें आम्ही पाहिलें. त्यांचे विचार शास्त्रीय शोधाचे, व्यवहारानुभवाचे, प्रोक्त व रास्त दिसतात व त्यांच्या मताप्रमाणें दुसऱ्या १०।१९ नामांकित विद्वानांचीं मतें आहेत. ते म्हणतात कीं, मेहनतीचें काम करणारा मनुष्य अच्छेर अन्न दर रोज खात गेल्यानें त्याची शरीर प्रकृति चांगली रहाणार नाहीं, ती घटत जाईल, तो आजारी होईल, त्याचें आयुष्य कमी होईल, त्याला संतती फार कमी होईल, व जी होईल ती दुर्बळ होईल, आणि येणेंकरून एकंदर सर्व राष्ट्राचा दुर्बळपणा वाढून फार मोठी हानि होईल. आतांच त्यांनीं मरणाची संख्या हमेशापेक्षां कित्येकपट वाढल्याचें लिहिलें आहे, मनुष्यें अति अशक्त झालीं आहेत, स्त्रिया गरोदर व्हावयाचें मान कमी झालें आहे, व नूतनप्रसव बालकें मरणोन्मुख झालेलीं आहेत अशी माहिती सांगितली आहे. असा जर खरोखर भयंकर परिणाम या अच्छेर धान्याच्या दरापासून होत असला तर सरकारानें तो एकदम वाढवून लोकांस पोट भरेसें अन्न द्यावें आणि आमचा देश मृत्यूचे व नाशाचे दाढेंतून सोडवावा अशी त्यांस आग्रहानें आमची विनंति आहे. वैरण नसल्यामुळें हजारों गुरें मरण पावलीं, व पोटभर अन्न न मिळाल्यामुळें हजारो शेतकरी मरण पावतील तर पुढें आमचे देशाची काय वाट होईल! हर! हर! परमेश्वरा! असा प्रसंग आणूनको.

सर रिचर्ड टेंपल साहेबांनीं बंगाल इलाख्यांतील दुष्काळावर सन १८७४ साली पैरवी ठेविली होती तेव्हां असें ठरविलें होतें कीं दर मनुष्यास एक शेर निदान पाऊण शेर अन्न तरी अवश्य पाहिजे. व मजूरकाम करणारांतून कित्येकास दीड शेरही पाहिजे. तोच त्यांचा विचार सन १८७७ सालांत कसा पालटला! याचें आम्हांस मोठें नवल वाटतें. डा० कार्निश साहेबांनींही टेंपल साहेबाचीं हीं मतें सरकारापुढें व लोकांपुढें ठेविली आहेत व विलायतेस स्टेटसेक्रेटरी यांजकडेही आपला अभिप्राय पाठविला आहे. परमेश्वरानें असल्या दुर्दैवाच्या दिवसांतही असे डा. कार्निश साहेब सारखे धीराचे, निग्रहाचे व लोकांच्या जीविताची काळजी करणारे सत्पुरुष पुढें आणिले हें आम्ही दुःखांत सुख समजतो व यावरून पुढील कांहीं चांगल्या होइकाची आशा करितों.

---

# पार्लमेंटांत हिंदुस्थानचे सभासद कां नसावे?

दयाळू व न्यायी इंग्लिश सरकारचें आम्हांवर स्वामित्व आहे म्हणून ते आपल्या देशच्या प्रजेला ज्या सोयी व जे अधिकार देतात तेच त्यांनीं आम्हांस कां न द्यावे? असें वारंवार आमचे मनांत येतें. व असें मनांत येणें व वारंवार त्याविषयीं मागणें करणें या योगानेंही बराच कार्य भाग होतो असें या सरकारचे कित्येक बहिवाटीवरून दिसून येतें आणि दुनियेचा ही साधारण असा नियम दिसून येतो कीं, ज्या कोणाचे कृत्या विरुद्ध आपण गाऱ्हाणें केलें नाहीं तर त्याचें तें कृत्य आपणास आवडतें किंवा मान्य आहे असें साहजिक समजलें जातें त्याच न्यायानें प्रथमतः आपण अज्ञान म्हणून सिविलसर्व्हीस, पार्लमेंटची सभासदगिरी इत्यादि आपणास देणें अप्रयोजक म्हणून सरकारानें ते हक्क आपणास दिले नसतील, परंतु आपण त्याविषयीं वारंवार गाऱ्हाणीं करूं लागलों. योग्यता दाखवूं लागलों तर सरकार कांहींना कांहीं आपणाविषयीं तजवीज करील असें मानण्यास त्यांचे दयाळूप

णावरून व न्यायीपणावरून आधार आहे. व ह्मणूनच लोक वारंवार सरकारास मोठ्या नम्रतेनें मागणें मागतात; व किरकोळ सारकोळ गोष्टींत तशी मागणीं कबूल ही होतात पण सिव्हिलसर्व्हिस व पार्लमेंटची सभासदगिरी याविषयीं सरकार अजून आमच्याकडे कृपाळू दृष्टीनें पाहात नाहीं हें आमचें दुर्दैव आहे; तथापि आह्मास भरवसा आहे कीं आमचा चालू आहे तसाच सतत उद्योग चालू राहिला तर केव्हांतरी सरकारचे मनांत दया उपजेल व हे हक्क आह्मास प्राप्त होतील, सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेचे वयाची मर्यादा वाढवावी व ती परिक्षा हिंदुस्थानांत होत जाईल असें करावें ह्मणून नुकतीच कलकत्यास हजारो लोक मिळून जी खटपट झाली ती अत्यंत स्तुत्य होय व तिचा कांहीं तरी सुखकारक परिणाम होईल अशी उमेद आहे.

याचप्रमाणें कलकत्यास गेल्या आठवड्यांत "पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानचे मेंबर कां नसावेत" या गोष्टीचा विचार करण्याकरितां एक सभा भरली होती व तींत पुष्कळ वाटाघाट झाली आणि सरकाराकडून हा हक्क मागून घ्यावा असा बहुमतानें ठराव झाला. व कलकत्यास पोलिटिकल संबंधाच्या तीन सभा आहेत तींतून एकीस ही गोष्ट पुढें चालविण्यास विनंती करावी असाही ठराव झाला. व त्याप्रमाणें लवकरच पोलिटिकल असोसियेशन सभेकडून विलायत सरकाराकडे हें काम चालू होणार आहे. ईश्वर करो आणि या प्रयत्नास यश येवो असें आह्मी इच्छितों.

पार्लमेंट सभेंत जोंपर्यंत आमचे देशांतील मेंबर घेतले जाणार नाहींत तोंपर्यंत हिंदुस्थानचे सुख दुःखाचा व सोयी गैरसोयीचा विचार विशेष चांगल्याप्रकारें चालणार नाहीं हें खचित आहे व हमेशा पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानचा विषय निघाला ह्मणजे जागा ऐस पैस होती व लोक संख्या शतकाची दशकावर येते हें पास प्रमंतर थोडें नाहीं !

## राजधर्म.

स्वेस्वेधर्मेनिविष्टानां
सर्वेषामनुपूर्वशः
वर्णानामाश्रमाणांच
राजासृष्टोभिरक्षिता

अर्थ— जे सर्व वर्ण स्वधर्म प्रमाणें पालतात त्यांचे रक्षण करण्या साठीं देवानें राजा उत्पन्न केला.

या वरून प्रजापालन हा राजाचा मुख्य धर्म गणला आहे, पण हें वरील वचन फार पुरातन व आपल्या इकडील आहे ह्मणून तें बरोबर नाहीं व प्रजेचें पालन करावें ह्मणून सरकार कांहीं बांधलें गेलें नाहीं असें जर मानिलें तर यासही कांहीं गोष्टी बाधक होतात.

पहा या जगांत सर्व प्राणि मात्र आपापल्याच कल्याणार्थ झटणारे आढळतात; शुद्ध परोपकारार्थ झटणारे फार थोडे, आतां फक्त स्वार्था साठींच झटणारे जरी घेतले तरी त्यांचे हातून महान् परोपकाराची कार्यें घडून येतात.

उदाहरणार्थ एक शेतकरी घेतला तर तो शेताची लागवड फक्त आपल्या व कुटुंबाचे निर्वाहार्थच करितो पण त्यापासून लक्षावधि जीवांचें पोषण होतें असेंच प्रत्येक चांगल्या लोकाचि स्वहितार्थ प्रयत्नापासून इतरांस उत्तम प्रकारें लाभ होतात.

चांगला शेतकरी आपल्या शेतकीची आउतें व बैल यांची जतन केवळ जीवाप लीकडे करितो. आपली निजावयाची जागा असेल तिच्या अगदीं समिप अशी त्या गुरांस जागा करतो, त्यांस ऊन्ह थंडी लागू नये ह्मणून त्याजकरितां शक्तीप्रमाणें बनातीच्या, सतरंजीच्या व रेशमाच्या अशा झुला करितो. त्यांस धुवून व खरारा करून नेहमी स्वच्छ ठेवितो. विंचू साप त्याजवळ जाऊ नये ह्मणून त्यांचे गळ्यांत घांट बांधितो. त्यांना वैरण दाणा वगैरे खाऊ घालतो तेव्हां आपण भाकर खातो व एके वैरण किंवा पाणी मिळालें नाहीं तर तो धनी पराकाष्ठेचा दुःखी होतो व तशा वेळीं त्याचे पुढें मोठीं पक्वान्नें जरी ठेविलीं तरी तीं त्याच्यानें बैलास वैरण घातल्यावाचून खाववत नाहींत अर्थात हर प्रकारें तो त्या साठीं वैरण मिळवितो. अहाहा! ही कोणती विलक्षण ममता! जर दैववशात् रोग वगैरे होऊन असें प्रिय गुरूं मेलें तर घरांतील सर्व माणसें त्या करितां ढळढळां रडूं लागतात.

अशी विलक्षण प्रीति त्यांची गुरां ढोरांवर देखील कशानें जडतें याचें मूळ त्यास विचारिलें असतां ते ह्मणतात कीं, "ज्याचे जवळून आह्मी मेहेनत घेतों त्यास खाऊं घातल्यावाचून आह्मी कसें खावें. आमच्या उपजीविकेचे मुख्य स्तंभ ह्मटलें ह्मणजे आमचे बैलच. तेव्हां त्यांस विसरून पुढें आह्मी काय उपाशीं मरावें? कुणबी हा कशानें राजा बनला आहे! बैलांचेच जीवावर."

हें त्यांचें उत्तर ऐकून कोणास आनंद होणार नाहीं? सर्वांस झालाच पाहिजे व याचप्रमाणें प्रत्येक जण आपले सुखास व सोयीस मुख्य कारणीभूत वस्तूकडे कधींही दुर्लक्ष्य करीत नाहीं व जे करतात त्यांचा कांहीं अंशानें तरी तोटा झाल्यावाचून रहात नाहीं.

आतां सरकार हें शेतकरी धरिलें व प्रजा हीं त्यांचीं गुरें धरिलीं तर स्वार्थाकरितां तरी त्यांनां पुरेशी वैरण घालणें सरकारचे माथीं येतेंच. अगर त्यांस उपाशीं मरूं दिलें तरी शेतकीचे संबंधानें अंशतः त्यास तोटा सोसावा लागेलच. ह्मणून आतांच हिंमत धरून सरकार आपल्या प्रजाधनाचें रक्षण करील अशी आशा आहे.

## वऱ्हाड

मि० जोन्स साहेब नवीन कमिशनर १८ वे तारखेस येणार ह्मणून वर्तमान होतें व त्यावरून स्टेशनावर मंडळी त्यांना भेटावयास गेली होती परंतु त्यांचें येणें झालें नाहीं.

वाशिमचे तहाशिलदार मि० अबदुल रहमान यांस कामावरून मकूफ केलें व ते इकडे येऊन आगगाडी मार्गें हैदराबादे कडे गेले असें ह्मणतात. कारण बरोबर समजलें नाहीं.

मे० दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर २९ वे तारखेस रजेवर पुणें महाबळेश्वराकडे जाणार आहेत.

एथील हिंदुस्थानी मुलींची शाळा चांगले प्रकारें चालत नाहीं सबब तिला निमी मदत म्युनिसिप्यालिटीकडून मिळते ती बंद व्हावी असा म्युनिसिप्यालिटिकडून ठराव होऊन कमिशनर साहेबांकडे लिहून गेला. त्याच धोरणानें मराठी मुलींची शाळाही उत्तम प्रकारें चालत नाहीं सबब तिलाही मदत देण्याचें म्युनिसिप्यालिटीनें बंद करावें अशी सूचना बुधवारीं भरलेल्या जनरल कमिटींत निघाली होती पण तिजवर पुष्कळ वादविवाद होऊन अखेर ठराव झाला कीं त्या शाळेची मदत बंद करूं नये, पूर्वी[illegible]प्रमाणें चालू ठेवावी. या कमिटींत या विषयावर रा. [illegible] विनायक वकील यांनीं चांगलें भाषण करून सर्व सभासदांचे मनांत मुलींच्या शाळेची अवश्यकता चांगली ठसविली तेणेंकरून सर्वांचीं अनुकूळ मतें पडलीं याजबद्दल आह्मास संतोष वाटतो. देवराव यांचा हा प्रयत्न फार स्तुत्य होय.

दुष्काळ फंडाची सभा गेल्या गुरुवारीं भरण्याविषयीं सर्क्युलर फिरलें होतें पण ३।४ सभासदांहून अधिक गृहस्थ कोणी न आल्यामुळें सभा भरली नाहीं. मे. दस्तुर बहिमनजी साहेब यांनीं या फंडास २०१ रुपये वर्गणी देण्याचा आकडा घातला होता ते रुपये त्या फंडाचे सेक्रेटरी यांकडे त्यांनीं रोख पाठवून दिले. अजून बहुत गृहस्थाकडे त्यांनीं कबूल केलेली रकम येणें आहे; तीही ते लवकर पाठविण्याची कृपा करतील असें आह्मी इच्छितों. दुष्काळपीडितास खरोखर मदत करण्याचा प्रसंग हाच आहे.

वाशिमचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. कृष्णाजी गोविंद यांस यवतमाळास व तेथील रा. रा. परशराम गणेश यांस वाशिमास नेमणार असें वर्तमान आहे.

रा. रा. खंडेराव बाळाजी फडके यानीं अकोला म्युसिप्यालिटीच्या सेक्रटरीचें काम सुमार दोन वर्षें केलें व अलीकडे त्यांची प्रकृति दुरुस्त नाहीं व उन्हाळ्याकरितां ते बाहेर गांवीं जाणार ह्मणून वगैरे कारणानीं त्यांनीं सेक्रटरीच्या जागेचा राजिनामा दिला. तो मान्य [illegible] डिपुटी कमिशनर साहेब [illegible] मे० दस्तुर बहिमनजी सा[illegible]डेंट यांनीं त्यांच्या का[illegible]ची वाखाणणी करून [illegible]निले व तो लेख कमिटी[illegible]न ठेवावा असा ठराव केल[illegible] कामावर रा. रा. कृष्णरा[illegible] यांची नेमणूक केली. हे [illegible] व मेहनती आहेत सबब या[illegible]कार उत्तम प्रकारें चालेल [illegible]वसा आहे.

मि० म्याकिंटाश साहेब यांनीं एथील उर्दु अकबाराचे मालकावर अब्रू घेतल्याची फिर्याद लाविली आहे हें आमचे वाचकांस माहित आहेच. तिच्या चौकशीची तारीख या महिन्याची १८ वी नेमिली होती पण प्रतिपक्षानीं आपणास अधिक वेळ मिळावा असा अर्ज केल्यावरून मे महिन्याचे ७ वे तारखेस तो मुकदमा चालविण्याचा नेम झाला आहे. इतक्यांतच गेल्या बुधवारीं उमरावतीस तेथील प्रमोदसिंधूचे कर्त्याविरुद्ध फिर्याद झाली व शुक्रवारीं तिची थोडी चौकशी होऊन तारीख ३ माहे मे पर्यंत पुढील चौकशी मुकूर ठेविली आहे. याच बाबतींत ठाण्याचे अरुणोदय कर्त्यांशी साहेबांचा पत्रव्यवहार सुरू आहे. व ठाण्यास जाऊन त्यांवर ही फिर्याद चालवावी असा त्यांचा बेत आहे.

## वर्तमानसार

तुर्कस्थान—रशिया सरकारच्या खलित्यावर युरोपोतील इतर सरकारांनी केल्या त्यावरून तुर्क सरकारा[illegible]टलें. त्यांतील शर्ती [illegible] वाईट [illegible] नाहीं याविषयीं [illegible] त्या किंवा न[illegible]णीं वि[illegible] ता० ७ व ८ [illegible] ला परत नेण्याविषयीं [illegible] नाहीं सल्ला करण्याविषयी जी [illegible] देत त्यावरून सभेतील लोक फार दिलगीर झाले. याविषयी ता० १३च्या आंत काय तें उत्तर द्यावें ह्मणून रशियन सरकारानें आपल्या वकिलाकडून तुर्क सरकारास सांगितलें. तुर्क सरकार रशियाचे ह्मणणें कबूल करण्यास मान्य नाहीं, आणि परक्यांनीं आमच्या घरगुती कारभारांत हात घालणें अगदीं गैर आहे असें ह्मणतें. सर्व सरकारच्या वकिलांनीं त्यास सांगितलें कीं, तुह्मी सेंटपिटर्सबर्ग एथें वकील पाठवून तहाचें बोलणें करा. तुर्की प्रतिनिधींच्या सभेनें मांतिनिग्रोच्या सरकाराच्या ह्मणण्याचाहि धिक्कार केला यावरून रशिया व तुर्की या उभयतांची लढाई झाल्याशिवाय राहणार नाहीं असें ह्मणतात. तुर्क सरकार ह्मणतें कीं आह्मी रशियाकडे वकील पाठवूं पण त्यांनीं आपली फौज परत नेली तरच आह्मीहि आपली नेऊं.

रशियांतील एका वर्तमानपत्रांत असें छापलें आहे कीं, जर तुर्की व मांतिनिग्रो यांची पुनः लढाई लागली तर रशियन सैन्य एकदम तुर्कस्थानावर चालून जाईल. रशियाच्या खलित्यांतील मतलब येणेंप्रमाणें;—तुर्की प्रकरणांत सर्व सरकारांचें एक मत असावें; तुर्कीनें लढाईची तयारी केली ती मोडून आपली फौज हमेशाच्या प्रमाणें ठेवावी; राज्यकारभाराची सुधारणा करण्याचें जें वचन दिलें तें लौकर पुरें करावें; ह्या सुधारणा योग्य रीतीनें केल्या जातात कीं नाहीं हें इतर सरकारांचे जे वकील कामस्ता तिनोपल एथें आहेत ते पाहतील, आणि जर याविषयीं त्या वकिलांची निराशा झाली तर मग तुर्की राज्यांतील खिस्ती लोकांची स्थिति चांगली व्हावी ह्मणून काय तजवीज करावी याचा विचार सर्व सरकारें करतील. ज्ञा. द.

मुंबई इलाख्यांत रिलिफ कामाकडे हल्लीं २०४९९३ मनुष्यें आहेत. यांत नगर जिल्ह्यांत दौंडापासून नगरापर्यंत रेल्वेचें काम सुरू केलें आहे त्याकडे १७५०० मनुष्यें आहेत असें कळतें.

मुंबईस लिटलगोची परीक्षा ९ वे तारखेस सुरू झाली.

त्रावणकोरचे दिवाण शेषय्या शास्त्री लवकरच राजीनामा देणार आहेत.

बी. ए. व लिटलगो अशा मोठ्या परीक्षेत पसार झालेले मुसलमान जातीचे ४ गृहस्थ विलायतेत विद्याभ्यासाकरितां जाणार त्यांपैकीं एकजण या आठवड्याचे आगबोटींतून गेले बाकी तीन आसामी लवकरच जाणार आहेत.

सुरत येथील सरकारी तिजोरींतील क्याशियर बापुभाई हे १०,००० रु. घेऊन पळून गेले.

गेल्या महिन्याच्या १३वे तारखेस कराची नजीक केटी ह्मणून गांव आहे तेथें तुफान झालें. त्यावेळेस १५ सपाट तळा… होड्या उपड्या झाल्या या पंधरा हो…कीं १० होड्यांत माल भरलेला हो… ५ रिकाम्या होत्या. सुमारे ७… …ले व …नीच्या मालाचें नुकसान झालें.

…ज्या … ४,२९७ … नवीन तारे शोधू… साली …यांपैकीं तीरी हे गृहस्थ … …राहतात हेनरी पारीस येथें रा…तात व पिटरस व वाटसन हे अमेरिकेंत.

मानारच्या खाडींत जीं मोत्यें मिळतात तीं सिलोन बेटचे सरकार दर हजारास ३५ पासून ४० रुपयेपर्यंत विकतें. आजपर्यंत या सरकारास मोत्याच्या शिंपांपासून ६१५०० रुपये मिळाले.

मध्यप्रांताचे चीफ कमिशनर यांणीं दोघा नेटिव डाक्टरांस सिव्हिलसर्जनच्या जाग्यांवर नेमिलें बाबू जदुनाथ घोस यांस सिवनी एथील सिव्हिलसर्जन व दुसऱ्या एका असिस्टंट सर्जनास भंडारा एथें सिव्हिल सर्जन नेमिलें. सु. प.

---

## विशेष गोष्टी.

सन इसवी.

४२८ शेवटचा हिंदु राजा पृथु ऊर्फ पिठोरा दिल्लीस झाला.

५६९ मुसलमानी धर्मप्रवर्तक महमद जन्मला.

६३२ महमद मरण पावला.

७११ मुसलमानानीं सिंध देश घेतला

१००१ सुलतान महमूद याची हिंदुस्थानावर पहिली स्वारी

१०२४ सुलतान महमूदची बारावी स्वारी सोर्टी सोमनाथाची लूट.

१०५३ रामानुज पंथ निघाला

११४८ कबीर साधू जन्मला

११७८ भास्कराच्यार्य जन्मले

११९२ दिल्लीस बादशाही राज्य स्थापन झालें.

१२०३ दौलताबाद किल्ला धनगर जातीचा विजापुर परगण्यांतील मोळवाडचा रामराजा याणें बांधिला

१२६८ निवृत्तिनाथ साधू जन्मला

१२७० नामदेव साधु जन्मला

१२७१ ज्ञानदेव साधू जन्मला

१२७४ सोपान साधू जन्मला

१२७७ मुक्ताबाई जन्मली

१२९६ ज्ञानदेव अळंदीस समाधिस्थ झाले

१२९७ सोपानदेव सासवडास समा. झाले

१२९८ निवृत्तिनाथ त्रिंबकेश्वरीं „ झाले

१३२५ चांगदेव बरणगावाजवळ„ झाले

१३९६ दुर्गादेवीचा दुष्काळ सुरू झाला १२ वर्षे होता.

१४३४ छापण्याची युक्ती निघाली.

१४६८ अहमद नगरचा किल्ला निजाम शहा बहिरी याणें बांधिला

१४६९ नानकशाही मत स्थापन झालें.

१४७८ सोलापुरचा किल्ला खाजे जहान याणें बांधिला

१४८१ बेळगावचा किल्ला असदखान लहरी याणें बांधिला

१४८२ परंडा किल्ला खाजे जहानानें बां.

१४८४ फत्ते अल्ली वऱ्हाडचा मांडलिक राजा होता

१५०४ अल्ला उद्दीन …चा मांडलि…जा होता

…०८ दाभोळ फिरंग्यांनीं लुटली

१५१० पोर्टुगीस लोकांनीं गोवें घेतलें

१५१६ सिकंदर बादशहा आग्रा एथें मृत्यु पावला. विद्वानांचा अभिमानी व कवि होता.

१५३० मुंबई मुसलमानाकडून फिरंग्यास मिळाली

१५३० वल्लभाच्यार्य समाधिस्थ झाले.

१५४० पारशी लोक प्रथम मुंबईस आले

१५४२ अकबर बादशहा जन्मला.

१५६० बुऱ्हाण हा वऱ्हाडचा मांडलिक राजा होता.

१५७८ जगन्नाथराय पंडित हयात होते.

१५८८ तुकाराम बुवा जन्मले.

१५९१ इंग्रजांची हिंदुस्थानांत पहिली सफर.

१५९९ इंग्रज लोक हिंदुस्थानांत प्रथम आले.

१६०० ईस्ट इंडिया कंपनीला हिंदुस्थानच्या राज्याची सनद मिळाली.

१६०५ अकबर मरण पावला. ५० वर्षें राज्य केलें. वय ६३ वर्षांचें.

१६०८ रामदास स्वामीचा जन्म.

१६०९ मुक्तेश्वर कवी जन्मला.

१६२४ एकनाथ स्वामी समाधिस्थ झाले.

१६२७ शिवाजी राजा जन्मला.

१६४९ तुकाराम बुवा वैकुंठास गेले.

१६५७ वामन स्वामी समाधिस्थ झाले.

१६६४ मुंबईस इंग्रजी अंमल बसला.

१६६८ फिरंग्याकडून चार्लस राजास मुंबई आंदण मिळालेली त्यांनीं कंपनीस दिली.

१६८० शिवाजी राजा मरण पावला.

१६८१ रामदास स्वामी मरण पावले.

१६८४ रंगनाथस्वामी समाधिस्थ झाले.

१६९५ अहिल्याबाई होळकरीण मरण पा.

१७०० औरंगजेब मरण पावला.

१७०२ तुळशीदाससाधू कैलासवासी झाले

१७१० पेशवाई झाली.

१७२८ श्रीधरस्वामी मरण पावले.

१७२९ मोरोपंत कवी जन्मले.

१७३६ पुण्यांतील शनिवारचा वाडा व कात्रजचा नळ बांधिला

१७४१ नाना फडणीस सातारयास जन्मले

१७५३ अमृतराव कवी मरण पावले.

१७६१ पानपतची लढाई

१७६२ राम जोशी जन्मले.

१७८० कलकत्यास पहिलें इंग्लिश वर्तमानपत्र निघालें.

१७९४ मोरोपंत कवी मरण पावले.

१७९५ खरड्याची लढाई.

१७९९ टिपू सुलतानाचा मृत्यू. व श्रीरंगपट्टण इंग्लिशांच्या हस्तगत.

१८०० नाना फडणवीस मरण पावले.

१८०३ आसईगावाजवळ वऱ्हाडच्या राजाची व शिंद्याची लढाई.

१८०३ पुण्यांतील शुक्रवारचा वाडा बां०

१८०७ पुण्यांतील विश्रामबागचा वाडा बां.

१८०९ „ बुधवारचा वाडा बांधिला.

१८१२ रामजोशी सोलापुरकर मृत्यू पावले.

१८१७ पुण्यास बारा दिवस लढाया हो…न बाजीरावापासून इंग्रजांनीं पुणें घेतलें ता. १६ नोवेंबर.

„१८ पेशव्यांचें राज्य इंग्रजांनीं घेतलें. व बाजीरावास ब्रह्मवर्तास पाठविलें

„१९ विक्टोरिया चक्रवर्तिनी जन्मली.

„२१ मुंबई व पुणें एथें शाळा स्थापल्या

„२३ कलकत्यास आगबोट प्रथम चालू

„२७ पुण्यांतील शनिवारचा वाडा जळाला.

१८२९ सती जाण्याची मनाई झाली

„ ३५ वर्तमानपत्रें छापण्याची मोकळीक मिळाली.

„ ४५ राजा चंदूलाल मरण पावला.

„ ४८ हिंदुस्थानांत तारायंत्र चालू झालें

„ ४९ सातारचें राज्य घेतलें.

„ ५० जी आय पी रेलवेची सुरुवात.

„ ५३ वऱ्हाडांत इंग्रजी अंमल झाला.

„ ५४ नागपुरांत इंग्रजी अंमल झाला.

१८५७ हिंदुस्थानांत मोठें बंड झालें.

„ „ कलकत्यास ग्यासाचे दिवे प्रथम लागले.

„ „ निजाम अफजुल उदवला हैदराबादेस गादीवर बसले.

१८५८ राणी सरकारचा जाहिरनामा कंपनी पासून राज्य परत घेतल्या बद्दल.

१८६९ ड्यूक आफ एडिंबरो हिंदुस्थानांत आले.

१८७० खंडेराव गायकवाड मरण पावले.

१८७१ मल्हारराव त्यांच्या गादीवर बसले. (पुढें चालू)

---

## जाहिरात

## सटीक पुराव्याचा अक्ट

सन १८७२ चा १ ला [ पुराव्याचा अक्ट ] हा अमलांत येऊन बरींच वर्षें झालीं परंतु त्याचें मराठी भाषांतर व्हावें तसें खुलासेवार झालेलें नाहीं ह्यामुळें त्यांतील विषय समजण्यास अडचण पडते. इंग्रजींत ह्या विषयावर पुष्कळ ग्रंथ आहेत. व हा अक्ट सुरू झाल्यावर त्यावर पुष्कळ टीकेचे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत त्यांचा उपयोग इंग्रजी जाणणारास मात्र होतो. केवळ मराठी जाणणारास त्याचा मुळींच उपयोग होत नाहीं यास्तव कांहीं मित्र मंडळीचे सूचनेवरून या संबंधानें आपण कांहीं यत्न करावा असे माझ्या मनांत आल्यावरून मद्रासचे आडव्होकेट जनरल हेनरी स्टुअर्ट कनिंघम एम. ए. बारिष्टर यांनीं या अक्टावर केलेल्या टीपेच्या पुस्तकाचें भाषांतर करण्याविषयीं त्यांची परवानगी मागितली व मेहेरबानी करून ती दिल्यावरून त्यांचे टीकेच्या पुस्तकाचे मराठी भाषांतर करून "पुणें ज्ञानप्रकाश" छापखान्यांत तें खिळे छापावर छापण्याचें काम चालू आहे. भाषांतर होईल तितकें सुबोध केलें आहे. या पुस्तकांत विषय आहेत तेः—

१ उपोद्घात प्रथम दिला आहे तो अजमासे ७५ पृष्ठें होईल तो वांचला असतां ह्या आक्तांतील विषय समजण्यास फार सुलभ पडणार आहे.

२ सन १८७२ च्या पहिल्या आक्ताचे सरकारी मराठी भाषांतर जसें आहे तसेंच ठेऊन कलमा खालीं समजुतीच्या टीपा दिल्या आहेत त्यावरून कलमाचा संशय बहुतकरून रहाणार नाहीं.

३ सन १८७२ चा १८ वा आक्त पुराव्या विषयीं आक्त सुधारण्याविषयीं झाला आहे त्याचे कलमांतील ठराव ज्या त्या कलमांत सामील केले आहेत.

४ सन १८५३चा आक्त कलम २६

५ विक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या १९।२० वर्षांचा चापटर ११३, २२ वे वर्षाचा चापटर २०, २२।२३ वर्षांचा चापटर ६३, २४ वे वर्षाचा चापटर ११ व ३१।३२ वर्षाचा चापटर ३७.

हें पुस्तक आजमासे आष्टपत्री साच्याचे ४०० पृष्टांवर होईल. दिवाणी, फौजदारी, मुलकी वगैरे सर्व कामांत पुराव्याची जरूर लागते व तो विषय चांगला अवगत असण्याची मुनसफ, माजिस्त्रट वगैरे व कील व मुखत्यार यांस फार जरूरी आहे त्याचा अनुभव त्यांस आहेच. केवळ मराठी जाणणारास तसें साधन नाहीं असें पाहून हा ग्रंथ तयार केला आहे. मूळ इंग्रजी प्रतीची किंमत ८ रुपये आहे. मुळापेक्षां भाषांतर मोठें होतें हें सर्वांस विदितच आहे तरी लोकांस घेण्यास सोयीवार पडावें ह्मणून ह्याची किंमत ठेविली आहे तीः—

मे सन १८७७ अखेरपर्यंत भरणारास ४ रु.

जुलै „ „ ५ रु.

जुलै सन १८७७ अखेरपर्यंत पुस्तक घेऊं अशी सही देणारास ६ रु.

पुस्तक तयार झाल्यावर घेणारास ७ रु.

अगाऊ किंमत भरणारास टपालखर्च बसणार नाहीं बाकीच्या लोकांस टपालखर्चं दर प्रतीस ८।० आणे पडेल ज्यास अगाऊ पैसा भरणें असेल त्यांनीं पुणें ज्ञानप्रकाश छापखान्याचे म्यानेजर यांजकडे भरावा. येत्या नोवेंबर महिन्यांत पुस्तकें तयार होतील. वऱ्हाडसमाचार छापखान्यांत ही पैसा भरल्यास हरकत नाहीं. कोल्हापुर-ता. १ मार्च सन १८७७ इसवी.

वामन गोविंद रानडे
वकील पुणें व कोल्हापुर

---

हे पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकोला, रविवार ता[०] [२]९ एप्रिल सन १८७७ इ० अंक १७


याक्षटांत १ एप्रि- सा ठराव णेः— प्राव्हिन्स रहिमा स्टेबला

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकाकडून आगाऊ वर्गणी पावी म्हणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

### विविधज्ञानविस्तार.

मासिकपुस्तक.

[कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.]

शास्त्रीयविषय, आरोग्यविषय, भाषासुधारणा, मनोरंजन, पुस्तकपरीक्षा, सुंदर ग्रंथांची भाषांतरें, इतिहास, विख्यात पुरुषांची चरित्रें, कविता इत्यादि विषयांचा समावेश करणारें या प्रकारचें, सर्व महाराष्ट्र देशामध्यें हें एकच पुस्तक आहे.

किंमत.

| | रु. आ. |
|---|---|
| वर्षाची आगाऊ ............ | ३—० |
| मागाहून. ........ | ४—८ |
| सहामाही आगाऊ. | २—० |
| किरकोळ अंकास | ०—६ |
| टपाहांशील वर्षाचे. | ०—६ |

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत व्यवस्थापक यांच्या नांवें वर्षाची अगाऊ वर्गणी (रु. ३ आ. ६) सुद्धां पत्र पाठविल्यास पुस्तक चालू होईल.

व्यवस्थापक, विविधज्ञानविस्तार.

मराठ्यांच्या इतिहासाला साधनीभूत अशा आमचे लोकांनीं लिहिलेल्या मराठे व मुसलमान यांच्या राज्याविषयीं जुन्या बखरी छापून प्रसिद्ध करण्याचा आजपर्यंत कोणी यत्न केला नव्हता, त्या आमचे पुस्तकांतून प्रसिद्ध व्हावयास आरंभ झाला आहे; हें पाहून राजेरजवाडे व संस्थानिक याकडे लक्ष देतील अशी उमेद आहे.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मेहेरबान वऱ्हाड अखबारके मालक

अदाब बंदगी मारुजा के आब जाज खिरयत तो हाय ना ? क्यौं हाम लोंगो के गुफ्त गो बाते सुने हायत दोस्त है, करके आबकी [illegible] अछी रहना उसमे हाम बी खुशी हाव.

मै फिरते फिरते राजा के देऊळगाव यां आने के पोहोंच्या और या एक महजतमे रहके सब गावेके अकबार मिलेतलक मिलाता हू के आबके सामने धरने की उमेद आयी सो पुरी करना आबके मेहेरबानी के सांथ है.

यहा दो पहरकू आफताफ मायेपर आया के धूप बडी तडपती है, और थरमामेटरमे पारा ब्यानव अौंस परचढता है. बादलबी बाजे बाजे आताथा लेकिन ये चार रोजमे अच्छा है.

---

इदर ममई सोलापुर माफक काल पडा नही है, लेकीन पानीका बडा तोटा है अनाजका भाव बुरा नहि और अच्छा नहि.

यहा बालाजीका सदाबर्त है और अनछत्र बी है लेकिन यह गाववाले लोक उदरके माफक या ममई सोलापुर पुनेके माफक किसीकू मदत करनेवाले नही है. सब बालाजीकी रवणूक ये गावकू है.

दो च्यार रोज हुये यहगावमे एक फकीर आया है वो घास, कडबीकी पुली, और केलीके पत्ते बहोत खाता है. लोग कहते ये जादुगीर है, दुसरे कुइ नजरबंद कहते है कुइ बोलते साचा है, फिर क्या होयगा सो खुदाकू मालूम.

"कुरानके बैंगन कुरानमे" इस माफक यहां के हिंदु पुरानिक दो च्यार इसम है ये सब उमरमे बीस बीस बरसके है ये दिनकू बालाजीके पास भारत पढते है और रातकू लौंडेके पिछे खडे रहके नाच करते है और उसकू साथ लेके जत्राकू जाते है. ये भी एक नीतीका रस्ता लोगोंकू बताते और फिरभी पुरानमे बोलते है कीं, खुदा मिलेसो बाता करो. लेकिन लोग ये सुनके उनके माफक कुइभी करते नहि. इस्से वो बडे नाराज है. अकबारवाले महाराज, हमतो पडे रमते राम, हमकू निंदासे क्या काम है, हम फकत उनके भलाईके वास्ते कहते है. खत लिखना अबी पुरा करते है क्यौंके लिखागया इत्ता बस है. और मुलाखतबी हो जायगी. मेहेरबानी रखना.

देऊळगाव राजा ता. १७।४।७७ } फिरनेवाला रमताराम

---

वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख वद्य २ शके १७९९

## SIR R. TEMPLE Vrs. FAMINE STICKEN PEOPLE.

The publication of weekly reports of famine operation in the Presidencies of Bombay and Madras encouraged us in our hopes of satisfactory arrangements, being made to cope with the present distress which is more raging most fearfully over a large portion of this Country and the like of which is not known for years past.

Indeed great was our consternation and deep was the sorrow when we read Dr. Cornish's letter. Before we proceed to discuss it we frankly admit the disinterested motive which actuated our Baronet in undertaking a work of no ordinary magnitude and one in the due discharge of which it is not possible for any one to please every body.

We are convinced that there can be no two opinions as to the untiring industry and unparallelld zeal with which Sir R. Temple honestly and sincerely endeavours to discharge the duties entrusted to him by the Viceroy & Governor General of India.

We are compelled to believe that Sir R. Temple has grievously erred in reducing the wages of persons employed on the Famine Relif Works, for a lb of rice is as Sir Rechard himself ought to know not at all sufficient to keep up life and soul together & Dr. Cornish plainly says that this reduction in the wages has not only increasd the death and decreased the birth rates but has reduced a large section of the working classes to nothing more than mere skeletons.

We are at a loss to know what could have induced our famine delegate to reduced the wages, in spite of the repeated advices of our present Rulers, who very generously insisted upon the Boronet to adopt all feasible measures to save the lives of men.

To suppose that Sir R. Temple is either mistaken in his views or misled by his assistants would be paying a poor compliment to his tried abilities and ripe experiecne for no one can for a moment doubt that he is mistaken as this is not the first time he is engaged in famine work, and it is too much to say that he might be misled, for he is not a young competition wallah.

Dr. Cornish mentions one fact in refutation of the arguments of Sir R. Temple's "reduction policy" which requires a very great deliberation. Dr. Cornish says that the reduction of wages has pulled down the ryots considerably so much so that the frame work of their constitution is shatterd to such an extent as almost to incapacitate them for hard work in the fields.

If this is true we need hardly remind Sir Richard that his line of policy will end in "a penny wise and pound foolish," for any one can easily conceive the enormous loss which the state will sustain if the fields are left uncultivated.

Dr. Cornish bases his observations on personal experience, and therefore Sir Richard Temple will in our opinion do well to take a more patient survey of all the camps than he evidently appears to do at present and alter his "Policy" so as at least save the lives of people.

We are not surprised at the discontent which prevails in the Famine Districts as the reduction of wages actually worked greater mischief than famine itself conld be expected to do.

It is much to be regretted that the charitable public of India and England should have displayed an unparallelled coldness, by preserving perfect silence, at a time when their liberal assistance could go a great way to mitigate the present sufferrings of thousands of their brethren.

When a similar, but far less severe calamity occurred in the North of Bengal the whole India and England came forward determined to save the lives of their fellow-men and is it just and proper on their part may we venture to ask to make their cold indifference at a most critical hour on the condition of thousands of men who are struggling to preserve their lives which certainly has been found to be difficult of accomplishment under the famine and imperishable "Reduction policy" of Sir Richard Temple Boronet K. C. S. I.

We deem it superfluos to enter into details as our esteemed contemporary in Bombay The Times of India in his daily issues discusses the question in all its bearings, with that candour and courage which befits an exponent of Public opinion.

We sincerely hope His Lordship the Viceroy will take the matter into his kind and benevolent consideration and issue such orders as would overthrow the "Reduction Policy" at least in places where it has done the greatest mischief imaginable.

## DR. BIRDWOOD AND THE NATIVE PRESS.

It is with amusment, though not without surprise we read a review of Dr. Birdwood's lectnre

on 'native press" in the Pallmall Gazette.

The ignorance displayed by the reviewer on Indian matters is a subject upon which we propose to discuss in a future issue as space dose not permit of our doing so at present, but in the mean time we would advise the author to look into the Reports of our Directors of Public Instruction in this country and see whether he cannot find to his disappointment Indian Histry in the carriculum of studies and whether the progress made by them in that subject is sufficient to enlighten him on the lives of men, like Hyder Ali or to furnish him with the Detailed information about the Pindari War.

We would also ask the writer whether the B. As. and M. As. of oxford and Cambridge do not seek the much coveted and honorable post of an Editor when they fail to secure a place under Government.

## लढायीची सुरवात.

दोन वर्षें ज्या गोष्टीची धडाधाट मोठ्या निकरानें चालली होती व जिजकडे साऱ्या पृथ्वीचें लक्ष्य लागलें होतें ती रशिया आणि तुर्कस्थान यांची लढायी आतां खास होण्याचा निश्चय झाला, असें विलायतेकडील आलेल्या तारांवरून समजतें. रशियाचा बादशहा झार यानें किसचेनेक एथें जाऊन आपली फौज पाहिली व तुर्कस्थानावर ती पाठविण्याचें ठरवून लढायीविषयींचा आपला निश्चय बोलून दाखविला. त्या प्रसंगीं बादशहानें भाषण केलें व लढाई सुरू होण्याचे जाहिरनामे लागले.

आतां ही लढायी दोन राष्ट्रांचीच प्रथमतः दिसते पण तेवढ्यावरच विजेल व बाकी राष्ट्रें तींत शिरणार नाहींत असें वटत नाहीं. मग काय होईल पहावें. आमचे इंग्लिश सरकारास हिंदुस्थानांत येण्यास तुर्कस्थान हें द्वार आहे. व तेथील सुलतानाचा आज बहुत वर्षे आमचे सरकार लोभसंपादन करीत आले आहेत तेव्हां ते या प्रसंगीं कसे वागतात हें पाहिलें पाहिजे. दुसरें सर्व मोठमोठाल्या राष्ट्रांचे विच्यार होऊन त्यांनीं तुर्कस्थानास आपले राज्याची सुधारणा करण्याविषयीं व ख्रिस्ती प्रजेस न गांजण्याविषयीं सांगितलें असतां त्यानें तें न ऐकल्यामुळें रशियानें त्यावर शस्त्र उचललें आहे तेव्हां सुधारणा व ख्रिस्ती धर्मी लोकांचें संरक्षण या दोन गोष्टींचे संबधानें पाहिलें असतां तुर्कस्थानानें सर्वच मोठाल्या राष्ट्रांची गोष्ट ऐकली नाहीं असें दिसतें. आणि तें खरें असेल तर ही लढायी सुरू करण्यांत रशियाचा अधिकप्रसंग आहे किंवा तुर्कस्थानाची आगळीक आहे तें स्पष्ट दिसून येतें; म्हणून ही लढाई कशी काय माजेल याजविषयीं आजच कांहीं सांगवत नाहीं. तथापि मुळींच लढायी न होतां सर्व आपसांत मिटामीट होईल असें जें थोडे दिवसांपूर्वीं वाटलें होतें तसें घडून आलें नाहीं व लढायीचा निश्चय झालाच, तेव्हां ही [illegible] गोष्ट आहे व हिच्या परिणामावर [illegible] सुख दुःख अवलंबून आहे हें उघड आ[illegible]

अशा मोठाल्या लढाया उत्पन्न होणें व त्यांपासून रक्तपात व दुःख यांचा कहर उडणें हें चांगलें आहे असें कोणीही म्हणणार नाहीं तथापि "अहिंसा: परमो धर्मः" या वाक्यावर अवलंबून राहून कोणीही राजा कधीही लढाईची वार्ता देखील काढणार नाहीं असें म्हणेल तर तशानेंही परिणाम लागणार नाहीं. राष्ट्रांत दुःख व रक्तपात न होऊं द्यावे या विषयीं जपणें राजास जसें अवश्य आहे तसें दुसरे राजाकडून आपणावर चढ न होऊं देणें व प्रजेला पीडा व जुलूम न होऊं देणें यांकडे लक्ष्य ठेवणें हेंही राजधर्माचें एक मुख्य लक्षण आहे. त्यावरून लढाई न होणें जसें चांगलें आहे तसें प्रसंग विशेषीं लढायी होणेंही अवश्य आहे. आतां तिचा परिणाम चांगला व्हावा व नीतिवंतास जय यावा आणि अन्याय करणारांचें पारिपत्य व्हावें याविषयीं इच्छा धरणें इतकेंच आपलें काम आहे. व तें शेवटास नेणें परमेश्वराचे कृपेवर आहे.

## हिंदुस्थान संबंधी शोध व निबंधास बक्षिस.

एक दोन वर्षांनीं युरोपखंडामध्यें इकडील म्हणजे पूर्वदेशीय ज्ञानाच्या शोधाच्या संबधानें सभा भरत असतात व तिकडील विद्वान लोक हिंदुस्थानची पूर्वपीठिका समजावी म्हणून मनापासून खटपट करीत असतात हें एक दोन सभांच्या झालेल्या हकीकतीवरून सर्वांस विदितच आहे. व एक वर्ष इकडून रा. रा. शंकर पांडुरंग पंडित हे त्या सभेकरितां गेले होते हेंही सर्वांस माहित असेलच. ही सभा एक वर्ष लंडनास भरली होती, एक वर्ष रशिया देशांत सेंटपिटर्सबुर्ग एथें भरली होती; व आतां पुढील वर्षीं म्हणजे सन १८७८ च्या सेप्टेंबर महिन्यांत ही इटाली देशांतील फ्लोरेन्स शहरीं भरणार आहे. हिजमध्यें साऱ्या राष्ट्रांतील निवडक विद्वान लोकांचा समाज जमेल. या वर्षीं या सभेनें एक उत्तम निबंध लिहिण्याची कांपिटिटिव परीक्षा मांडिली आहे. त्या निबंधाचा विषय "हिंदुस्थानांतील आर्य लोकांच्या सुधारणुकेच्या अदलाबदली" हा आहे. हा निबंध इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, लाटिन व इटालियन या पांच भाषांपैकीं कोणत्याही भाषेंत लिहिण्यास मोकळीक आहे. आर्य लोक पंजाबांत येऊन उतरले त्याच्या पूर्वींपासूनची त्यांची हकीकत त्यांत असावी, अशी निबंध लिहिणारास सूचना आहे. ज्याचा निबंध उत्तम ठरेल त्यास ५००० फ्रांक अथवा २५०० रुपये बक्षिस दिले जातील अशी जाहिरात लागली आहे. व पाहिजे त्या देशांतील लोकांनां निबंध लिहिण्याची मोकळीक आहे. हिंदुस्थानांतून या सभेकरितां जे माहितगार गृहस्थ बोलावण्यासाठीं निवडले आहेत त्यांचीं नावें:—

[illegible] म्याक्षिटांत [illegible] तारीख १ एप्रि[illegible] असा ठराव [illegible]णे:— [illegible] रहि[illegible] स्टे[illegible]

[illegible] बुलेहर सा., किलहार्न सा., व लिटनर सा., राजेंद्रलाल मित्र, व ग्रिफिथ साहेब.

[illegible]च्या जनरल कमिटींत साऱ्य[illegible] मिळून ७८ मेंबर आहेत त्यांत इटाली देशचे १२ व हिंदुस्थानांतील वर लिहिलेले ७ मेंबर आहेत. आम्ही इच्छितों कीं आमचे हिंदुस्थानांतून कांहीं नवीन विद्वान गृहस्थ सदहू विषयावर उत्तम निबंध लिहून पाठवितील व त्यां पैकीं एकादा पसंत ठरून तो लिहिणाराचें नाव त्या सभेंत व साऱ्या पृथ्वींत विख्यात होईल.

## आह्मावरील मुकद्दम्याचा परिणाम.

मि० म्याकिंटाश यांच्या आह्मावरील मुकद्दम्यांत आह्मी १५०० रुपये देऊन तोडजोड केली असें ऐकतों म्हणून आमचे बंधू उर्दूअकबारकर्ते यांनीं [illegible] लिहिलें आहे, त्यावरून [illegible] व मुकद्दमा झाल्याचे बाहेर गांवीं समजल्यावरून तेव्हांपासून आमच्या पुष्कळ स्नेह्यांकडून या बाबदींत खरें वर्तमान कसें काय आहे हें कळावें म्हणून आह्मास लिहून आलें त्यावरून आह्मी मुकद्दम्याचा कंटाळवाणा पाल्हाळ आतां न लिहितां थोडक्यांत इतकेंच कळवितों कीं, तोडजोड झाली. व ती नुसत्या माफीवर झाली नाहीं. फिर्याद झाल्यावर आह्मी आपल्या पत्रांतील लेखाचा विच्यार करून पाहतां आह्मांस असें दिसून आलें कीं तो लेख म्याकिंटाश साहेबांरील मुकद्दम्याचा फैसल होण्यापूर्वींचा म्हणजे सब ज्युडिसी असतां त्या संबधांत टीका केलेली आहे ती करणें बरोबर नव्हतें सबब तोडीचें बोलणें मुकद्दमा कोर्टांत चालल्यापूर्वींच आह्मी सुरू केलें व तेव्हां नुसती माफी मागण्यावर राजीनामा व्हावा असा घाट होता. नंतर म्याकिंटाश सा. यांस या मुकद्दम्याप्रीत्यर्थ ३०० रुपये खर्च आला आहे तो दिल्याशिवाय तोड होणार नाहीं असा फूट निघाला. शेवटीं मुकद्दम्याची एकदिवस चौकशी झाली त्या वेळचें तिचें स्वरूप, तिजवरून आमचे मनावर झालेला ग्रह, अमानी मुलखांत आमचें रहाणें, ज्यांची आह्मांवर फिर्याद ते युरोपियन व सामनेवाले आह्मी नेटिव, बातमीदाराच्या पत्रांतील लेखाविषयींचा आमचा डळमळीत भरवसा, पुरावे मिळण्यास अवकाश, व चौकशीची त्वरा या सर्व गोष्टींवरून व कित्येक थोर आणि अनुभविक मित्रांचे बुद्धिवादावरून आह्मांस असें वाटलें कीं हरतजविजीनें अपसांत तोड करणेंच या प्रसंगास उक्त आहे. म्हणून आह्मी ३०० रुपये देऊन तोड करण्यास कबूल झालों. तेव्हां म्याकिंटाश साहेबांनीं सांगितलें कीं, झाले गोष्टीचे परिणामांत माझी नोकरी जाऊन मला बिलायतेस जावें लागेल व मजजवळ पैसा नाहीं सबब पुष्कळ रुपये दिले पाहिजेत. यावरून चार भले गृहस्थांचे विद्यमानें आह्मी उमरावतीस जाऊन १२०० रुपये रोख देऊन तोडजोड करून आलों. पण पुढें ५।४ दिवसांनीं आह्मांस असें समजाविलें गेलें कीं ती तोड साहेबांस कबूल नाहीं, आणखी ५०० रु. पाहिजेत. तेव्हां झाल्या तोडजोडीबद्दलचें पत्र आह्मी साहेबांपासून घेतलें नव्हतें म्हणून निरुपाय होऊन वाटाघाट करून आणखी ३०० रु. देऊन अखेरची तोडजोड केली व तिजवरून कोर्टांत राजीनामा झाला. व न्यायाधिशांनीं आह्मांस दोषमुक्त म्हणून सांगितलें.

याप्रमाणें आह्मावरील मुकद्दम्याची व त्याच्या तोडजोडीची हकीकत आहे. बातमीदाराचें नाव कळविण्याविषयीं आरंभापासून शेवटपर्यंत आह्मांस आग्रह झाला होता परंतु आह्मी निश्चयपूर्वक एकच सांगितलें कीं "नाव कळवीत नाहीं." नाव कळवितों तर आह्मावर फिर्याद झाली नसती व एक पैसाही आह्मांस देणें पडला नसता असें खात्रीनें आह्मांस कळविलें गेलें होतें पण एतद्देशीय वर्तमानपत्रास लिहिणारा हजारांत किंवा दहा हजारांत एक असे [illegible] असतां [illegible] आणि तशा दुर्मिळांचेंही नाव आह्मी लोकांस सांगूं लागलों तर आमचा वर्तमानपत्रकर्त्यांचा बाणा तो काय राहिला? व लिहिणारांनीं आह्मांविषयीं भरवसा काय बाळगावा? या दोन गोष्टी मनांत आणून आह्मी आपल्यावरील मुकद्दम्याचें जोखीम व खर्च स्वतां सोसण्यास कबूल झालों. मग आमचे आश्रयदाते आह्मांस काय म्हणतील तें म्हणोत. आह्मांस तर असें वाटत आहे कीं, लिहिणाराचें नाव न देण्यांत आह्मी आपल्या निग्रहाचीं या भयंकर प्रसंगीं आश्रयदात्यांस परीक्षा दिली व तींत आह्मी पास झालों. व हें आमचें व्रत लक्ष्यांत ठेवून आमचे पत्रास मजकूर लिहिणारे यत्किंचितही कचरणार नाहींत व आह्मांस दिवसानुदिवस जास्ती सहाय देतील असा आह्मी भरवसा बाळगतों.

बावीस वर्षें आम्ही वर्तमानपत्राचा धंदा करीत असतां एकदांही अशा संबंधानें कधीं कोर्टाची पायरी चढलों नाहीं. व पुढेंही ईश्वर आह्मास असा प्रसंग न आणो; तरी आम्ही कबूल करितों कीं, या कामांत आह्माकडून दुर्दैवानें थोडें दुर्लक्ष्य झालें तें असें महिना दीड महिना आह्मी आजारी होतों, व त्याच संधींत म्याकिंटाश साहेबांवर जबरीच्या संभोगाचा मुकद्दमा होऊन त्याची हकीकत छापण्यास आली. व ती वर्तमानपत्र निघण्याच्या ऐन वेळेवर आली यामुळें त्या मजकुरांत अधिक शोधानें कांहीं न्यूनाधिक करण्यास आह्मा शकलों नाही, तरी त्याच दिवशीं सायकाळीं आह्मास उमरावतीहून टेलिग्राम यावा अशाविषयीं आह्मी पत्र लिहिलें होतें पण तें पत्र ज्यास लिहिलें ते गृहस्थ बाहेर गांवीं गेले असल्यामुळें तीन दिवसांनीं त्यांस पोचलें व इकडे घाईनें मजकूर छापला गेला, त्यास नाइलाज आहे. कांहीं अघटित होण्याची वेळ आली म्हणजे ती हरतऱ्हेनें तसें घडवितें व तेव्हां मनुष्याची अक्कल गुंग होते अस्तु. आह्मी आमचे पत्रास मजकूर लिहिणारे सर्व सद्गृहस्थांस अजूनही विनंती करितों कीं त्यांचा लेख अशा परिणामावर न यावा याविषयीं आह्मी जपत होतों त्यापेक्षां

या पुढें शतपट जास्ती जपू. व त्यांनीं आह्मावर व देशबांधवांवर कृपाकरून सरस्वति दाना विषयींचा आपला हात उदारपणें अखंड सरळ सोडावा. व आमचे पत्राचें स्वरूप पूर्ववत् राहील आणि त्यांत भित्रेपणा व हांजी हांजी न येतां विशेष काळजी घेतलेले लेख येत, जातील अशी खात्री बाळगावी.

याच प्रसंगीं हेंही सर्वांस कळविण्यास आह्मांस संतोष वाटतो कीं आमचे बातमीदारानें आह्मावर पडलेल्या खर्चाचे बोजास उदार हस्तानें पुष्कळ मदत करून तो हलका केला हे त्याचे उपकार आमच्यानें स्मरल्यावाचून रहावत नाहीं.

## वऱ्हाड

असें समजण्यांत आलें आहे कीं, मि० जोन्स साहेब कमिशनर गुरुवारचे गाडींतून येऊन उमरावतीस दाखल झाले.

मेजर बेल साहेब जुडिशियल कमिशनर चिखलदऱ्यास आहेत. त्यांचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. भास्कर सखाराम इलिचपुराहून परत आले होते ते पुन्हा परवाचे दिवशीं चिखलदऱ्यास गेले.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं हिंदुस्थानी मुलीची शाळा बंद व्हावी असें घाटत होतें ती गोष्ट म्युनिसिप्यालिटीकडील कांहीं मेंबरांनीं त्या शाळेस अनुकूळ अशीं मतें दिलेलीं असल्यामुळें उलटली. व डायरेक्टर साहेबांनीं अभिप्राय दिला कीं, आणखी तीन महिने त्या मेंबरांच्याच पैरवीखालीं सदहू शाळा चालू ठेवून परिणाम पहावा. ही सूचना डिपुटी कमिशनर साहेबांसही मान्य होऊन तसा अंमल होण्याविषयीं ठराव झाला.

अकोल्यास शहरांत व पेठेंत जितकीं ह्मणून गवताचीं घरें आहेत तितक्या सर्वांस नोटिसा झाल्या आहेत कीं, त्यांवरील गवत काढावें व. धावें किंवा कवलारू करावें. नाहींपेक्षां त्या लोकांनीं गावांतून निघून मासुमशा वलीचे तक्याचे बाजूस जाऊन नवीन गवती घरें करून रहावें.

क्या० रेनिक साहेब यांस सिकंदराबादेस म्युनिसिपल कमिशनर नेमिल्याची वार्ता आहे. असें एका इंग्रजी पत्रांत लिहिलें आहे. हे रेनिक साहेब तिकडे दुसरे कोणी आहेत कीं काय ठाऊक नाहीं.

रा. रा. कृष्णाजी गोविंद काळे वाशीमचे क्लार्क आफ धि कोर्ट यांस यवतमाळास नेमिल्याप्रमाणें ते तिकडे गेले असें ऐकतों. एका प्रकरणाचे कागद गहाळ झाल्याच्या संसर्गांत ही त्यांची बदली आहे. व दुसरा एक कारकून ४० रुपयांचा त्यास याच संबंधांत ३५ रुपये झाले असें ऐकण्यांत आहे.

कर्नल नेंभार्ड साहेब व ले० कर्नल अलार्डाईस साहेब सरकारी चाकऱ्या सोडून स्वदेशीं गेले. त्यामुळें त्यांचे जागेवर हिंदुस्थान सरकारानें नवीन नेमणुका करून त्या तारीख २१ माहे एप्रिलचे ग्याझेटांत प्रसिद्ध केल्या आहेत. व तारीख १ एप्रिलपासून त्यांचा अंमल व्हावा असा ठराव झाला आहे. त्या नेमणुकायेणेंप्रमाणें:—

मि० डब्ल्यु धी जोन्स सेंट्रल प्राव्हिन्स मधील चीफ कमिशनरचे सेक्रटरी यांस कर्नल नेंभार्ड साहेबांचे जागेवर कमिशनर नेमिलें.

मेजर जे जी बेल फर्स्ट क्लास डिपुटी कमिशनर यांस ले० कर्नल अलार्डाईस साहेबांचे जागेवर जुडिशियल कमि. नेमिलें.

मेजर आर एच हडलस्टन सेकंड क्लास व आफिशिएटिंग फर्स्ट क्लास डिपुटी कमिशनर यांस मि० बेल साहेबांचे जागेवर कायमचे फर्स्ट क्लास डिपुटी कमि. नेमिलें.

मेजर जे टी बुशबी थर्ड क्लास आणि आफिशिएटिंग सेकंड क्लास डिपुटी कमिशनर यांस हडलस्टन साहेबांचे जागेवर कायमचे सेकंड क्लास डिपुटी कमि. केलें.

मेजर जे फिटझरल्ड फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर व आफिशिएटिंग थर्ड क्लास डिपुटी कमिशनर यांस बुशबी साहेबांचे जागेवर कायमचे थर्ड क्लास डिपुटी कमिशनर केलें.

मेजर ए क्यारर (रजेवर असलेले) सेकंड असिस्टंट कमिशनर यांस फर्स्ट क्लास असिस्टंट कमिशनर केलें.

मि० नौलीस साहेब यांचे रजेंत क्या० रेनीक साहेब थर्ड क्लासचे आफिशि० सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर झाले.

वाशिम जिल्ह्यांतील तालुक्याचें गांव मंगरूळ यास पोलिस आक्टाचें ३४ वें कलम लागू केलें.

मि० पी चामरेट यवतमाळचे सिविल सरजन यांस ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाली. व त्यांचें कामावर आस्पिटल असिस्टंट इनाक शाद्राक यांस नेमिलें.

चांदुरचे नायब तहशिलदार मि० दाजी कृष्ण यांस थर्ड क्लास माजिस्त्रेटचा अधिकार मिळाला.

ले० क० ए एच मिलिट पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल यांनीं सरकारी नोकरी सोडली ह्मणून उभयतां कमिशनरां प्रमाणें रेसिडेन्सी आर्डरमध्येंच त्यांच्याविषयीं रेसिडेंट साहेबांनीं स्तुतिपर लेख लिहून त्यांचा गौरव केला आहे. व १२ वर्षें त्यांनीं वऱ्हाडांत काम करून चांगली सुधारणा केली व स्वस्थता राखिली याजबद्दल त्यांचे आभार मानिले आहेत.

खामगावचे नायब तहशिलदार रा. रा. व्यंकटराव मल्हार एदलाबादकर यांस माजिस्त्रेटचा अधिकार द्यावयाचा आहे सबब त्यांची परीक्षा घेण्याकरितां डिपुटी कमिशनर साहेबांनीं त्यांस हुजूर बोलाविलें आहे.

मे० दस्तुर बहिमनजी साहेब अ. क. ५२दिवसांचे रजेवर कालेंच गाडींतून पुण्याकडे गेले.

वाशिमचे तहशिलदार मि० अबदुल रहिमान यांनीं पोलिसचे एका हेड कानस्टेबलावर अधिकाराबाहेर फौजदारी मुकद्दमा चालविला, त्यावरून त्यांस कमी केलें असें ह्मणतात. हें खरें असेल तर मागील एकवेळचें त्यांचें कृत्य याहूनही विलक्षण होतें तरी ते नोकरीवरून निघाले असतां बहाल झाले. व आतांही हैदराबादेस ते गेले आहेत ह्मणून पुन्हा कामावर येतील असें ह्मणतात, मग पुढें काय होतें पाहावें. त्यांचें काम पाहण्यास क्या० फिटझरल्ड साहेब यांनीं तूर्त आपले आफिसांतून मि० खांने बदरुद्दीन यांस पाठविलें आहे.

मि० म्याकिंटाश साहेब उमरावती हायस्कुलचे हेड मास्तर यांस, आज राजिनामा द्यावा, किंवा सहा महिन्यांची रजा घेऊन जागेचा हक्क सोडावा, यांतून कोणतें कबूल करता असें विच्यारिलें होतें. त्याचा जबाब, रजा कबूल करितों, असा त्यांनीं डायरेक्टर साहेबांकडे पाठविल्यावरून त्यांनीं रेसिडेंट साहेबांस तसें कळविलें आहे. आतां तिकडून लिहून आल्यावर त्यांनां रजा मिळेल. व त्या रजेंत निमा पगारही त्यांस मिळेल असें ह्मणतात.

या आठवड्यांत म्याकिंटाश साहेब मि. लक्ष्मीपति नायुडु बारिस्टर यांसहवर्तमान ठाण्यास गेले असें ऐकतों. अरुणोदयावरें फिर्याद किंवा तोडजोड करणें हा जाण्याचा उद्देश आहे असें ह्मणतात.

मुंबईकडून येणारी गाडी १२ वाजून ५ मिनिटानीं येत असे ती तारीख २७ एप्रिल पासून ११ वाजून ४ मिनिटांनीं यावयाचीव नागपुराकडील ५ वाजून ५३ मिनीटानीं येत असे ती बरोबर ६ वाजतां यावयाची सुरुवात झाली.

सांगलीकरांचें एथें नाटक आलें आहे त्यांचे कालपावेतों पांच खेळ झाले व आणखी पुष्कळ होतील असें दिसतें. यांचे प्रमुख रा. रा. यज्ञेश्वर दिक्षित ह्मणून एक हुशार गृहस्थ आहेत ते व दुसरीं कित्येक पात्रें यांत चांगलीं कारागीर आहेत. त्यामुळें कांहीं कांहीं खेळ व त्यांतील कित्येक भाग फार उत्कृष्ठ जमतात असें बहुत लोकांच्यातोंडून ऐकण्यांत आलें. लोकसमुदायही नाटक पहाण्यास पुष्कळ जात असतो.

मागाहून आलेली नोटिस.

रामप्रताप रघुनाथदास मारवाडी दुकान ताजनापेठ यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचेकडून रुपये येणें आहेत त्याजबद्दल तुह्मी हिशेब करून रुपये देत नाहीं आणि तुमचे कडेस ३ दुकानें भाड्यानें आहेत ती आह्मी तुह्मास खालीं करून मागतो तर तुह्मी खालीं करून देत नाहीं करितां हल्लीं ही नोटिस पावतांच आमचे दुकानीं येऊन हिशेब करून रुपये चुकते करून देणें आणि मकान खालीं करून देणें जर तुह्मी असें न कराल तर नोटिस पावल्या तारखेपासून दरदुकानास १ रुपयाप्रमाणें ३ रुपये दररोज भाडें घेऊं व त्याबद्दल कचेरी खुली होताच फिर्याद करून या नोटिसीचें खर्चासुद्धां रुपये घेऊं हें आपणास कळावें, ता. २८ एप्रिल सन १८७७ इ.

( सही ) गंगाधर जोरावरमल साहू

# जाहिरनामा.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICK

## नोटिस

ALTERATION OF TRAINS

## गाड्यांच्या वेळांतबदल

तारीख २७ माहे एप्रिल सन १८७७ इसवी रोज शुक्रवार या दिवशीं व त्या दिवसापासून पुढें या रेल्वेवरून जाणारे गाड्यांचे वेळांत पुढें लिहिल्याप्रमाणें फेरफार होतील.

**पहिला**—मुंबईहून नागपुराकडे जाणारी डाउन ( खालची ) प्यासेंजर गाडी सकाळीं ७ अवर ४५ मिनिटांनीं निघत असे ती आतां ८ अवर ३० मिनिटांनीं निघेल आणि हल्लीं रात्रीं १० अवर ३५ मिनिटांनीं जी भुसावळेस पोचत असते ती ११ अवर ४० मिनिटांनीं पोंचेल.

**दुसरा**—भुसावळेहून नागपुरास जाणारी हल्लींची डाऊन मिक्सड ( माल व उतारू या सहित ) गाडी यापुढे फक्त प्यासेंजर गाडी होऊन सकाळीं ६ अवर ३० मिनिटांनीं निघेल आणि रात्रीं ९ वाजतां नागपुरास पोचत असे ती आतां ७ अवर ३०मिनिटांनीं पोंचत जाईल.

**तिसरा** अप ( वरची ) मिक्सड ट्रेन नागपुराहून सकाळीं ८ अवर ३० मिनिटांनीं निघत असे ती आतां ८ अवर ४५ मिनिटांनीं निघेल आणि भुसावळेस रात्रीं अक्रा वाजतां पोंचेल

**चवथा**—नागपुर शाखेकडील खामगाव, अमरावती व वर्धा एथील स्टेटरेलवेच्या वरच्या व खालच्या गाड्यांच्या वेळाचे संबंधानें मुख्य गाड्या साधण्याकरितां थोडे फेरफार केले आहेत.

**पांचवा**— रविवार शिवाय करून दररोज मुंबईहून तिसरेप्रहरीं ३ अवर ४५ मिनिटांनीं निघणारी अडिशनल डाउन मिक्स गाडी या पुढें ३ अवर ३० मिनिटांनी निघत जाईल आणि कल्याणास सायंकाळीं ६ अवर.४० मिनिटानीं पोचावयांची ती ६ अवर ५० मिनिटांला पोंचेल. आणि कल्याणाहून निघणारी अप मिक्सड गाडी सकाळीं ११ अवर ४० मिनिटानीं रविवार शिवायकरून. दररोज निघत असे ती आतां ११ अवर २० मिनिटांनीं निघेल आणि मुंबईस हल्लींच्याप्रमाणेंच १अवर ४० मिनिटांनीं येत जाईल.

या संबंधानें झालेले दुसरे फेरफार व आणखी विशेष माहिती समजून घ्यावयाची असेल तर तारीख २७ माहे एप्रिल सन १८७८चें वेळापत्रक पाहा. तशीच आणखी कांहीं शिवाय माहिती पाहिजे असेल तर ती हरएक स्टेशनावर अथवा खालीं सही करणाराकडे मिळूं शकेल.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर.

मुंबई तारीख २३ माहे एप्रिल सन सन १८७७

हिंदुस्थानच्या नकात खात्याचे गुदस्त सालचें उत्पन्न मीठ शिवाय करून. रुपये २१९९२३११ झाले मागील सालीं याहून २३ लक्ष रुपये अधिक झालें होते.

खानदेशांत भिल्ल लोकांनीं गडबड करून मुलुखास त्रास देऊनये ह्मणून सरकारानें भिल्ल एजन्सी नावाचें एक खातें काढून त्यावर युरोपियन अधिकारी नेमून त्याकडून भिल्ल लोकांस शेत कामास लाविलें व त्या करितां जें सामान लागणार तें विकत घेण्यास तगाई दिली याप्रमाणें त्यांचीं मनें वाईट मार्गापासून काढून चांगल्या फलप्राप्तीच्या व देशहिताच्या उद्योगास लाविलीं ही सरकारची मोठी गोष्ट आहे. तगाईचा पैसा वसूल करतां करतां सुमार रुपये ३०००० बाकी राहिली ती सरकारानीं त्या लोकांस सोडून दिली बर ते लोक कर्जमुक्त होऊन सुखी होतील अशी सूचना एजंट यांजकडून झाल्यावरून सरकारानें ती गोष्ट मान्य केली व भिल्ल लोकांस सूट दिली.

मुंबईस मि. हकीम महमद हुसेन नावाचे मुसलमान गृहस्थ बारिष्टर होऊन आले आहेत.

सर लुइ पेली सा. पेशावरास होते ते काबुलच्या नवीन तहाचा घाट अर्ध्यावरच टाकून मुंबईस आले व गेले सोमवारीं विलायतेस गेले.

मि. चाटफिलड साहेब मुंबईचे विद्याखात्याचे डायरेक्टर ३ महिन्यांचे हक्काचे रजेवर गेले. त्यांचि जागेवर ले. क. टी वाडिंगटन सा. यांस नेमिलें.

नर्मदा नदीचा पूल २६ वे तारखेस चालू झाला व तापी नदीचा पहिले तारखेस चालू होणार असें कळतें.

मे० सी. वोडहौस साहेब मुंबई सरकारचे प्रायव्हेट सेक्रेटरी यानीं १२ महिन्याची फर्लो रजा घेतली व ३० वे तारखेस ते विलायतेस जाणार.

हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला आहे कीं रेलवे कंपन्या पैकीं ज्या ज्या लोकांनीं दिल्ली दरबारचे प्रसंगीं उत्तम मेहेनत केली त्यांस एकेक महिन्याचा पगार बक्षीस द्यावा.

पेशावरास काबुल संबंधी घटणा चालली होती ती पुरी झाली. व नवीन मुत्सद्दी काबुलाहून आले होते ते परत गेले.

ग्वालेरचे महाराज श्रीमंत जयाजीराव शिंद यांस चक्रवर्तिनी साहेबानीं किताब देऊन लंडन ग्याझेटांत प्रसिद्ध केला आहे तो असा:— हिज हाईनेस जयाजीराव शिंदे महाराज जी सी एस आय यांस फर्स्ट क्लास मिलिटरी भागाचे आनररी मेंबर अथवा नाईट ग्रयांड क्रास आफ धिमोस्ट आनरबल आर्डर आफ धिब्याथ केले.

काठेवाडांतील चीफ, भोपाळच्या बेगम, मि० रतनजी बमनजी, ग्ली सोसायटी, होळकर, कच्छचे पो. एजन्ट, ब्रि. ज. जेल व देवास यांजकडून दक्षणेंतील दुष्काळाकरतां ह्मणून एकंदर ३३,३४२८९८६ रुपये मुंबईसरकाराकडे आले होते ते सरकारानें त्या कामाकडे लावण्याकरतां दक्षण व खानदेश रिलीफ फंड कमेटीच्या स्वाधीन केले असून त्यांतील तिसरा हिस्सा कर्नाटकाकडे द्यावा असें सरकारानें कमेटीस सुचविलें आहे.

इंग्लंड मध्यें अभ्यास करीत असलेले बाबू उपेंद्रनाथदास हे केंब्रीजच्या युनिव्हर्सिटींत शिपाईपणा शिकण्याच्या वर्गांत गेले आहेत. त्यांची नुकतीच अडज्युटंटची परीक्षा उतरून त्यांस बटेलियनचा हुद्दा मिळाला. या समारंभाच्या वेळेस इंग्लंडांतील कित्येक अनुभवी गृहस्थांनीं आमच्या हयातींत इतका जलद व हुशार शिकणारा आह्मी पाहिला नाहीं असें ह्मणून दाखविलें. सदर्हू बाबूंनीं सुमारें १९ मिनिटाच्या अवकाशांत २६ बार काढले हें पाहून तेथें जमलेल्या लोकांस फार आश्चर्य झालें. अ. द.

## अफगानिस्थान.

अफगानिस्थान व हिंदुस्थान सरकार यांच्यातील स्नेह भावांत कांहीं अंतर आलें असल्याबद्दल आह्मी आमच्या गेल्या एका अंकांत मजकूर लिहिला होता. परंतु तारीख १८ माहे मजकूरची सिमल्याहून जी तार आली आहे तींत असें आहे कीं सदरील समज अगदी खोटा आहे. सरहदीवर अगदीं स्वस्थता असून सरहद्दीपलीकडेस अस्वस्थता होण्यांचे कांहीं कारण दिसत नाहीं. याच तारखेची लाहोर एथील तार मुंबई ग्याझेटांत छापली आहे तींत असें आहे कीं अफगानिस्थान व हिंदुस्थान सरकार यांच्यांतील स्नेहभावांत अंतर आलें असल्याविषयीं शंका नाहीं. खेलातच्या खानाच्या फौजेनें बदलावें ह्मणून अमीर खटपट करीत असून या हेतूनें अमीरानें आपली कांहीं फौज गुलिस्थान एथें पाठविली आहे. कंदाहार एथील फौज हल्लीं तिप्पट वाढविली आहे. अफ्रिडीस लोकांना चेतविण्याच्या हेतूनें व जहाद सुरूकरण्याच्या खटपटी करितां अमीर स्वत: जलालाबादेस जाणार आहेत. आतां या दोन्ही विरुद्ध खबरी पैकीं खरी कोणची हें समजणें कठीण आहे. परंतु सिमल्याहून आलेली खबर खरी असण्याचा जास्त संभव आहे. मुंबई ग्याझेट कर्त्यांचे मत असें आहे कीं सिमल्याहून आलेल्या तारेंत कांहीं हशील नाहीं. अमीर कांहीं तरी विशेष खटपटींत आहेत यांत शंका नाहीं., असें नसतें तर मुंबईहून सुमारें पाउण कोटि रुपये अंबाल्यास पाठविण्याचें कारण नवतें. आतां तुर्कस्थानाकडेस लढाई वगैरे सुरू झाल्यास त्या संधींत इंग्रज सरकारास भेवडावून आपलें कार्य साधून घेऊं असा कांहीं अमीराचा बेत असेल तर त्यांत जयप्राप्ती व्हावयाची नाहीं हें आह्मांस सांगणें नको. या गडबडींत रशियाची दोस्ती जरी साधावी असा अमीराचा बेत असला तथापि तोहि साध्य व्हावयाचा नाहीं. कारण आपल्या अडचणी पुरें रशिया अमीराचें साधन ठेवील व अडचण गेल्यावर पुन: आपलें खरें स्वरूप प्रगट करण्यास रशियास वेळ लागणार नाहीं. करितां केवळ आपला मतलब साधण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां अमीरानें व मध्य एशियांतील सर्व मुसलमान राजांनीं अशा प्रसंगीं तुर्कस्थानास मदत करावी व यांतच मुसलमान धर्माचें व वैभवाचें कल्याण आहे. ने० ओ०

## नोटिसा

भिक्या वल्लद सत्या महार वस्ती मौजे आष्टुल प्रगणें पातुर तालुके बाळापुर जिल्हा अकोला यास खालीं सही करणार यानकडून नोटिस देण्यांत येते कीं तुजकडे आमची २६ रुपये बाकी येणें आहे यांत १२ रुपये दिले बाकी राहिलेले १४ रुपये व शिवाय व्याज ही नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत फडशा करून द्यावा याप्रमाणें न केल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून पैसा घेण्यांत येईल, कळावें तारीख २० माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) एकुसा चतुरसा
दस्तुर खुद

### नोटिस.

झाडनाक वल्लद उदनाक इंगळे वस्ती मौजे आष्टूल प्रगणें पातुरतालुके बाळापुर जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्माकडे खातेबाकी सन १२८४ फसली सालची येणें त्याचा तपशील.

ज्वारी मण दहा, १२९ रोख रुपये येणेंप्रमाणें तुजकडे घेणें निघत असून त्याजबद्दल आह्मी हमेशा तुजला ताकीद व तगादे केले असून तुझ्या ध्यानांत ही बागत नाहीं देऊं दिलाऊंच करीत आहेस आणि असे बहुत दिवस झाल्यानें व्याजानें व बाढीनें विनाकारण रक्कमें वाढून मग एकदम फिर्याद केली जाईल तेव्हां तीं देणें तुजला कठीण पडेल जाणून अगाऊ तुजला या नोटिसीनें कळवित आहे कीं, ही नोटिस पावल्या पासून एक महिन्याचे आंत ज्वारीचा व रुपयाचा लौकर फडशा करून द्यावा जर या नोटिसीनें ही उलगडा न केल्यास दिवाणी मार्गे फिर्याद केली जाईल. कळावें तारीख २० माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

[ सही ] एकोसा नानासा लाड
रहाणार पास्टूल
दस्तुर खुद.

### नोटिस.

राघोजी व महादाजी वल्लद चहादाजी माळी वानखडे रहाणार मौजे पाष्टुल प्रगणें पातुर तालुके बाळापुर जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार यानकडून नोटिस देण्यात येतें कीं आमची तुह्माकडे खातेबाकी ९ रुपये ८२ आणि येणें निघत आहे एक दोन वेळ मागितली असतां देऊं दिलाऊं करता परंतु अद्याप दिले नाहींत सबब ही नोटिस देण्यांत येते कीं ही नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत बाकीचा निकाल करावा इतक्यावर निकाल न केल्यास कायद्याप्रमाणें इलाज करावा लागेल. कळावें ता० २१ एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) एकूसा चतुरसा वस्ती
पाष्टुल दस्तुर खुद

### नोटिस.

धुळाराम देवता रहाणार नानंद तालुके पुसद यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येतें कीं आह्मी तुमचे घोडे वाशिमास नेण्याकरितां मागून आणले तें घोडें आह्मी पुन्हा परत देत असतां नेलें नाहीं ह्मणून आजपर्यंत माझे जवळ आहे करितां ही नोटिस देण्यांत आली आहे तर ही नोटिस पावले दिवसापासून १९ दिवसांत आपलें घोडें घेऊन जावें जर याप्रमाणें तुमचेकडून होणार नाहीं तर तें घोडें विकून टाकू आणि आजपर्यंत खर्चाबद्दल किमतीची रकम वजा जातां बाकी आपलेकडून घेण्याची तजवीज करू. कळावें तारीख २१ एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) लक्षुमण रामचंद्र दस्तुर
कृष्णराव रामचंद्र वाशीमकर

### नोटिस.

पुंजाजी वल्लद यादुजी माली राहणार मौजे बोरगाव तालुके बाळापुर जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी मजला आज तीन वर्षे बापाचे घरीं टाकून स्वस्थ बसलात. तीन वर्षांत माझा पोटखर्च व चोळी लुगडे बांगड्या वगैरेस काय खर्च लागला असेल याची काळजी न बाळगून मला आज तागाईत घेऊन जात नाहीं तेव्हां तुमचे मनांतील काय इरादा आहे तो मला बिलकूल समजत नाहीं. तुह्मास मला नांदविणें नसेल तर मी आज तीन वर्षे खर्च खात बसले तुह्मी अद्याप घेऊन गेला नाहीं व तुमचा काय हेतू आहे तो ही कळविला नाहीं यास्तव या नोटिसीनें तुह्मास असें कळविण्यांत येतें कीं माझा तीन वर्षांचा सर्व खर्च तुह्मी या नोटिसी पासून ८ दिवसाचे आंत सर्व खर्च घेऊन येऊन मला घेऊन जावे आणि जर तुह्मास मी अगत्यच नसेल तर माझा चोळी लुगड्याचा खर्च बांगड्या वगैरे याचा खर्च सुध्दा चूकवून देऊन मला तुह्मी गरज नाहीं अशी फारकती लिहून पाठवावी तसे तुह्माकडून न होईल व तुह्मी उगेच लावणी खालीं टाकून मला बिन अधारे ठेवाल तर मी आणखी एक महिना वाट पाहून तुह्माकडून कोणताच बंदोबस्त न झाल्यास हीच दिलेली नोटिस फारकती दाखल समजून क० प्र० मी दुसरा नवरा करीन व पोटगी खर्च वगैरे आजपर्यंत जो झाला त्याचा व्याज मुद्दल सुद्धां खर्च व नोटिसीचा खर्च सुद्धां भरून घेण्याबद्दल कोर्टांत सं[illegible] झाल्यावर फिर्याद करीन हें आपणास कळावें तारीख २४ माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) गंगाई मर्द पुंजाजी माली
दहिहंडेकर
इच्या हातची बांगडी असे

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प